नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १७० * * नागपूर * शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## राज्यातील ग्रंथालयांसाठी आनंदवार्ता

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
राज्यातील हजारो सार्वजनिक ग्रंथालयांना मोठा दिलासा देणारा निर्णय जाहीर झाला आहे. आता अनुदानासाठी अनेक महिने प्रतीक्षा करण्याचे दिवस संपले आहेत. नव्याने विकसित केलेल्या संगणकाधारित ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली असून थेट बँक खात्यात निधी जमा करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात तब्बल ८० कोटी ५३ लाख ६७ हजारांचे अनुदान १०,५४६ शासनमान्य ग्रंथालयांच्या खात्यात थेट वर्ग करण्यात आले आहे. आता त्यांच्या विकासकामांना गती मिळणार आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## बलुचिस्तानची बल्ले बल्ले !

पाकिस्तानच्या बोकांडीवर बसलेल्या बलुचिस्तान लिबरेशन आर्मीवर बंदी टाकावी असे पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी संयुक्त राष्ट्र संघात प्रस्तावित केले होते. या ठरावाला चीनचा पाकिस्तान सोबत संयुक्तरित्या पाठिंबा होता त्यासोबतच आणखी काही देशांचाही पाठिंब्याचा हात होता. पण बलुचिस्तान लिबरेशन आर्मी म्हणजेच बलीआवर बंदी टाकण्यास चक्क अमेरिकेनेच विरोध केला. अमेरिकेच्या नकाराच्या सुरात आणि इंग्लंड आणि फ्रान्सनेही सुर मिळवला म्हणजेच त्यांनीही विरोध केला. त्यामुळे (युनेस्को) संयुक्त राष्ट्र संघाच्या नकाराधिकार असलेल्या विशेष देशांच्या नकारामुळे हा प्रस्ताव आता थंड बस्त्यात गेलेला आहे. युनेस्कोच्या नियमांतर्गत एखाद्या संघटनेवर बंदी घालण्यात इतके पुरेसे पुरावे नाहीत असे स्पष्टीकरण यामध्ये संयुक्त राष्ट्र संघाने दिलेले आहे. कारण, ज्या पाकिस्तानने आपल्या जन्मापासून अतिरेकी घडवण्याचे एकमेव कार्य केलेले आहे. त्या पाकिस्तानला आता बलीआची म्हणजेच बलुचिस्तान लिबरेशन आमीर्ची भीती वाटत आहे. याचा अर्थ जन्मजात चोराला आपल्या घरची एक छोटी वस्तू चोरी गेली म्हणून संबंधित चोराला फाशीची शिक्षा द्या असे म्हणण्यासारखेच आहे. पाकिस्तानला कधीच समजुतीची भाषा कळत नाही, १९७२ सालामध्ये पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी आपल्या तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबरोबर शिमला येथे करार केला होता. त्यावेळी इंदिरा गांधी यांच्या हातापाया पडून मला निदान पाकिस्तानमध्ये तोंड दाखवण्यासाठी तरी जागा राहू द्या, असे म्हणत हातापाया पडून अनेक सवलती आपल्या पदरात पाडून घेतलेल्या होत्या. १९७१ च्या लढाईपूर्वी आपण भारताबरोबर हजार वर्ष लढू शकतो. अशा वल्गना करणाऱ्या झुल्फीकार अली भुट्टोला शेवटी इंदिराजी यांच्या मेहरबानीमुळेच पाकिस्तानात पाय ठेवता आले हा इतिहास आहे. भारतात सत्तेवर कोणीही असले तरी भारताने नेहमीच दहशतवादाचा विरोध केलेला आहे. दुसऱ्या देशाविरुद्ध कधीच कटकारस्थाने भारताने केलेली नाहीत. अफगाणिस्तान सारख्या अनेक देशांना नेहमीच मदतीचा हात दिलेला आहे. त्याविरुद्ध या पाकड्यांनी नेहमीच दहशतवादी कृत्य म्हणजे जणू काही आपले पारंपारिक धार्मिक कार्यच आहे असे समजून दहशतवाद्यांचे उत्पादन आपल्याच देशात मोठ्या प्रमाणात केलेले आहे. १९४८ सालामध्ये पाकिस्तानने भारतावर पहिला हल्ला केला, त्यानंतर १९६४ - ६५ साली पुन्हा पाकिस्तानला जोरात ताव आला. तेव्हाही भारताने पाकिस्तानला सपाटून मार दिला. त्यानंतर पूर्व पाकिस्तानातील बंगाली जनतेवर अनन्वित अत्याचार केले गेले. महिला आणि कोवळ्या मुलांवरही अनन्वित अत्याचार करून जे काही पाकिस्तानने केले त्या हिंसकपणाचे कधीच समर्थन होऊ शकत नाही. विशेष म्हणजे स्पष्ट बहुमत असूनही पाकिस्तानच्या तत्कालीन नेत्यांनी शेख मुजीबुर रहमान यांना सत्ता स्थापन करू दिली नव्हती. अखेर त्यावेळच्या पूर्व पाकिस्तान मध्ये पाकिस्तानच्या लष्कराने प्रचंड अत्याचार केल्यावर भारताने पूर्व पाकिस्तानच्या मुख्य वाहिनीला मदत देऊन बांगलादेशची निर्मिती केली. त्यानंतरही पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे तसेच चालू होते आणि अजूनही चालू आहेत. आता पुन्हा भारताबरोबर खोड्या करून पाकिस्तानने आपला इब्लिसपणा दाखवून दिलाच आहे. अशा या पाकिस्तानच्या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाने केराची टोपली दाखवली असेल, तर त्यामध्ये नवल ते काय आहे. प्रश्न असा आहे की अमेरिकेने त्यांच्या लाडक्या पाकवर अशा प्रकारचा बलात्कार करणे हे फक्त लहरी लाला ट्रम्पच करू शकतात. आता तर बलुचिस्तान लिबरेशन आर्मिला म्हणे भारताचा पाठिंबा आहे म्हणजे असे पाकिस्तानचे म्हणणे आहे. भारताला इतर देशांच्या अंतर्गत व्यवहारात लुडबुड करण्याची सवय नाही. पण बलुचिस्तान आमीर्ला भारताने विरोध करण्याचेही कारण नाही. सध्याच्या घडीला बलुचिस्तान पाकिस्तानसाठी सोन्याची कोंबडी आहे बलुचिस्तान मधील खनिज संपत्तीवर पाकिस्तान मजा मारत आहे. आज पाकिस्तान मधून बलुचिस्तानला वेगळे केले तर पाकिस्तानची सगळी गुंडगिरी काही सेकंदात संपुष्टात येऊ शकते. संयुक्त राष्ट्र संघाने विशेष अधिकाराद्वारे पाकिस्तानची जिरवलेली आहे हेच आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. यापुढील भविष्यात बलुचिस्तानचे बल्ले बल्ले व्हावे, अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करीत आहोत. कितीही मनात नसले तरी आपल्याला याबद्दल मन मारून सुद्धा ट्रम्प यांचे यासाठी आभार मानलेच पाहिजेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सरकारी योजनेतील बोगस लाभार्थ्यांच्या समस्येवर
# 'गोल्डन डेटा' तून अंकुश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
राज्य सरकारने सरकारी योजनांतील बोगस लाभार्थ्यांचा मुद्दा कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी एक गोल्डन डेटा तयार केला आहे. या डेटामध्ये राज्यातील सर्वच नागरिकांची इत्यंभूत माहिती अवघ्या एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सरकारला भविष्यातील कोणत्याही योजनेसाठी वेगळा सर्व्हे करण्याची काहीच गरज उरणार नाही.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सरकार येत्या २ ऑक्टोबर रोजी गोल्डन डेटा जाहीर करणार आहे. सरकारी योजनांमधील बोगस लाभार्थी शोधण्यासाठी हा डेटा तयार करण्यात आला आहे. या डेटामध्ये महाराष्ट्रातील सर्वच नागरिकांची इत्यंभूत म्हणजे आर्थिक, सामाजिक, भौगोलिक माहिती असणार आहे. जवळपास १४ ते १५ कोटी नागरिकांचा हा डेटा आहे. त्यामुळे यापुढे एखादी योजना राबवायची असेल, तर त्यासाठी सर्व्हे करण्याची काहीही गरज पडणार नाही.

सरकारला अवघ्या एका क्लिकवर लाभार्थींची यादी मिळू शकेल. विशेष म्हणजे याच गोल्डन डेटामधून लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी शोधण्यात आलेत. सरकारला या डेटामधून जवळपास २६ लाख बोगस लाभार्थी आढळलेत.

त्यामुळे भविष्यात एखादी योजना राबवायची असेल तर कोणत्या जिल्ह्यात किती आर्थिक उत्पन्न असलेले कोणत्या वयोगटातील किती लाभार्थी आहेत? इथपपासून तिथपर्यंतची सर्वच माहिती सरकारला बसल्याबसल्या उपलब्ध होणार आहे.

### नव्या शासकीय योजनांसाठी सर्व्हेक्षण करण्याची गरजच नाही

#### लाडकी बहीण योजनेचा सर्व्हे ८०% पूर्ण

दुसरीकडे, सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी शोधण्यासाठी अंगणवाडी सेविकांना घरोघरी जाऊन एक सर्व्हे करण्याचे आदेश होते. त्यात ६५ वर्षांवरील महिला व एकाच घरातील दोनहून अधिक लाभ घेत असलेल्या लाभार्थींचा शोध घेण्यात आला. त्यात एकाच कुटुंबातील दोनहून अधिक लाभ घेणाऱ्या महिलांचा आकडा ७ लाख ९७ हजार असल्याचे निष्पन्न झाले. या महिलांच्या खात्यात सरकारने आतापर्यंत तब्ल ११९७ कोटी रुपये वर्ग केलेत. विशेषतः ६५ वर्षांच्या पुढील २ लाख ८७ हजार महिलांनाही या योजनेंतर्गत ४३१ कोटी ७० लाख रुपये मिळालेत. या महिलांवर सरकारने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. या प्रकरणी संपूर्ण अहवाल आल्यानंतरच सरकार योग्य ती कारवाई करणार आहे.

लाडकी बहिणींना सरकारचा अल्टिमेटम
## फक्त २ महिन्यांचा वेळ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
राज्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा गाजायला लागली आहे. या योजनेतून महिलांच्या खात्यात थेट मदत पोहोचते. मात्र, याच योजनेबाबत सरकारने आता महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

गेल्या काही दिवसांत या योजनेमुळे राज्याच्या आर्थिक तिजोरीवर प्रचंड ताण येत असल्याचे आरोप झाले. शिवाय, पात्रतेच्या अटी कठोर करून अनेकांना बाहेर काढण्याचा सरकारचा डाव असल्याचं बोललं जाऊ लागलं.

योजनेतून लाभ सुरू राहणार की मधेच अडथळे येणार, याविषयी चर्चा सुरू असतानाच राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी थेट महिलांना उद्देशून नवा संदेश दिला आहे. आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व महिलांना केवायसी करणं बंधनकारक असेल.

त्याचबरोबर, ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी फक्त २ महिन्यांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. पोर्टलवर ही सोपी व सुलभ सेवा सुरू करण्यात आली असून, पारदर्शकता राखून पात्र महिलांना नियमित लाभ मिळावा हा उद्देश असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सरकारच्या या नव्या निर्णयामुळे लाखो लाभार्थींमध्ये हलचल माजली आहे. पुढील दोन महिन्यांत केवायसी पूर्ण केलं नाही, तर लाभ थांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना आता या नव्या अटीकडे पूर्ण लक्ष द्यावं लागणार आहे.

## बोलताना भान राखा!

### मुख्यमंत्र्यांकडून गोपीचंद पडळकरांची कानउघाडणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविषयी केलेल्या एका वादग्रस्त विधानाचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. अनेक राजकीय नेत्यांनी या प्रकरणी पडळकरांच्या विधानाचा निषेध केला आहे.



स्वतः शरद पवारांनी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून आपली नाराजी कळवली. त्यानंतर फडणवीसांनी पडळकरांना फैलावर घेत बोलताना भान राखण्याचा सल्ला दिला. गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या विधानाचे आम्ही केव्हाच समर्थन करणार नाहीत, असे ते म्हणालेत.

गोपीचंद पडळकर यांनी सांगलीत एकेठिकाणी बोलताना जयंत पाटील व त्यांच्या कुटुंबीयांविषयी वादग्रस्त विधान केले होते. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पत्रकारांनी शुक्रवारी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न केला.

त्यावर ते म्हणाले, गोपीचंद पडळकर यांनी जे स्टेटमेंट केले ते योग्य आहे असे माझे मत नाही. कुणाच्याही वडिलांविषयी किंवा परिवाराविषयी असे बोलणे योग्य नाही. यासंदर्भात माझी पडळकरांशी चर्चा झाली. त्यांनाही मी सांगितले. मला शरद पवारांचाही फोन आला होता. त्यांच्याशीही मी संवाद साधला. अशा प्रकारच्या विधानाचे आम्ही कधीच समर्थन करणार नाही.

गोपीचंद पडळकर आक्रमक नेते आहेत. अनेकदा आक्रमकपणा दाखवत असताना आपल्या बोलण्याचा नेमका काय अर्थ निघेल हे ते लक्षात घेत नाहीत. त्यामुळे मी त्यांना सांगितले आहे की, हे लक्षात घेऊनच आपला आक्रमकपणा राखला पाहिजे. आपण बोलत असताना त्याचे काय अर्थ निघतील हे लक्षात घेऊन आपण बोलले पाहिजे, असा सल्ला मी त्यांना दिल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले.

## सुसंकृतपणा दाखवायला हवा..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ : दादांचा सल्ला



कुणीही कोणत्याही पक्षाचे असो, पण राजकारणात वावरताना सुसंकृतपणा दाखवायला हवा. प्रत्येकाने बोलत असताना कुणाला वेदना देणारे वक्तव्य करू नये असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवारांनी नाव न घेता आमदार गोपीचंद पडळकर यांना दिला आहे. गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यावर टीका करताना पातळी सोडल्याचे दिसून आले. यावर अजित पवारांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार म्हणाले, संविधानाने आपल्याला अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. पण व्यक्त होताना समाजामध्ये सलोखा राहील, कुणाच्या भावना दुखावणार नाहीत यासाठी प्रयत्न केला पाहिजे. गोपीचंद पडळकर यांनी काय विधान केलं याची माहिती सध्या तरी माझ्याकडे नाही. पण मी याच विचाराचा आहे कोणी कोणत्याही राजकीय विचाराचा असो तरी आपल्या महाराष्ट्राला एक वेगळी परंपरा आहे, एक संस्कृती आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या काळापासून सुसंस्कृतपणा हा राजकारणामध्ये दाखवला गेला आहे.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, वादग्रस्त विधानांसंदर्भात आमच्या महायुती सरकारचे एकमेव धोरण आहे. महायुती तीनही पक्षातील ज्या लोकांनी ते विधान केले आहे त्या त्या पक्षांच्या नेत्यांनी त्या त्या विधानसंदर्भात नोंद घेतली पाहिजे आणि भूमिका स्पष्ट केली पाहिजे असे आमचे धोरण आहे. शिवसेनेसंदर्भात जर काही वादग्रस्त विधान झाले तर एकनाथ शिंदे बोलतील, आमच्या पक्षाकडून जर काही विधान झाले त्याची जबाबदारी माझी आहे आणि भाजपच्या संदर्भात ती जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या कारवाईने
## उघडले राजुराचे रहस्य!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
राजुरा विधानसभा मतदारसंघात गेल्या वर्षी झालेल्या मतदार नोंदणी प्रक्रियेत काहीतरी बिनसल्याच्या बातम्या समोर येताच प्रशासन सतर्क झाले. सुरुवातीला सर्व काही व्यवस्थित दिसत असलं तरी अर्जांची सखोल छाननी सुरू होताच एक धक्कादायक वास्तव उघडकीस आले.

फक्त १७ दिवसांत तब्बल ७,५९२ नवीन अर्ज मतदार नोंदणी कार्यालयात जमा झाले होते. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी तपासणी सुरू केली आणि त्यात निवास नसणे, अर्जदार अस्तित्वातच नसणे, आवश्यक पुरावे न जोडणे अशा मोठ्या त्रुटी आढळल्या. निवडणूक अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आणि लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० व माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार राजुरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपासही सुरू आहे.

शेवटी निकाल धक्कादायकच ठरला. ७,५९२ पैकी तब्बल ६,८६१ अर्ज अवैध ठरवले गेले. वेळेवर व स्वतःहून केलेल्या कारवाईमुळे या सर्व नावांचा मतदार यादीत समावेश होऊ शकला नाही. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या प्रसिद्धीपत्रकात सांगितल्याप्रमाणे, निवडणूक विभागाच्या तात्काळ दक्षतेमुळे राजुरा विधानसभा मतदारसंघातील बनावट मतदार नोंदणीचा मोठा प्रयत्न यशस्वीपणे रोखण्यात आला आहे.

६ वर्षे निवडणूक न लढवणाऱ्या
## ४७४ पक्षांची नावे रद्द

■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. १९ :
निवडणूक आयोगाने शुक्रवारी गेल्या सहा वर्षांत कोणतीही निवडणूक न लढवलेल्या ४७४ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची यादी रद्द केली. या कारवाईनंतर, गेल्या दोन महिन्यांत ८०८ पक्षांना यादीतून काढून टाकण्यात आले आहे. आयोगाने असेही म्हटले आहे की, ३३४ पक्षांची नोंदणी यापूर्वी रद्द करण्यात आली होती.

२ महिन्यांत ८०८ पक्षांची नोंदणी रद्द

आयोगाने २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३५९ पक्षांची ओळख पटवली आहे, ज्यांनी तीन वर्षांपासून (२०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४) त्यांचे लेखापरीक्षित खाते आणि निवडणूक खर्चाचे अहवाल सादर केलेले नाहीत. या पक्षांनी निवडणूक लढवली होती, परंतु आवश्यक अहवाल वेळेवर सादर केले नाहीत.

## सुरक्षा दलांवर मणिपूरमध्ये हल्ला
### २ जवान शहीद ४ जखमी


■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. १९ :
मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यात अज्ञात हल्लेखोरांनी शुक्रवारी संध्याकाळी आसाम रायफल्सच्या वाहनावर हल्ला केला. या हल्ल्यात दोन जवान शहीद झाले, तर चार जण जखमी झाले.

घटनेनंतर परिसरात शोध मोहीम सुरू करण्यात आली असून, नाकांबंदीही केली गेली आहे.

## आदिवासींच्या जमिनी भाडेतत्वावर?

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १९ :
आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी आता गैरआदिवासींना भाडेतत्वावर घेता येणार असून यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याची तयारी राज्य सरकारने सुरू केली आहे.

आदिवासी नेत्यांचा तीव्र विरोध



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १९ सप्टेंबर रोजी गडचिरोली येथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मात्र, या निर्णयामुळे आदिवासींच्या जमिनी धनदांडग्यांच्या ताब्यात जाण्याचा धोका असल्याची भीती व्यक्त होत असून आदिवासी नेत्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

बावनकुळे म्हणाले, की यापूर्वी आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित करण्याची तरतूद नव्हती. आता नव्या कायद्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या समक्षच भाडेपट्टा करावा लागणार असून त्यासाठी किमान मूल्य निश्चित करण्यात आले आहे. एकरी ५० हजार तर हेक्टरी सव्वा लाख रुपये इतका किमान दर ठरविण्यात आला आहे. ठराविक किमान दरापेक्षा जास्त रकमेवर करार करता येईल, मात्र कमी दराने भाडेपट्टा मंजूर होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय आदिवासींच्या जमिनीतील गौण खनिजाचे खासगी कंपन्यांना उत्खनन व विक्री करण्याची मुभा दिली जाणार आहे. त्यासाठी करार करणे बंधनकारक असून उत्खननाच्या तुलनेत प्रतिटन किंवा प्रति ब्रास मोबदला शेतकऱ्याला देणे आवश्यक असेल.

या निर्णयाला आदिवासी नेत्यांचा तीव्र विरोध आहे. गौण खनिज उत्खननासाठी खासगी कंपन्यांशी थेट करार करण्यास दिलेली मुभा धोकादायक ठरेल, असे त्यांचे म्हणणे आहे. गडचिरोलीसारख्या निसर्गसंपन्न जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उत्खनन होऊन जंगलतोड, पर्यावरणीय हानी आणि जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, हा निर्णय आम्ही कदापि मान्य करणार नाही. सरकारने हा निर्णय घेतल्यास राज्यभर आंदोलन उभारले जाईल, असे खासदार डॉ. नामदेव किरसान म्हणाले.

## गावकी आणि भावकी तशीच राहू द्या..

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
आरक्षणाच्या मुद्द्यावर आता प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी देखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. गावकी आणि भावकी एकत्र होती. यापुढेही एकत्र राहू, असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत बोलताना मकरंद अनासपुरे यांना मराठा आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना ते म्हणाले, समाज तुटू नये, समाज तुटला तर अराजक निर्माण होते. आपण भावंडांसारखे आणि एक समाज म्हणून राहतो. जेव्हा आपल्यावर संकट येते तेव्हा एकत्रितपणे आपण धावून जातो. त्यामुळे आपण एकजुटीने राहूया.

राज्य सरकारला कळकळीची विनंती आहे की, जास्तीत जास्त दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी. तोंडाशी आलेला घास जाण्याची भीती आहे. त्यामुळे जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांना केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## कास्तकारांच्या आंदोलनामुळेच सरकार प्रभावित

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १९ :
अकोला-सरकार कास्तकारांना संपविण्याचा मार्गावर असून कॉर्पोरेट घराण्याच्या इशाऱ्यावर कार्य करीत आहे. मात्र संयुक्त किसान मोर्च्यांच्या तेरा महिने चाललेल्या शेतकरी आंदोलनामुळेच एमएसपीच्या तीन मागण्या पूर्ण झाल्या असून अजून असे रणशिंग फुंकले जाणार आहे. म्हणून देशभरातील कास्तकारांनी एकसंघ व्हायला हवे, असे आवाहन संयुक्त किसान मोर्चाचे नेते राकेश टिकैत यांनी केले.




रामदास पेठ येथील मराठा मंडळच्या स्व. नामदेवराव पोहरे सभागृहात किसान ब्रिगेडच्या वतीने शेतकरी लुटवापसी सभा संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. जेष्ठ कॉम्रेड अशोक ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या संवाद सभेत किसान ब्रिग्रेडचे संस्थापक व संयोजक प्रकाश पोहरे, बच्चूभाऊ कडू, रविकांत तुपकर, विश्वास उटगी, अजीत नवले, पुरूषोत्तम खेडेकर, अजय भगत, कोटेश्वरराव, विजय कृष्णन, प्रशांत गावंडे, पी. साईनाथ, गुरुमितसिह, रविंदरसिह, रुपाली पाटील, प्रदीप देशमुख आदी उपस्थित होते.

किसान ब्रिग्रेडचे प्रदेशाध्यक्ष पुरूषोत्तम गावंडे यांनी प्रास्ताविकातून संयुक्त किसान मोर्चाची भूमिका मांडली. यावेळी देशभरातून आलेल्या कास्तकार नेत्यांनी केंद्र सरकारच्या कृषी धोरणावर कडाडून हल्ले चढवले.

विजय कृष्णन म्हणाले, विदर्भातील कास्तकारांचे संकट अद्यापही कायम आहे. ३ लाख ५० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे मोदी सरकारच्या अपयशाचे मोठे कारण असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशांत गावंडे म्हणाले, नरेंद्र मोदी यांचे केंद्र सरकार मोजंबीकची डाळ आयात करून येथील कास्तकारांना आत्महत्या करायला भाग पाडत आहे. राज्याचे फडणवीस सरकार हे फसनवीस सरकार असून शेतीच्या नापिकीतून अनेक गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत .

ज्येष्ठ पत्रकार पी साईनाथ यांनी कास्तकार व कृषी क्षेत्राच्या भकासपणावर कटाक्ष टाकला. ते म्हणाले ५० वर्षांपूर्वी विदर्भातील कास्तकारांची परिस्थिती काय होती. याचा विचार झाला पाहिजे. आज सोन्याला १ लाख १३ हजार रुपये भाव असून क्विंटल कापूस मात्र पडेल भावात विकावा लागणार आहे.

रविकांत तुपकर यांनी आपल्या भाषणात आपल्या देशातील तरुण पोरं नेत्यांचे वाढदिवस साजरे करण्यात रमलेली असून, स्वतःच्या बापासाठी, शेतकरी प्रश्नांसाठी लढायला पुढे येत नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली. शेतकऱ्यांची परिस्थिती विदारक असून मुलांची लग्नं होत नाहीत, घरात अडचणी वाढल्या आहेत. याउलट शेतकऱ्यांची पोरं नेत्यांच्या जयंत्या साजऱ्या करतात पण हक्कांसाठी लढायला तयार नाहीत, ही मोठी शोकांतिका असल्याचे ते म्हणाले.

शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी पॉवर पॉइंट द्वारे शेतकऱ्यांची कृषी मालाच्या संदर्भात आजपर्यंत कशी फसवणूक करण्यात आली याचे सचित्र उदाहरण सादर केले. हजारो कास्तकार सरकारी डावपेचात अडकला असून मोठी क्रांती करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने कास्तकारांनी एक होणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

प्रहार नेते बच्चू कडू यांनी सरकारवर कठोर प्रहार केला. राज्य सरकारने कास्तकारांची लूट सुरू केली असून सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाले नाही तर पालकमंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी या संवाद सभेत दिला.

याप्रसंगी अशोक ढवळे, विश्वास उटगी, नवले, गुरुमित सिह, रविंदर सिह यांच्यासह अतिथींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मते मांडली.

या लूट वापसी संवाद सभेचे संचालन धनंजय मिश्रा यांनी केले तर आभार साहेबराव मोरे यांनी मानले. ग्रामीण पसायदानाने या सभेचे समापन करण्यात आले. यावेळी या सभेत विदर्भ समवेत राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील शेकडो कास्तकार उपस्थित होते.

## फडणवीस सरकारने मराठा आरक्षण दिले : राधाकृष्ण विखे पाटील



**मुंबई :** आरक्षणाचे मारेकरी हे महा विकास आघाडीचे लोक आहेत. गोलमेज परिषदेच्या लोकांनी त्यांना प्रश्न विचारले पाहिजे. त्यांनी तुम्हाला नाकारले तुमचे आरक्षण घालवले, असा टोला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला आहे. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माज्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमिती नेमली. त्यांचा सातत्याने आग्रह आहे की सर्व समावेशक अशा प्रकारच्या आरक्षणाची कारवाई करावी. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात पूर्वी सरकारने बाजू मांडली पण मविआ सरकारने वकिलांचे पैसेच दिले नाही. मराठी प्रती इंग्रजीत भाषांतर करणे त्यांना जमले नाही. आज जे सर्व विचारवंत पुढे आले आहेत त्यांनी हे सर्व प्रश्न मविआला विचारले पाहिजे की याचे प्रायश्चित्त कुणी करायचे. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणात सरकारने फसवणूक केली असे वाटत असेल, काही शंका असतील तर न्यायालयाची दारे आहेतच ना. तर त्यांनी न्यायलयात जावे. सर्वोच्च न्यायालयात पेंडिंग पीटिशन आहे त्यासाठी चांगले वकील देण्यात यावे.

# जमीन अकृषक परवाना अट काढावी : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** सूक्ष्म आणि लघु उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग यासाठी जमिनीच्या काही मयार्देत अकृषक परवान्याची अट काढण्याचा निर्णय सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित धोरणात्मक सुधारणा (पॉलिसी रिफॉर्म) बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना अकृषक परवाना मिळण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होऊन त्यांना वेळेत उद्योग सुरू करणे सोयीचे होणार आहे.

राज्याची सर्वच क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शासन विविध धोरणांची अंमलबजावणी करीत असते. या धोरणांमध्ये भविष्यातील आव्हानांचा वेध घेत व्यापक समाजहित असणे गरजेचे आहे. सामान्य नागरिकाचे जीवन अधिकाधिक सुसह्य करण्यासाठी या धोरणांचा उपयोग व्हावा, अशी अपेक्षा यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. राज्याला देशामध्ये अन्य राज्यांच्या तुलनेत पुढे नेणारी बरीचशी क्षेत्र दुर्लक्षित राहिली होती. या क्षेत्रांच्या विकासातून समृद्ध राज्य बनविण्यासाठी अशा क्षेत्रावर आधारित धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ही सर्व धोरणे



राज्याच्या विकास आणि समाज हितासाठी समर्पित असतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींच्या ठिकाणी ' इंडस्ट्रियल टाऊनशिप' उभारण्यात याव्यात. उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळासाठी ही महत्वाची ठरणार आहे. उद्योगाच्या आजुबाजूलाच निवासाची सुविधा मिळाल्यास कामगारांची कार्यक्षमता वाढेल. या टाऊनशिपमध्ये संपूर्ण नागरी सुविधा देण्यात याव्यात. शहरात, गावात मिळणाऱ्या नागरी सुविधा त्यांना मिळतील, याची व्यवस्था करावी. कर्करोगासारख्या दुर्धर आजारांवरील उपचारामुळे बरे झाल्यावर दिसणारी लक्षणे आणि वेदना कमी करण्यासाठी ' पॅलॅटिव्ह केअर पॉलिसी' अंतर्गत आवश्यक नियंत्रक प्रणाली उभारावी. तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील कर्करोगामध्ये ' पॅलॅटिव्ह केअर' खूप महत्वाचे आहे. लक्षणे आणि वेदना कमी करणारी औषधे वापराबाबत आणि उपलब्धतेसाठी धोरण बनवावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, काही उद्योगांमध्ये ' कॅप्टिव्ह पॉवर जनरेशन' करावे लागणार आहे. त्यामुळे स्पर्धात्मक वीज दर तयार होऊन त्यामधून वीज ग्राहकांना लाभ होईल. तसेच उद्योगांनाही वीज मिळेल. उद्योग घटकांतील कामगारांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम नियमितपणे घेऊन त्यांची कौशल्य वृद्धी करावी. अन्य शिष्यवृत्तीच्या योजनांच्या धर्तीवर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांसाठी शिष्यवृत्ती योजना आणावी. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना शासनाकडून अदा करण्यात येणाऱ्या देयकांसाठी ऑनलाइन पोर्टल तयार करावे. त्यासाठी 'ऑटोमॅटेड सिस्टीम' असावी. तसेच सेवा पुरवठादाराला त्याच्या देयकाची स्थिती कळावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

अमेरिकेने भारतावर लावलेल्या ५० टक्के आयात शुल्कामुळे राज्यातून अमेरिकेला होत असलेल्या निर्यातीचे नुकसान भरून काढण्यासाठी नवनवीन संकल्पना अमलात आणाव्यात. अन्य बाजारपेठांचा शोध घेत पर्याय शोधावे. सागवान लाकडाची देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सागवानची लागवड वाढविण्यात यावी.

वन विभागाने यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीत सक्रिय औषध घटक निर्मिती धोरण, पॅलॅटिव्ह केअर धोरण, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम देयक अदायगी सिस्टीम, बायोगॅस धोरण, कांदा महाबँक, अकृषक परवाना पद्धत, अमेरिकेने भारतावर लावलेले ५० टक्के आयात शुल्क आदी विषयांवर चर्चा झाली.

# मुंबईहून नांदेडसाठी विशेष रेल्वेगाडी

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १९ :** नवरात्रोत्सवासह आगामी काळात येणारे इतर सण लक्षात घेता प्रवाशांची अतिरिक्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस आणि हुजूर साहेब नांदेड दरम्यान चार विशेष रेल्वे गाड्या धावणार आहेत. या विशेष रेल्वेगाड्यांमुळे नाशिक जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांचीही सोय होणार आहे.

रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. नाशिक जिल्ह्यातून दररोज नोकरी, व्यवसाय यानिमित्ताने मुंबईला जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. प्रवाशांची संख्या अधिक आणि रेल्वेगाड्यांची संख्या कमी , या स्थितीमुळे प्रवाशांचे हाल होतात. त्यातच जिल्ह्यातील रेल्वे स्थानकांची स्थितीही फारशी चांगली नाही. परंतु, आता या स्थानकांच्या मदतीला सिंहस्थ कुंभमेळा धावून आल्याने त्यांचा चेहरामोहरा बदलण्याची शक्यता आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकरोड रेल्वे स्थानकासाठी सुमारे ४९.३३ कोटी रुपये खर्चून विकास केला जाणार आहे. संपूर्ण काम वर्षभरात पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. देश-विदेशातून अनेक पर्यटक नाशिकला भेट देत असतात, त्यामुळे शहराचे सौंदर्य वृद्धिंगत व्हावे आणि पर्यटनाला चालना मिळावी, यासाठी रेल्वे प्रशासनाने या स्थानकाची नव्याने इमारत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वाधिक करोडपती कुटुंब; मर्सिडिज बेंझ हुरुन इंडिया वेल्थ नाशिक रोड रेल्वेस्थानकाचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. या कामामुळे स्थानक अधिक आकर्षक आणि अत्याधुनिक होणार आहे. सिंहस्थाच्या कामाच्या देखरेखनिमित्त नाशिक रोड रेल्वेस्थानकातर अधिकाऱ्यांचे पाहणी दौरे वाढले आहेत.

### अस्मानी संकटामुळे शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त

## रोहित पवारांकडून हल्लाबोल



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी अस्मानी संकटामुळे त्राहिमाम झालेल्या शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या तुटपुंज्या मदतीवरून महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. मुख्यमंत्र्यांच्या घराच्या बेडरूमच्या गादीसाठी आणि सोफ्यासाठी 20 लाख व पेपरच्या पहिल्या पानावर 50-50 कोटीच्या निनावी जाहिरातीसाठी हात आखडता घेतला जात नसेल, तर मग आमच्या शेतकऱ्याला मदत देण्यासाठी हात आखडता का घेतला जातोय? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. रोहित पवार म्हणाले, आज राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळं शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला असताना सरकारने शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करणे गरजेचं असताना सरकार मात्र हात आखडता घेताना दिसतंय. ऑगस्ट 2025 मध्ये नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीने बाधित झालेल्या 6.5 लाख हेक्टर क्षेत्रासाठी सरकारने 553 कोटी रु म्हणजेच एका शेतकऱ्याला 7148 रु. मदत जाहीर केली आहे, ही मदत पुरेशी नाही.

# एसटी प्रवाशांची होणार अडचण

### गोपीचंद पडळकर व सदाभाऊ खोतांच्या संघटनेकडून आंदोलनाचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** ऐन दिवाळीच्या काळातच एसटी प्रवाशांना अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वातील संघटनेकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आंदोलन सुरू करू, असा इशारा सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेने दिला आहे. यानुसार मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन संघटनेकडून करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सातवा वेतन आयोग तसेच दिवाळी बोनस यांसह विविध मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सेवा शक्ती एसटी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच या मागण्या मान्य न झाल्यास 28 सप्टेंबरपासून आक्रमक आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच 1 ऑक्टोबरपासून सर्व स्तरातील कर्मचारी मुंबईतील मुख्यालयासमोर उतरतील, असेही सांगण्यात आले आहे.

सेवा शक्ती एसटी कर्मचारी संघटनेकडून 2006 पासून शासन कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन लागू करावे, 2016 पासून थकीत घरभाडे, भत्ते आणि महागाई भत्ता द्यावा, सातवा वेतन आयोग लागू करावा, दिवाळी बोनस 20 हजार रुपये द्यावा तसेच आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना 8.5 लाख रुपयांची मदत द्यावी, संप काळात दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, रिक्त पदांवर नवीन भरती करण्याची मागणी करण्यात आली आहे.



तसेच 2015 पासून जी प्रवास भाडेवाढ झाली आहे त्याची पूर्वलक्षीपणे पूर्तता करावी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एक रकमी लाभ द्यावा व राप कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांबाबत सोडवणूक न झाल्याने आक्रमक आंदोलनाचा इशारा संघटनेकडून देण्यात आला आहे. याचसोबत महामंडळाची स्थावर मालमत्ता उद्योग योग्यतेच्या धर्तीवर चालवावी किंवा शासनात विलीन करावी, अशी मागणी देखील संघटनेने केली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास 28 सप्टेंबरपासून आक्रमक आंदोलन सुरू होणार असून 1 ऑक्टोबरपासून मुंबईतील मुख्यालयासमोर मोठ्या प्रमाणात कर्मचारी धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

इतकेच नव्हे तर शासनाने वेळेत निर्णय घेतला नाही, तर उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी सरकारवर राहील, असाही इशारा संघटनेने दिला आहे.

## राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ मिळत नसल्याने लांबणीवर पडलेले क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार अखेर गुरुवारी जाहीर करण्यात आले. राज्य सरकारने यंदा १०९ शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली असून दोन शिक्षकांना विशेष बाब म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा २२ सप्टेंबर रोजी होणार आहे.



राज्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरविण्यात येते. त्यानुसार १ सप्टेंबरपूर्वी पुरस्कार जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र यंदा मुख्यमंत्री कार्यालयाने वेळ न दिल्याने हे पुरस्कार पुढे ढकलण्यात आले होते. अखेर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने गुरुवारी या पुरस्कारांची घोषणा केली. सात प्रवर्गांमध्ये १०९ शिक्षकांना हे पुरस्कार दिले जाणार आहेत. त्याशिवाय काही प्रवर्गांमध्ये शिक्षकांना पुरस्कारप्राप्त शिक्षकांएवढेच गुण मिळालेले असतात. पण त्या प्रवर्गांमध्ये पुरस्कार्थींची संख्या निश्चित असल्याने त्यांचे नाव जाहीर होत नाही. पण या शिक्षकांची उमेद वाढवण्यासाठी यंदापासून अशा दोन शिक्षकांना राज्य शिक्षक विशेष गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, आदिवासी क्षेत्रात काम करणारे शिक्षक, थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका, विशेष शिक्षक (कला/क्रीडा), दिव्यांग शिक्षक, आणि स्काऊट-गाईड या सात प्रवर्गांमध्ये पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

### एनएसईएल घोटाळ्यातील गुंतवणूकदारांना ७९२ कोटींचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** ५६०० कोटी रुपयांच्या नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लि. (एनएसईएल) घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाने आतापर्यंत सात हजार ५३ गुंतवणूकदारांना ७९२ कोटींचे वाटप केले आहे. दहा लाख किंवा त्यापेक्षा कमी रक्कम असलेल्या गुंतवणूकदारांना शंभर टक्के रक्कम मिळाली असून दहा लाख रुपयांवरील गुंतवणूकदारांपैकी १५०० जणांना आतापर्यंत ३० टक्के रकमेचे वितरण झाले आहे. एनएसईएलशी संबंधित आणखी अडीच हजार कोटी रुपयांच्या मालमत्तेचा लिलाव अपेक्षित असून त्यामुळे सहा हजारांहून अधिक मोठ्या गुंतवणूकदारांच्या पदरात गुंतवणुकीच्या ४५ टक्के रक्कम पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती या तपासाशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. २०१३ मध्ये उघड झालेल्या या घोटाळ्याची आर्थिक गुन्हे विभागासोबतच केंद्रीय गुप्तचर विभाग (सीबीआय) आणि सक्तवसुली संचालनालय चौकशी करीत आहे. त्यापैकी काही मालमत्तांचा लिलाव झाला असून त्यापैकी ७९२ कोटी रुपयांचे वितरण मुंबई पोलिसांनी छोट्या गुंतवणूकदारांना केले आहे.

## बळीराजा संकटात, ओला दुष्काळ जाहीर करावा : जयंत पाटील



**मुंबई :** राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागांत पूरस्थिती निर्माण झाली असून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. "बळीराजा इतक्या अडचणीत असताना या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही?" असा सवाल त्यांनी पत्राद्वारे विचारला आहे. राज्यातील जवळपास 30 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे लाखो शेतकरी बाधित झाले आहेत. शेती पिके, घरे, जनावरे आणि गोठे पाण्याखाली गेल्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी सरकारने त्वरित पावले उचलणे आवश्यक असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

### वीजग्राहकांचे समाधान हे महावितरणच्या अभियंत्यांचे कर्तव्य

# राष्ट्रीय अभियंता दिन उत्साहात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** मूलभूत गरज बनलेल्या वीजक्षेत्रामध्ये महावितरण अभियंत्यांच्या कामगिरीचा उज्ज्वल व ऐतिहासिक वारसा आहे. राज्याच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यासह अंधारलेल्या वाटा, घरे प्रकाशाने उजळण्याचे भाग्य महावितरणचे अभियंत्यांना मिळाले आहे. वीजजोडणीद्वारे विजेचा लखलखाट झाल्यावर घरगुती, शेतकरी, औद्योगिक, व्यावसायिक व इतर ग्राहकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला सुरवात होते. या सेवेचा ग्राहकांना जो आनंद व समाधान मिळतो तोच खरा परमार्थ आहे आणि ग्राहकांना कायम समाधान देणारी सेवा देणे आपले कर्तव्य आहे असे मार्गदर्शन महावितरणच्या संचालकांनी मनोगतांमधून केले.



भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्ताने महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयात गुरुवारी (दि. १८) राष्ट्रीय अभियंता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून संचालक सचिन तालेवार (प्रकल्प/संचालन), राजेंद्र पवार (मानव संसाधन), सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे (कोकण विभाग), कार्यकारी संचालक सर्वश्री प्रसाद रेशमे, धनजंय औंढेकर, परेश भागवत, भुजंग खंदारे, दत्तात्रेय पडळकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

संचालक सचिन तालेवार म्हणाले, महावितरणचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी डोंगरदऱ्या, अतिदुर्गम भागात वीजयंत्रणा उभारून राज्याच्या प्रगतीला वेग दिला आहे. वीजग्राहकांशी प्रकाशाचे नाते जोडले आहे. हे नाते ग्राहकसेवेतून भक्कम व अतूट राहावे यासाठी सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेने अभियंता म्हणून कार्यरत राहावे.

संचालक राजेंद्र पवार म्हणाले, कोणत्याही व्यक्तीचा किंवा प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास हा विजेअभावी शक्य नाही. वीज क्षेत्र अनन्यसाधारण महत्वाचे आहे. या क्षेत्रात काम करताना कंपनीहित व ग्राहकहितासाठी योगदान देत राहणे, ही आपली महत्वाची जबाबदारी आहे. अत्यंत प्रतिकूल व खडतर परिस्थितीत महावितरणचे अभियंते व कर्मचारी वीज सेवा देण्यासाठी ज्या धैयार्ने, गतीने, सांघिकतेने काम करतात त्याचाही राज्यात नावलौकिक आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे म्हणाले, अभियंत्याचा वारसा हा प्राचीन काळातील विश्वकर्मा यांच्यापासून ते डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्यापर्यंतचा आहे. नव तंत्रज्ञानातून हा वारसा सध्याच्या अभियंता पिढीकडूनही आणखी समृद्ध होत आहे.

यावेळी कार्यकारी संचालक सर्वश्री प्रसाद रेशमे, धनजंय औंढेकर, परेश भागवत, भुजंग खंदारे, दत्तात्रेय पडळकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले. कार्यक्रमाला क्षेत्रीय मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच मुख्यालयातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# चाकोरीबाहेरील मैत्रीणी कर्तृत्ववान महिलांचा कृतज्ञता सोहळा पनवेलमध्ये

### मनमुक्त फाऊंडेशनचा ऐतिहासिक उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी, नवी मुंबई, दि. १९ :** सामान्यतेच्या चाकोरी मोडून अपार जिद्दीने स्वतःचा प्रवास घडवणाऱ्या महिलांचा गौरव करणे हे केवळ स्त्रीशक्तीचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून मनमुक्त फाऊंडेशन तर्फे येत्या शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजता सुरुची हॉल, पनवेल येथे चाकोरीबाहेरील मैत्रीणी, कृतज्ञता सोहळा हा ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित केला जात आहे.

महाराष्ट्रातील स्त्रीशक्तीच्या प्रवासाला नवा आयाम देणारा हा उपक्रम ठरणार आहे. स्थापनेपासूनच मनमुक्त फाऊंडेशनने मानसिक आरोग्य संवर्धन, विधवा व परित्यक्ता महिलांचे पुनर्वसन, युवक व्यक्तिमत्त्व विकास, अनाथ मुलांचे शिक्षण आणि ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. व्यक्त व्हा, रिक्त व्हा, मुक्त व्हा या ध्येयवाक्याने सुरू झालेली ही चळवळ समाजातील उपेक्षित घटकांना नवजीवन देत आहे. याच सामाजिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आपल्या कार्यानें समाजात वेगळा ठसा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सामूहिक गौरव. घरगुती जबाबदाऱ्या, परंपरागत बंधने, आर्थिक मर्यादा आणि समाजातील दृष्टीकोन या साऱ्यावर मात करत या स्त्रियांनी स्वतःचा मार्ग निर्माण केला. अशाच दहा प्रमुख सन्मानार्थींमध्ये मनीषा यादव, अनिता कोलते, गीता जुन्नरकर-राऊत, प्रतीक्षा वाडे, सुचित्रा घोगरे-काटकर, नेहा दाबके, स्मिता गायकवाड, सुरेखा काटकर, संध्या गायकवाड आणि देवयानी गोविंदवार या महिलांचा विशेष उल्लेख आहे. त्यांचे कार्य वैयक्तिक यशापलीकडे

मनमुक्त फाउंडेशन
Platform of Transformation

जाऊन समाजासाठी दीपस्तंभ ठरले आहे. या कृतज्ञता सोहळ्याला राज्यातील नामांकित व्यक्तिमत्त्वे उपस्थित राहून महिलांच्या या यशगाथांना मानाचा मुजरा करणार आहेत. मनीषा वर्मा (अपर मुख्य सचिव, प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता व सुशासन, महाराष्ट्र), अंजली ढमाळ (उपसंचालक, मराठी भाषा विभाग, मंत्रालय), डॉ. वैशाली पाटील (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व संचालिका, अंकुर ट्रस्ट) आणि ललिता बाबर (उपआयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका) या मान्यवरांची उपस्थिती सोहळ्याचे वैभव अधिक वाढवेल. हा कार्यक्रम केवळ सन्मानापुरता मर्यादित नाही, तर समाजातील प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. स्त्री ही घरापुरती मर्यादित नसून समाजाच्या प्रगतीची दिशा ठरवणारी शक्ती आहे, हा संदेश या सोहळ्यातून दिला जाणार आहे.

मनमुक्त फाऊंडेशनतर्फे सांगण्यात आले की, हा सन्मान म्हणजे स्त्रीच्या प्रवासाला दिलेला मान आहे. तिच्या संघर्षातले अश्रू, ओठांवरील हास्य आणि समाजासाठी केलेले कार्य, या साऱ्याला कृतज्ञतेची आदरांजली वाहण्याचा हा सोहळा आहे. आपल्या उपस्थितीने हा सन्मान अधिक अर्थपूर्ण ठरेल. पनवेल शहराला या दिवशी एका प्रेरणादायी इतिहासाचा साक्षीदार होण्याची संधी मिळत आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाला पुन्हा धमकीचा ई-मेल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** हुतात्मा चौक येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीत बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा ई-मेल पुन्हा प्राप्त झाला. या प्रकरणानंतर मुंबई पोलिसांनी शुक्रवारी सकाळी उच्च न्यायालयात शोध मोहीम राबवली, पण त्यात काहीच संशयास्पद सापडले नाही. यापूर्वीही गेल्या आठवड्यात उच्च न्यायालयाला बॉम्बची धमकी प्राप्त झाली होती. त्यावेळी कोर्टरुम रिकामे करून तपासणी करण्यात आली होती.

उच्च न्यायालयाला शुक्रवारी पहाटे धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. त्यानंतर तातडीने सकाळीच उच्च न्यायालयात तपासणी करण्यात आली. पण काहीही संशयास्पद सापडले नाही, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. उच्च न्यायालयातील कामकाज सुरळीत सुरू असल्याचेही सूत्रांनी सांगितले.यापूर्वी गेल्या आठवड्यात दिल्ली व मुंबई उच्च न्यायालयाला एकाच दिवशी धमकीचे ई-मेल प्राप्त झाले होते. त्या दोन्ही प्रकरणामागे एकाच व्यक्तीचा सहभाग असल्याचा संशय आहे. पण आरोपीने डार्क नेट व व्हीपीएनचा वापर केला आहे.

# मीनाताई ठाकरे यांचा पुतळा आता पारदर्शक काचेने बंदिस्त करणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** मुंबईतील शिवाजी पार्क परिसरातील मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर बुधवारी समाजकंटकांनी लाल रंग फेकल्याची घटना घडल्यानंतर आता अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून शिवसेनेतर्फे (ठाकरे) विशेष काळजी घेण्यात येणार आहे. हा पुतळा आता पारदर्शक अशा काचेने बंदिस्त करण्यात येणार आहे. त्याचे कामही सुरू झाले आहे.





दादर येथील शिवाजी पार्क मैदानाच्या परिसरात असलेल्या मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर बुधवारी सकाळी काही समाज कंटकांनी लाल रंग फेकल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता पसरली होती. सकाळीच मोठ्या संख्येने सर्व शिवसैनिक आणि पदाधिकारी, कार्यकर्ते एक एक करून जमू लागले होते. या घटनेमुळे या परिसरात काही काळ तणाव पसरला होता. समाजकंटकांनी बुधवारी पुतळ्यावर मोठ्या प्रमाणात लाल रंगाचा ऑईल पेंट टाकला होता. हा रंग काढण्यासाठी तब्बल चार लिटर थिनर वापरण्यात आले. शाखाप्रमुख अजित कदम आणि माजी शाखाप्रमुख चंद्रकांत झगडे यांच्यासह शिवसैनिकांनी हा रंग घासूनपुसून काढून टाकला. पोलिसांनी बुधवारी मध्यरात्री या प्रकरणी एका आरोपीला अटकही केली. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून आता या पुतळ्याला काचेच्या तावदानाचे आवरण लावून बंदिस्त करण्याचा निर्णय शिवसेनेने (ठाकरे) घेतला आहे.

सुमारे १८ वर्षांपूर्वीही अशीच घटना घडली होती. तेव्हाही मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याला अज्ञात समाजकंटकांनी काळे फासले होते. अशा घटना वारंवार घडू नये म्हणून शिवसेनेने (ठाकरे) पुतळा बंदिस्त करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. पुतळ्याला विशिष्ट अशा न तुटणाऱ्या (अनब्रेकेबल) पारदर्शक काचेने बंदिस्त केले जाणार आहे. या पुतळ्याला असे आवरण बसवण्यात येणार होतेच. पण ही घटना घडल्यामुळे हे काम आता तातडीने हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी गुरुवारी पुतळ्याच्या आजूबाजूने छतही घालण्यात आले आहे.

शिवाजी पार्क मैदानाच्या परिसरात आधीच भारतीय क्रिकेटचे द्रोणाचार्य रमाकांत आचरेकर यांचे स्मृती स्मारक आहे. या स्मृती स्मारकामध्ये आचरेकरांचा पुतळा नसून बॅट, हेल्मेट, ग्लोज, बॉल, स्टम्प असे क्रिकेटचे साहित्य आहे. या स्मारकाप्रमाणेच मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याभोवती काच बसविण्यात येणार आहे.

# आश्रमशाळांतील ५२२३ विद्यार्थ्यांचे गोवर, रुबेलाचे लसीकरण करणार

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे निर्देश




■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १९ :

जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये वास्तव्यास असलेल्या ५ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी गोवर व रुबेला प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली असून, ही मोहिम ३० सप्टेंबरपर्यंत राबवण्यात येणार आहे. या लसीकरण मोहिमेंतर्गत एकही विद्यार्थी वंचित राहू नये, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

या मोहिमेच्या अनुषंगाने नुकतीच जिल्हाधिकारी मीना यांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा बैठक घेण्यात आली. यात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, तसेच गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेचे समन्वयक डॉ. विनोद करंजीकर हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी मीना यांनी सांगितले की, गोवर व रुबेला हे बालकांसाठी जीवघेणे ठरू शकणारे आजार असून, याचे निर्मूलन करण्यासाठी लसीकरण हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहिम वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण केली पाहिजे. जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये सध्या सुमारे ५ हजार २२३ विद्यार्थी वास्तव्यास असून, त्यांचे लसीकरण या टप्प्यात केले जाणार आहे, अशी माहिती डॉ. करंजीकर यांनी दिली. या लसीकरणासाठी आवश्यक मनुष्यबळ, औषधसाठा आणि वाहतूक सुविधा यांचीही पूर्तता करण्यात आली आहे. आरोग्य विभागाने यासाठी विशेष पथके स्थापन केली असून, लसीकरणाच्या कामात कोणतीही अडथळा येऊ नये म्हणून शाळा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय ठेवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांना यासंदर्भात माहिती देण्यात येत असून, त्यांच्या संमतीनेच लसीकरण केले जात आहे. या मोहिमेचे यशस्वी आयोजन हे केवळ आरोग्य यंत्रणेचेच नव्हे, तर समाजाचेही कर्तव्य असल्याचेही जिल्हाधिकारी मीना यांनी नमूद केले. बालकांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आणि रोगमुक्त समाज घडवण्यासाठी ही मोहिम महत्वाची आहे. त्यामुळे सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेमुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित राहणार असून, या उपक्रमामुळे दोन्ही आजारांचे उच्च प्रमाण हळूहळू कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास आरोग्य यंत्रणांनी व्यक्त केला आहे. ५ हजारावर विद्यार्थ्यांचे होणार लसीकरण जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांतील ५ ते १५ वयोगटातील ५,२२३ विद्यार्थ्यांचे गोवर व रुबेला लसीकरण ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोहिम राबवली जात आहे. आरोग्य विभागाने विशेष पथके तयार केली असून, शाळा प्रशासनाच्या सहकार्याने लसीकरण होत आहे. एकही विद्यार्थी वंचित राहू नये यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

# क्रीडामंत्री साधणार खेळाडू, प्रशिक्षकांशी संवाद

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १९ :

आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये देशात महाराष्ट्र अग्रणी असावा, येथे ऑलिम्पिक पदक विजेते घडावेत जेणेकरून ते जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राष्ट्राला जास्तीत जास्त संख्येत पदके जिंकून देतील. यासंदभार्तील तयारीची रूपरेषा तसेच धोरण निश्चित करण्यासाठी राज्याचे क्रीडा मंत्री माणिक कोकाटे हे खेळाडू, प्रशिक्षक, पालक, संघटक, मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक व क्रीडा पत्रकारांशी रविवार, २१ सप्टेंबरला संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत संवाद साधणार आहेत. या क्रीडा संवादात अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील खेळाडूंसह प्रशिक्षक, संघटक, पालक, मार्गदर्शकांचा सहभाग राहणार आहे. या सर्वांच्या प्रतिक्रिया जाणून घेत शासन २०४७ च्या राज्यातील प्रगत क्रीडा क्षेत्राचा आराखडा तयार करणार असल्याची माहिती प्रभारी क्रीडा उपसंचालक गणेश जाधव यांनी दिली. राज्य शासनाचा हा अभिनव उपक्रम असून या निमित्ताने मुख्यत्वे ग्रामीण भागातील क्रीडा समस्यांवर चिंतन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा विचार करता ऑलिम्पिकमधील प्रतिनिधीत्व हे शुन्य आहे. अमरावतीने उत्तम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवलेत. परंतु, त्यापैकी कोणीही ऑलिम्पिकपर्यंत मजल मारू शकला नाही. अमरावती जिल्हा हा विदभार्ची सांस्कृतिक व क्रीडा राजधानी म्हणून प्रसिद्ध आहे.

येथे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळासह कुस्तीच्या आखाड्यांमुळे खेळांसाठी पोषक वातावरणाची निर्मिती झाली आहे. अमरावतीला राज्य शासनाने डीम क्रीडा विद्यापीठही दिले आहे. एवढेच नव्हे तर शिक्षण क्षेत्रातही अमरावतीचा चांगलाच नावलौकिक आहे. महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे हे शहर मुख्यालय आहे. मेळघाटात शोध घेतल्यास उत्तम आदिवासी प्रतिभा मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

# रुग्णांच्या नातेवाइकांना अन्नदान करणारा लायन्स क्लब




■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. १९ :

कोणत्याही प्रकारचा स्वार्थ भाव न ठेवता केवळ सेवा करण्याच्या उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्य करणाऱ्या येथील लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांतर्फे मागील आठ वर्षापासून येथील सामान्य रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांना एक वेळचे मोफत भोजन रूपाने अन्नदान वितरणाचे काम अविरतपणे करण्यात येत आहे.

जिल्ह्यात आज अनेक सेवाभावी संस्था, क्लब, संघटना कार्यरत आहेत. ते अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवत असले तरी भोजनाचे अविरतपणे वितरण रुग्णांच्या नातेवाइकांना करत नसतील. परंतु असे कार्य जिल्ह्यात केवळ लायन्स क्लब खामगाव तर्फे करण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ १७ जून २०१७ रोजी करण्यात आला अन्न दानासाठी लागणारा खर्च क्लबचे पदाधिकारी करीत आहेत. रुग्णांच्या नातेवाइकांसाठी हा उपक्रम वरदान ठरत आहे. हळूहळू लोकांना या उपक्रमाची माहिती होत गेली. चांगला उपक्रम असल्याने या उपक्रमात फुल नाही तर फुलाची पाकळी या रूपाने आपला सहभाग असावा, यासाठी अनेक लोक या कार्यात सहभागी होत आहेत. त्यापैकी कोणी आपल्या आपल्या मित्राच्या जन्मदिनी, स्मृतिदिन, पुण्यतिथी दिनी अन्नदान करीत आहेत.यासाठी त्या व्यक्तीला घरून अन्न तयार करून आणावे लागत नाही तर त्यासाठी लागणारी रक्कम लायन्स क्लब कडे भरल्यास अन्न क्लब तर्फे तयार करण्यात येते. ज्यांच्या तर्फे ज्या दिवशी अन्नदान असते त्या दिवशी अन्नदान वितरणाचा शुभारंभ त्या परिवारातील सदस्यांच्या हस्ते करण्यात येतो. अन्नदानात दोन मोठ्या आकाराच्या पोळ्या, भाजी व भात याचा समावेश आहे. दररोज वेगवेगळी भाजी असते आणि भाताचे प्रकार हे वेगवेगळे असतात. अन्नछत्रात अन्न दान करण्यासाठी किशोर गरड, दिनेश गांधी, गिरीश धरमठोक, नितेश कमानी, यांच्या यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष तुषार कमानी, सचिव डॉ गिरीश पवार, कोषाध्यक्ष कुणाल भिसे, सह प्रकल्प प्रमुख किशोर गरड, दिनेश गांधी, गिरीश धरमठोक, अशोक केला, शंकर परदेशी, लोकेश मुदलियार, मितेश कमानी, नरेंद्रसिंग, छाबरा, रमेश भुतडा, सागर गुर्जर यांचा सिंहाचा वाटा आहे.

## कमळजा मातेच्या मंदिरासाठी पाऊलवाट; भाविकांत समाधान

■ महासागर प्रतिनिधी, लोणार, दि. १९ :

जगप्रसिद्ध लोणार सरोवरातील पाणीपातळी वाढल्याने त्यामधील ऐतिहासिक कमळजा मातेच्या मंदिराकडे जाण्यासाठीचा पारंपरिक मार्ग बंद झाला असला तरी, भाविकांसाठी नवीन पाऊलवाट तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामध्ये भाविकांसह पर्यटकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आक्षेपानंतरही चांदूर रेल्वे न.प.ची मूळ प्रभाग रचनाच पाठवली शासनाकडे

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर रेल्वे, दि. १९ :

प्रभाग रचनेवर दाखल झालेल्या आक्षेप-हरकतींनुसार कोणताही बदल न करताच प्रारूप प्रभाग रचनेचा मूळ आराखडाच शासनाकडे पाठवण्यात आल्याचे चांदूर रेल्वे नगर परिषदेने स्पष्ट केले आहे. तसेच आक्षेपांबाबत काहीही कळवले नसल्याचे आक्षेपकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आक्षेपकर्ते आता न्यायालयीन लढाई लढण्याची भूमिका घेणार आहेत.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगर क्षेत्र अधिनियम, १९६५ च्या कलम १०(१-अ) व त्यानंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नगर परिषदेसाठी लोकसंख्येप्रमाणे प्रभागांची रचना केली जाते. प्रत्येक प्रभागातील लोकसंख्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त अथवा कमी नसावी. प्रभाग रचना करतांना भौगोलिक सलगता, नैसर्गिक अडथळे, रस्ते, नदी, पूल, रेल्वे मार्ग इ. बाबींचा विचार करणे बंधनकारक असल्याचा नियम आहे. अशातच चांदूर रेल्वे नगर परिषदेसाठी १० प्रभाग व २० नगरसेवक अशी रचना करण्यात आली आहे. मात्र, नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रचनेत अनेक विसंगती राहिल्या आहेत. काही प्रभागांत लोकसंख्या सरासरीपेक्षा १० टक्क्यांपेक्षा जास्त, तर काही प्रभागांत सरासरीपेक्षा १० टक्क्यांपेक्षा कमी लोकसंख्या ठेवण्यात आली आहे. यामुळे प्रतिनिधित्वातील असमानता निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने नागरिकांना आक्षेप दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंतची मुदत दिली होती.

# प्रामाणिकता असेल तरच आंदोलन यशस्वी होते

## प्रकाश आंबेडकरांनी घेतला ओबीसी नेत्यांच्या धरसोड वृत्तीचा समाचार




■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १९ :

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शुक्रवारी राज्यातील ओबीसी नेत्यांच्या धरसोड वृत्तीचा समाचार घेतला आहे. कोणतेही आंदोलन यशस्वी होण्यासाठी त्यात प्रामाणिकता असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर माझी भूमिका धरसोड वृत्तीची आहे का? हा प्रश्न ओबीसीच्या सर्वच नेत्यांनी स्वत:ला विचारला पाहिजे, असे ते म्हणालेत.

सकल ओबीसी समाजाच्यावतीने अकोला येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'ओबीसी आरक्षण बचावा'साठी आमरण उपोषण सुरू आहे. प्रकाश आंबेडकरांनी शुक्रवारी सकाळी उपोषणस्थळी जाऊन आंदोलकांची भेट घेतली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी ओबीसी नेत्यांना व घटकांना वरील सल्ला दिला. ते म्हणाले, ओबीसींच्या आरक्षणाच्या ताटात वाटेकरी नको ही भूमिका आमची सुरुवातीपासून आहे. गरीब मराठा समाजाच्या आरक्षणाचे ताट वेगळे आणि ओबीसी आरक्षणाचे ताट वेगळे असले पाहिजे. पण कोणतेही आंदोलन यशस्वी व्हायचे असेल, तर त्यात प्रामाणिकता ही महत्त्वाची आहे. प्रामाणिकता नसेल तर आंदोलन यशस्वी होत नाही.

ओबीसी समूहातील सर्व घटकांनी स्वतःहून स्वतःला विचारले पाहिजे की, ओबीसी आरक्षण प्रश्नी माझी धरसोड वृत्ती आहे का? तसे असेल तर आपला प्रश्न कसा सुटेल? ओबीसी हा वेगळा घटक आहे. त्याचे प्रश्न आहेत, अडचणी आहेत, या गोष्टींची जाणीव झाली पाहीजे. ओबीसीच्या सर्व नेत्यांनी हे तपासले पाहिजे की, आपण ज्या पक्षात आहोत, त्या पक्षांची भूमिका काय आहे? त्या पक्षाची भूमिका ओबीसी आरक्षण विरोधात असेत, तर तो प्रश्न सुटणार नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ओबीसी नेते ज्या पक्षात काम करतात त्या पक्षाची भूमिका विरोधात असेल, तर आपण कितीही लढलो, कितीही उपोषणे केली, तरी हा प्रश्न धसास लागणार नाही. आरक्षणाचा लढा केवळ ओबीसी समाजाच्या हितातच नाही तर समाजात न्याय व समानता कायम राखण्यासाठीही आवश्यक आहे.

## नवरात्रोत्सव काळात शहरातील वाहतुकीत बदल

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १९ :

नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार असून मोठी देवी संस्थान, बुलढाणा येथे दहा दिवसांचा उत्सव पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर वाहतुकीच्या सुनियमन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरातील वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आदेश जारी केले आहे. वाहतुकीच्या सुनियमनासाठी बुलढाणा शहरातील जड वाहतूक 22 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर रोजी रात्री 12 वाजेपर्यंत त्रिशरण चौक, बुलढाणा ते तहसिल चौक, जयस्तंभ चौक बुलढाणा या रोडवरुन येणाऱ्या वाहतुकीसाठी त्रिशरण चौक-सर्क्युलर रोड -धाड नाका- जयस्तंभ चौक हा पयार्यी मार्ग आणि जयस्तंभ चौक, तहसिल चौक, बुलढाणा ते त्रिशरण चौक, बुलढाणा रोड वरुन जाणाऱ्या वाहतुकीसाठी जयस्तंभ चौक, धाड नाका सर्क्युलर रोड - त्रिशरण चौक हा पयार्यी उपलब्ध करण्यात आला.

# डॉक्टरांच्या संपामुळे रूग्णसेवा ठप्प



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १९ :

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मध्ये स्वतंत्र नोंदणी रजिस्टरमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत. हे डॉक्टर आधीच महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलमध्ये नोंदणीकृत आहेत. शासनाच्या या परिपत्रकाचा विरोध करत इंडियन मेडीकल असोसिएशनच्या वतीने आज १८ सप्टेंबर रोजी हॉस्पिटल बंद ठेवण्यात आले होते. याचा परिणाम नियमित उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांवर झाला होता. तर अत्यावश्यक असलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आली होती. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून हॉस्पिटल पुर्ववत सुरु होणार आहेत.

या बाबत आयएमएच्या वतीने सांगण्यात आले की, हा निर्णय शासनाच्या ११ जुलै २०२४ च्या स्वतःच्या परिपत्रकाच्या विरोधात असून, या विषयावरचा खटला मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना घेतलेला हा निर्णय कायद्याला धरून नसून, न्यायालयाचा अवमान करणारा आहे. या निर्णयामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेवर गंभीर धोका निर्माण होईल. आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा व व्यवसायाचा दर्जा घसरेल. अपुरे प्रशिक्षण घेतलेले डॉक्टर रुग्णांवर उपचार करणे म्हणजे थेट जिवाशी खेळणे आहे. त्यामुळे आयएमए ने १८ सप्टेंबर रोजी एक दिवशी संप पुकारला आहे. हा लढा रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आणि वैद्यकीय व्यवसायाच्या सन्मानासाठी आहे. शासनाने निर्णय मागे घेतला नाही तर, पुढील आठवड्यात आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चा व बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचा इशाराही आय एम ए ने दिला आहे.

या बाबत आयएमचे जिल्हा सचिव डॉ. जी. वाय व्यवहारे म्हणाले की, या संपामुळे रुग्णांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. परंतु हा संप डॉक्टरांच्या व्यावसायिक फायद्यासाठी नाही, तर रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आहे. आज राज्य शासनाने होमिओपॅथी सीसीएमपीना (ॲलोपॅथी) पद्धतीने उपचार करण्याचा परवाना दिला आहे. हा निर्णय रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण करणारा आहे. डॉक्टर म्हणून आमचे कर्तव्य फक्त उपचार करणे नाही, तर रुग्णांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हेही आहे. म्हणूनच संप करून राज्य शासनाला जागृत करत आहोत.


**महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर**
**दरपत्रक सूचना**

राष्ट्रीय हातमाग विकास योजनेअंतर्गत मा. विकास आयुक्त (हातमाग), नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 4/33/2025/DCH/P&E/Maharashtra/87, दिनांक 11 जून 2025 नुसार महाराष्ट्र राज्यात स्पेशल हॅण्डलूम एक्स्पोचे आयोजन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांना मंजूरी मिळालेली आहे. करीता महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांचेद्वारे कुसुमताई वानखेडे भवन, उत्तर अंबाझारी रोड, धरमपेठ, नागपूर येथे दिवाळी निमीत्त स्पेशल हॅण्डलूम एक्स्पो दिनांक 06 ते 19 ऑक्टोबर या कालावधीत आयोजीत करीत आहे. एक्स्पोकरीता तात्पुरती स्टॉल उभारणी करणे, डेकोरेशन, विद्युत खर्च व प्रदर्शनीच्या प्रचार प्रसिध्दीकरीता ईव्हेंट मॅनेजरची (वर्तमानपत्र वगळता) नियुक्ती करणेसाठी दिनांक 20.09.2025 पासून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक इव्हेंट मॅनेजरनी कृपया दिनांक 26.09.2025 पर्यंत महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., उमरेड रोड, नागपूर स्थित कार्यालयातून कार्यालयीन वेळेत स्पेशल हॅण्डलुम एक्स्पोकरिता रुपये 3400/- + 18% जी.एस.टी. (एकुण रुपये 4012/- ना परतावा) रोखीने भरून दरपत्रक फॉर्म प्राप्त करुन दिनांक 26.09.2025 ला दुपारी 2.00 वाजेपर्यंत हातमाग महामंडळाचे मुख्यालयात सादर करावयाचे आहे. दरपत्रक महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., हातमाग परिसर उमरेड रोड, मुख्य कार्यालय, नागपूर -440009 येथे दिनांक 26.09.2025 ला दुपारी 3.00 वाजता उघडण्यात येईल. स्पेशल हॅण्डलुम एक्स्पोसाठी दरपत्रकासोबत अनामत रक्कम रुपये 50000/- नेट बँकिंगद्वारे जमा करणे आवश्यक आहे. दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारणे वा रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक
म. रा. हातमाग महामंडळ मर्या., नागपूर

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय : लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११००५
H.O.: 'Lokmangal', 1501, Shivajinagar, Pune - 411005

नागपुर अंचल /Nagpur Zone
"महाबैंक भवन", सिताबर्डी, नागपुर-४४००१२
"Mahabank Bhavan", Munje Chowk, Sitabuldi, Nagpur - 440012
टेलिफोन / Telephone : 0712-2545020/21/29
ई-मेल/E-mail : Gad_nag@mahabank.co.in

दिनांक : 19/09/2025

**परिसर चाहिए**

बैंक ऑफ महाराष्ट्र को एटीएम सुविधा के साथ अपने शाखा परिसर के उद्देश्य हेतु उचित रुप से आर.सी.सी से निर्मित, मुख्य रोड पर भूतल पर पर्याप्त पार्किंग स्थान व सभी अन्य सुविधाओ सहित निम्न स्थानो पर / निकटवर्ती स्थानों पर परिसर लीज पर चाहिए। **(बैंक की आवश्यकता नुसार मकान मालिक को अपने स्वय के खर्च पर स्ट्राँग रूम निर्मित करना होगा।)**

| क्र. | शाखा का नाम | कार्पेट एरिया |
|---|---|---|
| १) | मनिष नगर बेसा | 800-1200 Sq. Ft. |

संपत्ती का स्पष्ट हक रखने वाले इच्छुक व्यक्ति निर्धारित प्रारुप मे दो अलग-अलग बंद लिफाफों मे दो पध्दति व्यवस्था (तकनीकी व वित्तीय) के अंतर्गत अपने आवेदन प्रस्तुत करें। लिफाफे पर तकनीकी व वित्तीय ऐसा स्पष्ट रुप से लिखिए। निर्धारित आवेदन पत्र बिना शुल्क के निम्नलिखित पते से दिनांक **20/09/2025 से 26/09/2025** तक प्राप्त कर सकते है। **अंचल कार्यालय - सामान्य प्रशासन विभाग, बैंक ऑफ महाराष्ट्र, सिताबर्डी नागपुर-440012** (फोन नं. **8329385728**) या बैंक की वैबसाईट **www.bankofmaharashtra.in** से डाउनलोड कर सकते है। उचित रुप से भरे हुए आवेदन दिनांक **26/09/2025** को शाम ५:०० बजे या उसके पहले उपरोक्त पते पर जमा करें। विज्ञापन कोई या सभी प्रस्तावों को बिना कोई कारण बताए स्वीकार या अस्वीकार करने का अधिकार सुरक्षित रखता है। विचौलिए कृपया क्षमा करें।

अंचल प्रबंधक
नागपुर अंचल



महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, नागपुर**
ई-मेल-div1nagpur.ee@mahapwd.com
**ई-निवीदा सुचना क्रमांक 40/RAC/2025-26**
फक्त सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांसाठी

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. १, नागपुर हे महाराष्ट्र शासनाचे सा.बां. विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामा करीता बि.१ नमुन्यात निविदा प्रणालीदवारे (ऑनलाईन) निवीदा मागवीत आहेत. निवीदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र. १,नागपुर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निवीदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रू. लाखात) | निवीदा प्रपत्र किंमत (रूपये) | काम पुर्ण करण्याचा कालावधी (महीने) |
|---|---|---|---|---|
| 1. | Repairs to Roofing, Ceiling & Floors to Wireless Office & Anti Terrorist Squad (ATS), Nagpur Unit at Police Control Room Premises for Winter Assembly - 2025 at Nagpur | 10.12 | 590/- | 1 Months |
| 2. | Repairs to Broken Furniture in Building No.1,2,3,4 & canteen during winter assembly session 2025 at MLA Hostel,civil lines,Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 3. | Replacement of Damaged Profile sheet in the Premises of MLA Hostel civil lines,Nagpur for RAC-2025 | 10.12 | 590/- | 1 Months |
| 4. | Cleanigng and Repairs to RCC Drain,Sewer line,Cutting grass, Providing RCC Cover, Removal of Debries in the premises of MLA Hostel, Civil lines, Nagpur, During RAC-2025 | 10.12 | 590/- | 1 Months |
| 5. | Leveling of ground and providing murum for detention camp at Dabha, Sadbhavana Lawn Jafar Nagar, Opposite of NIT Hall and mess Building For RAC Session 2025 Dist Nagpur | 10.12 | 590/- | 1 Months |
| 6. | Providing Repairs to Main Road with Drainage at RPTS Nagpur (RAC-2025) | 10.12 | 590/- | 1 Months |
| 7. | Repairs to Floor, Door & Window In Reporting Branch at Vidhanbhavan, Nagpur. | 12.65 | 590/- | 1 Months |
| 8. | Extention of height and Paiting to Compund Wall of New Hyderabad House at Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 9. | Replacement of flooring at courtyard and kitchen with misc works at new barrack , Old Hydrabad House, Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 10. | Providing painting & Repairing to Roof Ceiling Flooring, water supply & Sanitary to Type'B' 15 Qtr. at Ravi nagar colony (Qtrs no. 15/4, 16/1, 16/2, 16/3, 19/4), Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 11. | Providing painting & Repairing to Roof Ceiling Flooring, water supply & Sanitary to Type'B' 15 Qtr. at Ravi nagar colony (Qtrs no. 3/3, 5/3, 6/2,6/3, 7/1, 7/2, 7/3, 7/4), Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 12. | Providing, flooring, painting, water supply sanitary and other misc. Work to building no. 1,2,3,4 for(RAC-2025)at 450 constabulary (G+3) police line takali, nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 13. | Providing Flooring, Painting, Plumbing, Civil work and Other Misc. Works at Old Type-I (Qrt. no. 1/1 to 1/6) Quarters for RAC - 2025 at Milk Scheme Premises, Civil Lines, Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 14. | Providing Repairs to Flooring, Colouring & Civil Repairs to Dy. Collector Colony Bungalows in the premises of Dy. Collector Colony, Civil Lines, Nagpur for Winter Assembly - 2025 at Nagpur | 12.65 | 590/- | 1 Months |
| 15. | Providing fixing, water proofing, tiles inner outer painting window, door water supply and sanitary fitting, compound wall gate at Assistant Commissioner of Police Ravingar Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 16. | Laying Drinking Water Pipe Line In Barrack & Building , Ground Development & Laying & Repairs to Sewer Line and Repairing To strome water drain Line At 160 Teanament Nagpur. | 12.65 | 590/- | 1 Months |
| 17. | Colouring, Painting, Water supply sanitary arrangement and Misc. repairs works to Barrack no. 20,21(A+B) and Servant Quarter 1 & 2 at 160 Tenament Nagpur. | 20.25 | 590/- | 1 Months |
| 18. | Repairs & Painting, Polishing, Sanitary and Other Misc. Works In Various Cabin Of Old Anex Building (First Floor) at Vidhanbhavan, Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 19. | Repairs & Providing Painting, Polishing, Sanitary and Other Misc. Works In Various Cabin Of New Anex Building (Ground Floor) at Vidhanbhavan, Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |
| 20. | Repairs & Painting, Polishing, Sanitary and Other Misc. Works In Various Cabin Of New Building (Second Floor) at Vidhanbhavan, Nagpur. | 10.12 | 590/- | 1 Months |

१. या कामांचे निवीदा फार्म विक्री करीता http://mahatenders.gov.in, https://mahapwd.gov.in या संकेत स्थळाला भेट द्यावी. सदर निवीदा सुचनेची प्रत या कार्यालयातील सुचना फलकावर पहावयास मिळेल.
२. निवीदेच्या अटी व शर्थी प्रारूपात दर्शविल्याप्रमाणे राहील.
३. या निवीदा सुचनेत काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती शुध्दीपत्रक प्रकाशित होतील.
४. कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा संपुर्ण निविदा रदद अथवा फेरफार करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांनी राखुन ठेवलेला आहे.
५. ई-निवीदा पोर्टलवर "बिड लॉक" झाल्यानंतर निवीदांबाबत "हार्ड कॉपी"२ प्रतीत कंत्राटदारानी तिन दिवसाच्या आत सादर करणे अनिवार्य राहील.
६. सदर स्थापत्य कामाकरीता Post Qualification Criteria लागु राहील.

जावक क्र. १०८८३ दि. १७.०९.२०२५

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १
नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C2636

# पाकिस्तानबरोबर क्रिकेट, ऑपरेशन सिंदूर ते माझं कुंकू




इंडिया कॉलिंग

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

भारत - पाकिस्तान क्रिकेट सामन्याला उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेने नेहमीच विरोध केलेला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असतानापासूनचा हा विरोध आजही कायम आहे. जम्मू काश्मीरमधे पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद थांबत नाही तोपर्यत भारताने पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळू नये अशी शिवसेनाप्रमुखांची रोखठोक भूमिका होती. जम्मू- काश्मीरमधे जोपर्यंत हिंदुंचे रक्त सांडलो जात आहेत तोपर्यंत पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळता येणार नाही, दहशतवाद आणि क्रिकेट एकत्र चालणार नाहीत अशी गर्जना शिवसेनाप्रमुखांनी अनेकदा केली होती.

----------------

शिवसेनाप्रमुखांच्या घोषणेमागे निव्वळ कठोर देशभक्ति व देशप्रेम होते. तेव्हा भाजपा व ठाकरेंची शिवसेना यांच्यात महाराष्ट्रात युती होती. ठाकरेंच्या भूमिकेला छेद देण्याची तेव्हा भाजपाच्या कोणाही नेत्याची हिम्मत नव्हती. ठाकरेंचे बोट धरून महाराष्ट्रात भाजपा वाढत होती. तेव्हा ठाकरे म्हणतात ते भाजपाला शंभर टक्के बरोबर वाटत असे.

मग आता ठाकरेंच्या शिवसेनेने भारत - पाकिस्तान क्रिकेट सामन्याला विरोध केला म्हणून भाजपाचे नेते उद्धव ठाकरेंवर तुटून पडत आहेत. विशेष म्हणजे काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी एप्रिल महिन्यात हिंदू पर्यटकांवर पॉईंट ब्लँक गोळ्या झाडल्या व २६ जणांची हत्या केली. या घटनेला पाच महिनेही झाले नसताना भारताने पाकिस्तानबरोबर दुबईत जाऊन क्रिकेट सामना खेळायची गरज होती का ?

या सामन्यातून कोट्यवधी रूपयांची दोन्ही देशांना कमाई झाली असेल पण भारतातील कोट्यवधी जनता मात्र नाराज झाली . पाकिस्तानशी क्रिकेट खेळण्याचा निर्णय देशातील बहुसंख्य जनतेला पटलेला नाही . दुबईला पाकिस्तानबरोबर सामना खेळण्याचा निर्णय केंद्र सरकारचा आहे, नियामक मंडळ व खेळाडूंना तो मान्य करणे भाग पडले, असे सुनिल गावस्कर म्हणाले. माझ्या लोकांचे रक्त सांडले, ज्यांनी ते सांडवले त्यांच्यासोबत आम्ही का खेळावे? असा सवाल नाना पाटेकर यांनी विचारला आहे.

या सामन्याने आपण निराश झालो, खेळलो नसतो तर भारत आशियायी चषक स्पर्धेतून बाद झाला असता का ? असा प्रश्न भरत दाभोळकर यांनी विचारला आहे. रशियातील ऑलिम्पिकवर अमेरिकेने बहिष्कार घातला होता नि अमेरिकेतील ऑलिम्पिकवर रशियाने बहिष्कार घातला होता, याची आठवण करून दिली जात आहे. बहिणीच्या कुंकवापेक्षा (मंत्र्यांच्या) लेकाचे करिअर महत्वाचे अशी उपरोधिक टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे.

पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळायला विरोध म्हणून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने माझं कुंकू, माझा देश ही मोहीम राबवली. पक्षाच्या महिलांनी घरोघरी जाऊन जमा केलेल्या कुंकवाचे पार्सल दिल्लीला पंतप्रधानांकडे पाठवून दिले. भारत पाकिस्तान सामन्याला आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल, आयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांनीही जाहीरपणे विरोध केला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शांत राहणे पसंत केले.

पहलगाम येथे झालेल्या निर्घृण हत्याकांडानंतर भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूर मोहीम राबवून पाकिस्तानला धडा शिकविण्याचा प्रयत्न केला. शंभरपेक्षा जास्त दहशतवादी त्यात ठार झाले, पाकिस्तानमधील नऊ हवाई तळांवर भारतीय लढाऊ विमानांनी हल्ले केले. भारतातून पाकिस्तानात जाणाऱ्या सिंधू नदीचे पाणी रोखण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. रक्त आणि पाणी एकाचवेळी वाहू शकत नाही, असे स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठणकावले.

मग रक्त आणि क्रिकेट एकाच वेळी कसे चालू शकते, असा भेदक सवाल उध्दव ठकरे यांनी केला. देशात क्रिकेटप्रेमींची संख्या कोट्यवधी आहे. भारत पाकिस्तान सामना बघण्याचे आकर्षण मोठे असते. पण यावेळी लोकांमधे फारशी उत्सकता नव्हती. भारताने सामना जिंकल्यावरही जसे नेहमी फटाक्यांची आतषबाजी नाक्या नाक्यावर, चौका- चौकात होते तशी यावेळी बघायला मिळाली नाही. फटाक्यांच्या माळांचा आवाजही कुठे दणादणाला नाही. पहलगाम हत्याकांडानंतर पाकिस्तानविषयी लोकांच्या मनात असलेली चीड कमी झालेली नाही.

भारत- पाकिस्तान क्रिकेट सामन्याविषयी ठाकरेंची शिवसेना नेहमीच आक्रमक राहिली आहे. क्रिकेटपेक्षा राष्ट्रहित महत्वाचे आहे हीच शिवसेनेची त्यामागची भूमिका आहे. मुंबईत वानखेडे स्टेडियमवर ऑक्टोबर १९९१ मधे भारत पाकिस्तान क्रिकेट सामना ठरला होता. १८ ऑक्टोबर १९९१ रोजी भारत - पकिस्तान सामना मुंबईत होऊ देणार नाही, अशी घोषणा शिवसेनाप्रमुखांनी शिवतीर्थावरून केली. त्यावेळी सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री होते. सामना होणारच, टीव्हीवरून थेट प्रक्षेपण होईल असेही त्यांनी जाहिर केले.

शिवसेनाप्रमुखांचे कडवट शिवसैनिक शिशिर शिंदे यांनी मुलुंडमधील त्यांचे सहकारी राज केतकर, संजय घागरे, विलास पालवे, गणेश म्हात्रे, आदी शिवसैनिक बरोबर घेऊन २१ ऑक्टोबर १९९१ रोजी स्टेडियमवर धडक मारली व कुदळीचे घाव घालून तेथील धावपट्टीच उखडून टाकली. एवढेच नव्हे तर धावपट्टीवर त्यांनी इंजिन ऑईल ओतले. त्यावर सामना खेळता येणार नाही अशी व्यवस्था केली.

या घटनेची बातमी सर्वप्रथम बीबीसीने दिली. शिवसेना व शिशिर शिंदेचे नाव जगात पोचले. त्यांच्या आंदोलनाने सामना रद्द करणे भाग पडले. पोलिसांनी शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक केली. रात्रभर त्यांना आझाद मैदान पोलीस ठाण्यात ठेवले.

दुसऱ्या दिवशी कोर्टात जामीन मिळाल्यावर ते सर्व विजयी वीरांच्या थाटात मातोश्रीवर शिवसेनाप्रमुखांना भेटण्यासाठी गेले. तेव्हा त्यांचे स्वागत करण्यासाठी शिवसेनाप्रमुख स्वतः मातोश्रीच्या पायऱ्या उतरून खाली आले व त्यांच्या पाठिवरून हात फिरवून त्यांचे कौतुक केले. नंतर नगरसेवक व दोन वेळा आमदार झालेले शिशिर शिंदे आज एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत उपनेते आहेत.

जानेवारी १९९९ मधे दिल्लीत फिरोजशहा कोटला मैदानावर (अरूण जेटली स्टेडियम) भारत पाकिस्तान सामना ठरला होता पण तेथेही मुंबई प्रमाणेच शिवसैनिकांनी मैदानावर घुसून धावपट्टीची नासधूस केली. १९९३ मधे मुंबईत बॉम्बस्फोटाची मालिका घडविणाऱ्या कुविख्यात गँगस्टर दाऊद इब्राहीमला पाकिस्तानने अगोदर भारताच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी कोटला मैदानावरील सामन्याला शिवसेनेने विरोध केला होता.

हा सामना रद्द न करता पुढे ढलकण्यात आला व तो सामना चेन्नईला झाला. नंतर मात्र दुसरा सामना दिल्लीला घेण्यात आला. कोटला मैदानावरील याच सामन्यात अनिल कुंबळेने दहा गडी बाद करून विश्वविक्रम करणारा दुसरा गोलंदाज असा सन्मान मिळवला.

भारत पाकिस्तान सामन्याला विरोध म्हणून ठाकरेंच्या शिवसेनेने ऑक्टोबर २०१५ मधे मुंबईत पुन्हा आपला हिसका दाखवला. तेव्हा बीसीसीआयचे मुख्यालय मुंबईतच होते. बीसीसीआयचे अध्यक्ष शशांक मनोहर व पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष शहारयर खान यांची बैठक होणार होती.

शिवसैनिकांनी बीसीसीआयच्या कार्यालयावरच हल्ला केला व मोठी नासधूस केली. शिवसैनिकांनी तेथे पाकिस्तानविरोधी घोषणा दिल्या. अखेर भारत व पाकिस्तान क्रिकेट बोर्डांच्या अध्यक्षांची बैठक रद्द करणे भाग पडले. भाजपा व ठाकरेंची शिवसेना यांच्यात दुरावा निर्माण झाल्यापासून भाजपाने आपली वेगळी भूमिका मांडायला सुरूवात केली.

पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला ठाकरेंचा एवढा विरोध होता तर मग जावेद मियाँदाद या पाकिस्तानी क्रिकेटपटूला त्यांनी मातोश्रीवर येण्याचे निमंत्रण का दिले? असा प्रश्न भाजपाने विचारायला सुरूवात केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे चिरंजीव जय शहा हे बीसीसीआयचे अध्यक्ष आहेत, म्हणून ठाकरेंची शिवसेना अमित शहांना टार्गेट करीत आहे. पाकिस्तानबरोबर सामना झाला त्याचा जाब मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सदस्य असलेल्या शिवसेना आमदार मिलिंद नार्वेकरांना विचारा असा पलटवार भाजपाने ठाकरे सेनेवर केला आहे. भाजपाचे मंत्री आशिष शेलार हेही आशियायी क्रिकेट परिषदेचे सदस्य आहेत अशी आठवण ठाकरेंची शिवसेना करून देत आहे.

# नवरात्री उत्सवाचे पालटलेले स्वरूप !

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणून पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते.

आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. देवीने ९ दिवस महिषासुराशी युद्ध करून दहाव्या दिवशी त्याचा वध केला याचे प्रतीक म्हणून गुजरातमध्ये दांडिया खेळला जातो. दांडिया म्हणजे देवीच्या हातातील शस्त्र असून पूर्वी युद्धाच्या अविभार्वात तो खेळला जात असे. कालांतराने त्याला आता नृत्याचे स्वरूप आले आहे. महाराष्ट्रापासून गुजरात जवळच असल्याने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातही नवरात्री हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला आहे. त्यानिमित्ताने इथेही रासगरबा आणि दांडिया खेळला जाऊ लागला आहे.

हिंदूंच्या धार्मिक उत्सवांचे बाजारीकरण होऊ लागले आहे त्यापासून नवरात्री उत्सवही मागे राहिलेला नाही. नवरात्री उत्सवाचे मुंबईसारख्या शहरांत इव्हेन्ट होऊ लागले आहेत. धनाढ्य उद्योगपती, राजकारणी मोठी मैदाने आरक्षित करून याठिकाणी नऊ दिवस गरब्याचे कार्यक्रम आयोजित करतात. या इव्हेंटमध्ये मोठ्मोठे वाद्यवृंद, गायक आणि सिनेसृष्टीतील कलाकारांना बोलावून लोकांना आकर्षित केले जाते. स्पर्धांचे आयोजन करून प्रतिदिन उत्कृष्ट नृत्य आणि वेशभूषा करणाऱ्यांना बक्षिसे दिली जातात. गरब्यात सहभागी होणाऱ्यांसाठी शेकडोची प्रवेश फी आकारली जाते. श्रीमंतांची मुले या कार्यक्रमांत हिरीरीने सहभागी होतात.

नवरात्र हा खरेतर देवीच्या उपासनेचा उत्सव मात्र हल्ली जसे दहीहंडी उत्सवांत दहीहंडी नावाला आणि केवळ मानवी मनोऱ्यांचीच स्पर्धा पाहायला मिळते त्याप्रमाणे नवरात्री उत्सवांत देवीची उपासना नगण्य आणि तरुणांची मौजमजाच अधिक पाहायला मिळते आहे. गेल्या काही वर्षांत नऊ रात्रीच्या नऊ दिवसांत वेगवेगळ्या रंगाचे वेष परिधान करण्याचा ट्रेंड फोफावला आहे ज्याला धर्मशास्त्राचाच नव्हे तर तर्कशास्त्राचाही आधार नाही.

तरीही स्त्रीवर्ग यासाठी आधीच सज्ज होतो. यंदाच्या नऊ दिवसांचे नऊ रंग कोणते हे एकदा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले कि त्या रंगांचे कपडे आपल्याकडे सुस्थितीत आहेत का हे पाहिले जाते. नसतील तर ते खरेदी केले जातात.

नऊ दिवस वेगवेगळ्या रंगांचे कपडे परिधान करायचे म्हणजे त्या रंगाला अनुसरून कानातले, गळ्यातले, नाकातले दागिनेही मॅचिंग असायला हवेत, केशभूषाही त्यानुरूप असायला हवी, मग त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. स्त्री वर्गासह आता पुरुष वर्गही काही प्रमाणात या रंगसंगतीत सहभागी होऊ लागला आहे.

नवरात्रीच्या निमित्ताने गरब्यात नृत्य करायला जायचे म्हणून अनेक तरुण तरुणी नवरात्रीच्या एक महिना आधीपासूनच नृत्याचे वर्ग लावून घेतात, अर्थात नवरात्रीच्या निमित्ताने विशेष नृत्य शिकवणारे नृत्याचे वर्गही या दिवसांत मोठ्या प्रमाणात उदयास येतात. नृत्य करताना परिधान करण्यासाठी विशेष प्रकारचे पोषाखही खरेदी केले जातात. हे पोशाख विकणारेही या दिवसांत फॉर्मात असतात. हा सर्व प्रकार पूर्वी केवळ श्रीमंत वर्गात पाहायला मिळत असे; मात्र गेल्या काही वर्षांत यामध्ये मध्यमवर्गीय तरुण तरुणीही सहभागी होऊ लागले आहेत.

देवीच्या उत्सवाचे जसे बाजारीकरण होऊ लागले, तशा काही विकृतींचाही शिरकाव या उत्सवात होऊ लागला आहे. विषेषतः स्त्रीवर्ग या विकृतीला बळी पडू लागला आहे. रात्री गरबा खेळायला जाताना विविध प्रकारचे टॅटू अंगावर काढून घेऊन मिरवण्याचा ट्रेंड फोफावत चालला आहे.

बॅकलेस ब्लाउज घालून उघड्या पाठीवर, किंवा उघड्या दंडावर विविध टॅटू काढून घेतले जातात. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. काही ठिकाणी तर टॅटू काढणाऱ्यांचा धंदा तेजीत चालावा या हेतूने टॅटूच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. अशा प्रकारे शरीराचा भाग उघडा ठेऊन त्यावर टॅटू काढून मिरवण्यात कसली आली आहे भक्ती? हे असले प्रकार देवीला तरी आवडणार आहेत का? अनेक ठिकाणी हे नियम धाब्यावर बसवून रात्री उशिरापर्यंत गरबा खेळला जातो. त्यानिमित्ताने तरुण तरुणी रात्री उशिरापर्यंत घराबाहेर असतात. नवरात्री काळात संतती नियमनाच्या साधनांची नेहमीच्या तुलनेत दुप्पट विक्री होते तसेच यानंतरच्या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या गर्भपाताच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते असेही एका सर्वेक्षणातून निदर्शनात आले आहे. देवीच्या उत्सवाआडून काही विकृत मनोवृत्ती भोगवादाला खतपाणी घालत आहेत हेच यातून दिसून येते.

गतवर्षीप्रमाणे यंदाही काही हिंदुत्ववादी संघटनांनी गरब्याच्या कार्यक्रमांत येणाऱ्यांचे ओळखपत्र बघून केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा असे आवाहन केले होते. या आवाहनाला अनेक हिंदूंनीच विरोध केला याचे आश्चर्य वाटते. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या लव्ह जिहादवर निर्बंध आणण्यासाठी काही राज्यांत याविषयी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारही हा कायदा करण्यास अनुकूल आहे. नवरात्रीच्या काळात धर्मांध प्रवृत्ती गरब्याच्या कार्यक्रमांत शिरतात आणि हिंदू मुलींना लक्ष्य करतात, त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात.

दरवर्षी अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. त्यामुळेच यंदा हे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला खरेतर सर्वच स्तरांतून प्रतिसाद मिळायला हवा. पूर्वी गरबा या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतरचित गीतेच म्हटली जात असत. हल्ली मात्र भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे.

चित्रपटांतील गीतांच्या तालावर विचित्र अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. डॉल्बी, डीजेसारखे कानठळ्या बसवणारे संगीत लावले जाते. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. नृत्य करताना अनेक ठिकाणी महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात, यातून मारामाऱ्या होतात. एकूणच यातून उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला राहतो.

वर उल्लेख केल्याप्रमाणे नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे. हे नऊ दिवस देवीने महिषासुराशी युद्ध केले. दांडिया खेळणे म्हणजे देवीच्या मारक रूपाची उपासनाच आहे. यातून खासकरून महिलांनी बोध घ्यायला हवा.

देवीने या नऊ दिवसांत प्रकट रूप धारण करून तमप्रवृत्तीचा म्हणजे महिषासुराचा नाश केला. स्त्रीमध्ये किती पराकोटीची शक्ती आणि सामर्थ्य आहे हेच यातून देवीने दाखवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी नवरात्रीत केवळ नृत्याला आणि रंगसंगतीच्या पोशाखाला उपासना न मानता देवीच्या मारक रूपातून बोध घेऊन त्याच्या उपासनेला प्राधान्य द्यायला हवे.

आजमितीला स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. कोणतेही क्षेत्र स्त्रीसाठी सुरक्षित राहिलेले नाही. सुरक्षा यंत्रणा किंवा नातेवाईक प्रत्येक वेळेस आपल्या मदतीला धावून येतीलच असे नाही यासाठी आपणच आपले संरक्षण करण्यास आणि दुष्ट प्रवृत्तीचा विरोध करण्यास सिद्ध व्हायला हवे.

राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर, कित्तूरची राणी चेन्नमा अशा एकनाअनेक कितीतरी शक्ती उपासक पराक्रमी स्त्रिया या मातीत होऊन गेल्या. आजच्या स्त्रियांना त्यांचाचआदर्श घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

हिंदू धर्मातील सण उत्सव यांमध्ये भगवंताची भक्ती आणि उपासना यांना प्राधान्य असायला हवे; मात्र त्यांचे निमित्त साधून चंगळवादाला आणि भोगवादाला खतपाणी दिले जात असेल तर ते कुठेतरी थांबायला हवे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

# बिहारमध्ये वाढल्या काँग्रेसच्या अपेक्षा!

बिहारमध्ये काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी नुकतीच जी व्होटर अधिकार यात्रा काढली होती, त्या यात्रेला बिहार मधील जनतेने चांगला प्रतिसाद दिला होता. त्या यात्रेचा मते मिळवण्यासाठी किती फायदा होईल, हे येणारा काळच ठरवेल. परंतु त्यामुळे बिहार मधील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे. १९९० नंतर बिहारमध्ये काँग्रेसची जी घसरगुंडी सुरू झाली, ती अद्याप कायम असली तरी, राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले, ही गोष्ट कबूल करावीच लागेल.

------------

गेली ३५ वर्षे बिहारमध्ये दुय्यम स्थान पत्करणाऱ्या काँग्रेसने या खेपेस जागा वाटपात आक्रमक भूमिका घेण्याचे ठरवलेले दिसत आहे. अर्थात काँग्रेसच्या बिहार मधील बिकट परिस्थितीला पक्षाचे चुकीचे धोरणच कारणीभूत ठरले आहे. लालूप्रसाद यादव यांच्या पक्षाबरोबर सतत निवडणुक समझोता केल्यामुळे, काँग्रेसची बिहार मधील वाढ खुंटली.

लालूप्रसाद यादव हे जागा वाटपात जेवढ्या जागा सोडतील,त्यावर काँग्रेसने समाधान मानल्यामुळे, काँग्रेसचा पारंपरिक मतदार पक्षापासून दूर गेला. गेली अनेक वर्षे मोजक्याच जागांवर लढल्यामुळे, काँग्रेसला राज्यभर आपले हातपाय पसरता आले नाहीत.

काँग्रेसचा जो निष्ठावान मतदार होता,तो काँग्रेसची साथ सोडून इतर पक्षांकडे वळला. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेनंतर, इतकी वर्षे काँग्रेसपासून दुरावलेला, मतदारवर्ग काही प्रमाणात काँग्रेसकडे परतल्यास, लवकरच होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीत, काँग्रेसची कामगिरी पुर्वीपेक्षा चांगली होऊ शकेल. २०१५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जागावाटपात काँग्रेसच्या वाट्याला ४१ जागा आल्या होत्या. त्यापैकी २७ जागा जिंकून काँग्रेसने बऱ्यापैकी कामगिरी केली होती.

मात्र २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने आपल्या ताकदीपेक्षा जास्त जागांची मागणी केली आणि काँग्रेसचे गणित तिथेच चुकले. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जागा वाटपात ७० जागा सोडण्यात आल्या होत्या.मात्र काँग्रेसला त्यापैकी फक्त १९ जागाच जिंकता आल्या आणि ५१ जागांवर काँग्रेसला पराभव पत्करावा लागला.

काँग्रेसचे आपल्या पराभवाबाबत असे विश्लेषण होते की ज्या जागांवर बरीच वर्षे महाआघाडीचे (राजद, काँग्रेस, कम्युनिस्ट वगैरे ) उमेदवार विजयी झाले नाहीत, अशा पडीक जागा मोठ्या प्रमाणात काँग्रेसला सोडण्यात आल्या होत्या. मात्र या खेपेस मागचा अनुभव लक्षात घेऊन, काँग्रेसने आपल्या धोरणात सुधारणा करण्याचे ठरवलेले दिसत आहे.

काँग्रेसने लढवण्यासाठी चांगल्या जागा आणि वाईट जागा असे वर्गीकरण केले असून,ज्या ठिकाणी सहज विजय मिळवता येईल त्या चांगल्या जागा आणि ज्या ठिकाणी विजयाची खात्री देता येणार नाही त्या वाईट जागा, असे पृथक्करण केलेले दिसत आहे. गेल्या खेपेस काँग्रेसने ज्या जागा (१९ ) जिंकल्या होत्या त्यावर जागा वाटपात, काँग्रेस, आपला दावा सांगेलच, शिवाय काँग्रेस ज्या जागांवर पाच हजारच्या आसपास मतांनी गेल्या खेपेला हरली, त्या जागांवरही, काँग्रेस या खेपेस आपला दावा सांगण्याची शक्यता आहे.

भारंभार जागा लढविण्यापेक्षा ज्या जागा जिंकण्याची पक्षाची क्षमता आहे, त्या जागा लढवण्याचा निर्णय काँग्रेसने घेतलेला दिसत आहे.अर्थात आघाडीच्या जागावाटपात प्रत्येक घटक पक्षाला आपली मागणी तुटेपर्यंत ताणता येत नाही. शेवटी तडजोड ही करावीच लागते. राजद प्रणित महाआघाडीचे जागा वाटप वाटते तितके सोपे असणार नाही, याची कल्पना सर्व घटक पक्षांना असेलच. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर वाढली आहे.

महाआघाडीतील प्रत्येक घटक पक्षाला जास्तीत जास्त जागा लढवायच्या आहेत.राजद हा महाआघाडी मधील सर्वात मोठा घटक पक्ष आहे.गेल्या खेपेस राजदने १४४ जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी ७५ जागांवर पक्षाला विजय मिळाला होता. १७ जागांवर पक्षाला पाच हजारच्या आसपास मतांनी पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे त्या ९२ जागांवर पक्षाचा दावा पक्का असेल.

राजदचे असे म्हणणे आहे की गेल्या खेपेला मित्र पक्षांच्या दबावाखाली येऊन, पक्षाने २०१५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या काही जागा, मित्र पक्षांसाठी सोडल्या होत्या. त्यामुळे तेथील पक्षाच्या विजयी उमेदवारांनी बंडखोरी केली आणि त्यामुळे आघाडीच्या काही उमेदवारांना पराभव पत्करावा लागला.

ही गोष्ट लक्षात घेता, यावेळी जागा वाटप करताना, प्रत्येक घटक पक्षाने गेल्या खेपेला ज्या जागा जिंकल्या होत्या, त्या जागा त्याच पक्षाला सोडण्याचा निर्णय घेतला जाईल, असे दिसत आहे. अर्थात याबाबतीत काही जागांचा अपवाद केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मध्यंतरी राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित केले होते.त्यावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया व्यक्त करणे, टाळले होते. मात्र, महाआघाडीतील सर्वात मोठ्या पक्षाचे नेते म्हणून तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित करणे यामध्ये गैर असे काहीच नाही. प्रश्न एवढाच आहे की महाआघाडीतील इतर घटक पक्षांशी सविस्तर चर्चा करून मगच तेजस्वी यादव यांनी तशी घोषणा करायला हवी होती.

राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे काँग्रेसच्या अपेक्षा वाढल्या आहेत.त्यामुळे जागा वाटपाच्यावेळी काही समस्या निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यातच विकासशिल इन्सान पार्टी आणि पशुपती पारस यांच्या नेतृत्वाखालील लोक जनशक्ती पार्टी हे दोन पक्ष नव्याने महाआघाडीत सामील झाले आहेत. त्यांच्याकरता काही जागा सोडाव्या लागणार आहेत.

त्याशिवाय झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाने, महाआघाडीकडे काही जागांची मागणी केली आहे.या सर्व गोष्टी लक्षात घेता, महाआघाडीतील जागा वाटप नक्कीच सोपे असणार नाही.



अभय गोखले

# नवरात्रात देवीची उपासना

*सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके*
*शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते.*

महिषासुराचा नाश करण्यासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गा देवीचा उत्सव म्हणजे नवरात्र. अश्विन शुक्ल प्रतिपदेला देवीची घटस्थापना करून घरोघरी आपापल्या कुलदेवीची आराधना करतात. नऊ दिवस अखंड ज्योत ठेवून व्रतस्थ राहून देवीची उपासना फलदायी आहे. ज्या महिषासुराचा देवीने अंत केला तरी सुद्धा ती असुरी शक्ती काही अंशी समाजात आजही दिसून येते.



आपल्यातल्या या असुरी शक्तीला नष्ट करण्यासाठी देवीची, शक्तीची उपासनाच आवश्यक आहे. त्यासाठी भक्तांनी या शक्तीच्या नवरात्रात देवीसमोर बसून देवीचे ब्रम्हांड पुराणातील वेद महात्म, चंडी पाठ, सप्तशती पाठ, श्री सूक्त, देवी भागवत, ललिता पूजन, सरस्वती पूजन, जागरण, जोगवा, घागरी फुंकणे, इत्यादी उपासना आपल्या क्षमता आणि सामर्थ्य नुसार करावी. नवरात्रात या नऊ दिवसात देवी जागृत राहून ती हजार पटीने कार्यरत असते. या काळात देवीला कुंकुमार्चन करून ते कुंकू कपाळाला लावावे.

तिची शक्ती आपल्याला मिळावी म्हणून 'श्री दुर्गा दैव्ये नमः' हा नामजप जास्तीत जास्त करावा .या कलियुगात अधर्म बळावला असून धमार्ची पुन्हा प्रतिष्ठापना होण्यासाठी आदिशक्तीची उपासना सर्वात श्रेष्ठ आहे. आदिशक्ती श्री दुर्गा देवीची नव रूपे आहेत.

*'या देवी सर्वभूतेषु लक्ष्मी रूपे न संस्थिता*
*नमस्तस्ये नमस्तस्ये नमस्ते नमो नमः'*

या मंत्राचा जयघोष करून देवीला शरण जाऊन तिची भक्ती करूया. आणि या कलियुगात दुष्ट शक्तींशी लढण्यासाठी शक्ती मागूया. भक्ती आणि शक्तीचा उत्सव म्हणजे नवरात्र. सर्व मिळून हा नवरात्र उत्सव आनंदाने साजरा करूया !

■ सौ. पल्लवी देशपांडे, दुर्ग,(छ. ग.)

## उपराजधानी नशेच्या विळख्यात

वाचक लिहितात

राज्याची उपराजधानी असलेले नागपूर शहर नशेच्या विळख्यात सापडले असून, तरूणाईच नव्हे तर अल्पवयीन मुलेही सर्रास गांजा आणि अन्य अंमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे दिसून येते. पोलिसांकडून दररोज कुठे ना कुठे अंमली पदार्थ जप्त करण्यात आल्याच्या बातम्या वाचण्यात येतात. दोन दिवसांपूर्वी सेमिनरी हिल्स परिसरात एकाच मोटरसायकलवर स्वार तीन मित्रांना आपली बसने धडक दिली. यात २१ वर्षीय एकाचा मृत्यू झाला. या घटनेतही नशेचा अंमल असल्याचे सांगितले जात आहे. २१ वर्षांचा उमदा पोरगा गेला, त्याच्या घरच्यांची काय स्थिती असेल? तथापि, आपली मुलं काय करतात? कोणासोबत राहतात? व्यसनाकडे वळ्लीत का? याकडे मातापित्यानेही लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

नागपूर शहरात विविध भागातून गांजा, एमडी आणि अन्य प्रकारच्या अंमली पदार्थांचा पुरवठा होतो. यावर पोलिसांनी लगाम कसणे अत्यावश्यक असून, अंमली पदार्थांचा व्यापार करणाऱ्यांना कठोर शासन होणे गरजेचे आहे.

■ शंतनू वासनिक, नागपूर.

## ओआरएस प्यायल्यामुळे खरचं शरीरातील थकवा कमी होतो का?




उन्हाळ्यात जास्त घाम येतो. जास्त घाम येणे अनेकदा डिहायड्रेशनचे कारण बनू शकते. शिवाय, जर उष्माघात झाला तर उलट्या आणि जुलाब देखील होऊ शकतात. अशा परिस्थितीत, ओआरएस (ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन) नावाचे द्रावण घरी सामान्यतः घेतले जाते.

लहान मुले असोत किंवा वृद्ध, ओआरएस शरीराला पुन्हा हायड्रेट करण्यास मदत करते जेणेकरून डिहायड्रेशन टाळता येईल. ओआरएस हे मीठ, साखर आणि इलेक्ट्रोलाइट्सचे मिश्रण आहे जे शरीराला पुन्हा हायड्रेट करते. तथापि, ओआरएससोबत कोणतेही औषध घेतले जाऊ शकते का? ओआरएससोबत औषध घ्यावे की फक्त ओआरएस पुरेसे आहे?

जेव्हा अतिसार किंवा उलट्या वारंवार होतात तेव्हा शरीरातून केवळ पाणीच कमी होत नाही तर मीठ आणि खनिजे देखील कमी होतात. मीठ आणि साखरेच्या कमतरतेमुळे चक्कर येणे, अशक्तपणा किंवा स्थिती बिघडू शकते. ओआरएसमध्ये मीठ, साखर आणि इलेक्ट्रोलाइट्सचे योग्य संतुलन असते, जे शरीराला ऊर्जा प्रदान करते.

केवळ ओरल रिहायड्रेशन (ओआरएस) सौम्य अतिसार किंवा उलट्यांचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकते. बहुतेक लोक औषधांशिवाय बरे होतात. तथापि, जर अतिसार कायम राहिला, ओटीपोटात दुखत राहिले किंवा रक्त येत असेल तर केवळ ओआरएस प्रभावी ठरणार नाही. या परिस्थितीत, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या उपचारांचे पालन करा.

**ओआरएससह कोणत्या प्रकारची औषधे दिली जाऊ शकतात?**

**प्रतिजैविकः** अतिसारासाठी नेहमीच अँटीबायोटिक्स लिहून दिले जात नाहीत. जर संसर्ग बॅक्टेरियाचा असेल तरच डॉक्टर त्यांची शिफारस करतात.

**प्रोबायोटिक्सः** ही औषधे आतड्यांना बळकट करण्यास आणि चांगल्या बॅक्टेरियाची संख्या वाढविण्यास मदत करतात. डॉक्टर बहुतेकदा ओआरएससह त्यांना लिहून देतात. उलटीविरोधी किंवा तापाची औषधे यासारखी इतर औषधे डॉक्टरांनी लिहून दिली तरच घ्यावीत.

**केवळ ओआरएस कधी पुरेसे आहे?**

जेव्हा स्थिती गंभीर नसते, अतिसार सौम्य असतो आणि डिहायड्रेशन इतके गंभीर नसते की व्यक्तीला बेशुद्धीची लक्षणे जाणवतात, तेव्हा फक्त ओआरएस दिले जाऊ शकते. त्यासोबत हलके, साधे जेवण देखील खाऊ शकता. तुम्ही दलिया, सूप, केळी इत्यादी खाऊ शकता. अशा परिस्थितीत ओआरएस सुरक्षित आणि लवकर प्रभावी आहे.

**ओआरएस कसे वापरावे**

ओआरएस पॅकेजवरील सूचनांचे पालन करा. ओआरएस द्रावण तयार करण्यापूर्वी तुमचे हात साबणाने चांगले धुवा. ओआरएस द्रावण घोट घोट करून प्यावे. ओआरएस द्रावणात साखर घालू नये. ओआरएस नेहमी उकळलेल्या आणि नंतर थंड केलेल्या पाण्यात मिसळा. ओआरएस द्रावणात फक्त पाणी घालावे; रस, थंड पेये इत्यादी घालू नका. द्रावण तयार केल्यानंतर, ते २४ तासांपेक्षा जास्त काळ साठवू नका.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### ड्राय डे !

महिन्यातून एक दिवस
करावा जीवनात 'सिलेक्ट '
निर्विचार मनाने - -ब्रम्हांड
शक्तीशी व्हावे 'कनेक्ट '..


ध्यान धारणा योग
देती जीवनास दिशा
उतरून जाईल भौ
सांसारीक मोहमायेची नशा

आपण भुतलावर प्रवासी
क्षणाचे सोबती सारे
सकारात्मकतेने बघण्याचा
दृष्टीकोन विकसित करा रे ..!

# मिंत्राच्या बिग फॅशन फेस्टिव्हलमध्ये असणार १५,००० ब्रँड्सच्या ४एम+ स्टाइल्स; १००+ अनोखे उत्सवी शुभारंभ

**मुंबई, १९ सप्टेंबर :** देशात सणासुदीच्या मोसमाचे वारे वाहू लागले आहेत, अशा वेळी फॅशन, ब्यूटी आणि लाइफस्टाइलचे भारतातील आघाडीचे डेस्टिनेशन असलेल्या मिंत्राने आपल्या बिग फॅशन फेस्टिव्हल (बीएफएफ) ची घोषणा केली आहे. फेस्टिव्ह स्टाइल आणि स्व-अभिव्यक्तीचा हा सोहळा आता सुरू झाला आहे. यंदाच्या आवृत्तीत १५,००० ब्रँड्समधील तब्बल ४ मिलियन+ स्टाइल्सचे व्यापक कलेक्शन आहे, ज्यात आंतरराष्ट्रीय, देशी, देशात तयार झालेले आणि डी२सी ब्रँड यांचा समावेश आहे. यातील उत्सवी फॅशन, ब्यूटी आणि लाइफस्टाइल उत्पादनांच्या खरेदीसाठी सर्व महानगरे आणि इतर लहान-मोठ्या शहरांतील खरेदीदारांना आमंत्रित करण्यात येत आहे.

या उत्सवी मोसमात हायपर-स्पीड डिलिव्हरीची सुरुवात : यावेळी पहिल्यांदाच ग्राहक बीएफएफ साठी एम-नाऊ वर उत्सवी खरेदीचा अनुभव घेऊ शकतील. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सुरू झालेल्या एम-नाऊ सह या मोसमात बंगळूर, मुंबई, दिल्ली एनसीआर आणि हैदराबाद येथील ग्राहक अवघ्या ३० मिनिटांपासून डिलिव्हरी मिळवून आपल्या वॉर्डरॉबचा कायापालट करू शकतील. या सणासुदीच्या मोसमासाठी, मिंत्रा इतर शहरांमध्ये देखील एम-नाऊ ची क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नात आहे. ६००+ ब्रँड्सच्या ९०के पेक्षा जास्त एसकेयू सह, एम-नाऊ ची रचना आयत्या वेळी उत्पन्न झालेली खरेदीची गरज भागवण्यासाठी करण्यात आली आहे. एम-नाऊ सुनिश्चित करते की, ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी त्यांचे प्रिय ब्रँड वेळेवर उपलब्ध होतील. हा अत्यंत जलदतेचा प्रस्ताव लागू



असलेल्या ब्रँड्समध्ये जागतिक स्तरावरील प्रसिद्ध ब्रँड सामील आहेत, जसे की- व्हेरो मोडा, मँगो, टॉमी हिलफिगर, लिव्हाईस, जॅक अँड जोन्स, ONLY . शिवाय जॉम्पर्स, सोजन्य, किसाह, हाऊस ऑफ पटौडी, सांग्रिया सारखे एथनिक ब्रँडही आहेत. प्रीमियम ब्यूटी ब्रँड्समध्ये वायएसएल, प्रादा, करोलीना हेरेरा, हुडा ब्यूटी, एमएसी, बॉबी ब्राऊन, ओलाप्लेक्स, सेरावे आणि एस्टी लॉडर वगैरे ब्रँड्सचा समावेश आहे.

घेऊन येत आहे फेस्टिव्ह फॅशन ट्रेंड्स : बीबीएफ च्या यंदाच्या आवृत्तीत कित्येक नवीन लॉन्चेस आणि लोकप्रिय ब्रँड्सच्या एथनिक वेअरचे व्यापक कलेक्शन आहे. ग्राहक प्रत्येक प्रसंगानुरूप नवीन लुक यातून मिळवू शकतात. या वर्षाच्या सणासुदीच्या मोसमाच्या आरंभीच ग्राहकांमध्ये एथनिक ऑफिस को-ऑर्ड, शर्ट कॉलर कुर्ता सेट, भरतकाम केलेले ए-लाइन कुर्ता सेट, पेप्लम शरारा सेट, ड्रेप्ड स्कर्ट सेट, कफ्तान सेट इ. चे चलन दिसून येत आहे. लोकप्रिय एथनिक वेअर ब्रँड्समध्ये इंडोएरा, लिबास, वरंगा, बिबा, ऑरेलिया, जॉम्पर्स, विशुद्ध, कालिनी, हाऊस ऑफ पटौडी आणि अनूकचा समावेश आहे. या श्रेणीत काही नवीन सेलिब्रिटी लाइन्सची सुरुवात देखील झाली आहे. उदा. इंडस X मालाइका अरोरा, छाप Xअदा शर्मा, लक्ष्मीपती X रश्मिका मंधाना वगैरे. बीएफएफ मध्ये ज्या श्रेणींना ग्राहकांकडून उदंड प्रतिसाद अपेक्षित आहे, त्यात समावेश आहे पुरुष आणि महिलांचे एथनिक वेअर, पुरूषांचे कॅज्यूअल वेअर, महिलांचे वेस्टर्न वेअर, ब्यूटी आणि पर्सनल केअर, घड्याळे आणि वेअरेबल्स, ज्वेलरी आणि ॲक्सेसरीज, स्पोर्ट्स फुटवेअर आणि होम अँड लिव्हिंग वगैरे श्रेणींचा.

# बजाज फिनसर्व्ह फ्लेक्सी कॅप फंडाने ५,४०० कोटी रूपये एयूएम ओलांडला, दोन वर्षांच्या प्रबळ वाढीला साजरे केले

**नागपूर, १९ सप्टेंबर :** बजाज फिनसर्व्ह एएमसीने त्यांच्या प्रमुख इक्विटी फंड 'बजाज फिनसर्व्ह फ्लेक्सी कॅप फंड'चा दुसरा वर्धापन दिन साजरा केला, ज्याचे 'मेगाट्रेंड्स'मध्ये गुंतवणूक करण्याचे धोरण आहे. या फंडाने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे, ज्यामध्ये त्यांची व्यवस्थापनांतर्गत मालमत्ता (एयूएम) फक्त दोन वर्षांत ५,४१०.०४ कोटी रूपयांपर्यंत (३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत) वाढली आहे. स्थापनेपासून या फंडाने उत्तम कामगिरी दाखवली आहे, नियमित योजनेअंतर्गत १९.१९ टक्के* आणि प्रत्यक्ष योजनेअंतर्गत २०.९१ टक्क्यांचा* सीएजीआर प्रदान केला आहे (३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत)

या फंडाच्या यशाबद्दल मत व्यक्त करत बजाज फिनसर्व्ह एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक गणेश मोहन म्हणाले, ''फ्लेक्सी कॅप फंड आमचा प्रमुख इक्विटी फंड आहे, जो आम्ही एका वेगळ्या मेगाट्रेंड थीमसह सुरू केला होता. फंडाच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त फंडाची वाढ आणि कामगिरी पाहून मला आनंद होत आहे. फंडाच्या वाढीमधून आमच्या गुंतवणूकदारांनी आणि वितरकांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास दिसून येतो, तसेच उत्तम कामगिरीमधून बजाज फिनसर्व्ह एएमसीमध्ये आम्ही स्वीकारलेले वेगळे गुंतवणूक तत्व आणि गुंतवणूक प्रक्रिया निदर्शनास येते. भविष्यात, आम्ही आमच्या गुंतवणूक व्यवस्थापन दृष्टिकोनात गतीशील आणि प्रक्रिया-केंद्रित शिस्तीसह अद्वितीय, ट्रू-टू-लेबल फंड तयार करून सर्व भारतीयांसाठी शाश्वत दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत.''

या फंडाच्या कामगिरीबाबत सांगत बजाज फिनसर्व्ह एएमसीचे मुख्य गुंतवणूक अधिकारी निमेश चंदन म्हणाले, ''बजाज फिनसर्व्ह फ्लेक्सी कॅप फंड हा खऱ्या अर्थाने वापरला जाणारा फ्लेक्सी कॅप फंड आहे, जो दीर्घकालीन मेगाट्रेंडचा फायदा घेणाऱ्या व्यवसायांमध्ये गुंतवणूक करतो. हा फंड आमच्या इन-हाऊस इनक्यूब गुंतवणूक तत्वाचा वापर करतो, ज्यामध्ये माहिती, संख्यात्मक आणि वर्तणूक पैलूंचे मिश्रण आहे, जे कार्यक्षम स्टॉक निवड आणि वाटप करण्यास मदत करते. फक्त 'प्रवाहाबरोबर जाण्याऐवजी' हा फंड भविष्यात नफा देणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून 'प्रवाहाचा अंदाज घेण्यावर' लक्ष केंद्रित करतो. परिणामी, फंडाचा सक्रिय हिस्सा देखील जास्त आहे. हा दृष्टिकोन फंडाला अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलांमधून उद्भवणाऱ्या संधी मिळवण्यास आणि शाश्वत दीर्घकालीन मूल्य प्रदान करण्यास मदत करतो.''

# ६५ दिवस आयसीयूमध्ये, तरीही एकही बेडसोर नाही : मेघे हॉस्पिटलमध्ये तरुणीने दुर्मिळ आजारावर मात

अमरावती, १९ सप्टेंबर : येथील २८ वर्षीय तरुणीने गिलियन-बॅरे सिंड्रोम या दुर्मिळ आजारावर यशस्वीपणे मात केली. वानाडोंगरी येथील १,०२० बेड्च्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुपर स्पेशालिटी इन्स्टिट्यूटमध्ये तब्बल ६५ दिवस आयसीयूमध्ये राहूनही ती पूर्णपणे बरी झाली.

रुग्णाला गंभीर अवस्थेत नागपूरमध्ये आणले होते आणि ती आधीच व्हेंटिलेटरवर होती. तिला चारही हात-पायांमध्ये अशक्तपणा आणि श्वास घेण्यास त्रास असा त्रास होत होता. न्युरॉलॉजिस्ट डॉ. जीवन किंकर आणि डॉ. संचित शैलेन्द्र चौकसे यांनी नर्व कंडक्शन आणि सीएसएफ तपासण्या करून रुग्णाला गिलियन-बॅरे सिंड्रोम असल्याची पुष्टी केली. त्यानंतर तातडीने आयव्ही इम्युनोग्लोब्युलिन औषधोपचार आणि प्रगत व्हेंटिलेटरी उपचार सुरू करण्यात आले.

६५ बेड्च्या आयसीयू कॉम्प्लेक्समध्ये क्रिटिकल केअरची जबाबदारी डॉ. हेमंत देशपांडे यांनी घेतली. त्यांना डॉ. राकेश भैसारे, डॉ. अनिताभ सुधदेवे, डॉ. समृद्धी तायडे, डॉ. राहुल डागा, डॉ. अमित सुथार, डॉ. मासुम बिरजन आणि डॉ. स्वाती बाजपेयी यांनी साथ दिली. न्युरॉलॉजिस्ट डॉ. किंकर आणि डॉ. चौकसे यांनी विशेष मार्गदर्शन केले. त्याचबरोबर फिजिओथेरपी टीमने रुग्णाची ताकद आणि हालचाल परत मिळवण्यासाठी सतत प्रयत्न केले.

तब्बल ४८ दिवस व्हेंटिलेटरवर राहिल्यानंतर रुग्णाला यशस्वीरित्या व्हेंटिलेटरवरून बाहेर काढले गेले आणि ती सुखरूप घरी परतली. विशेष म्हणजे, इतक्या दीर्घकाळ आयसीयूमध्ये राहूनही तिला ना बेडसोर झाले ना हॉस्पिटलमधील इन्फेक्शन झाले. हे सर्व नर्सिंग डायरेक्टर डॉ. सीमा सिंग आणि त्यांच्या समर्पित टीमच्या सतर्क देखभालीमुळे शक्य झाले.

जीबीएस हा दुर्मिळ पण गंभीर न्यूरोलॉजिकल आजार आहे, ज्यात शरीराची रोगप्रतिकारक शक्ती बाहेरील नसांवर हल्ला करते. मात्र वेळेवर उपचार आणि योग्य काळजी घेतली तर रुग्ण पूर्ण बरा होऊ शकतो, असे डॉ. किंकर यांनी सांगितले.

डॉ. चौकसे म्हणाले, या केसमध्ये क्रिटिकल केअर आणि प्रचंड संयमाची गरज होती. रुग्णाची हळूहळू झालेली सुधारणा ही आमच्या वैद्यकीय कौशल्य आणि टीमवर्क यांचे परिणाम आहे.

उपचाराचा संपूर्ण खर्च महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (एमजेपीजेएवाय) अंतर्गत पूर्णपणे भरला गेला. कॅशलेस प्रक्रियेचे सर्व कामकाज डॉ. सुधीर सिंग, एएमएस यांच्या नेतृत्वाखालील हॉस्पिटल प्रशासनाने सुरळीत पार पाडले, ज्यामुळे रुग्णाच्या कुटुंबावर कोणताही आर्थिक ताण आला नाही.

डीएमआयएचईआर (ऑफ कॅम्पस) डायरेक्टर डॉ. अनुप मरार यांनी या सामूहिक प्रयत्नांचे कौतुक करताना सांगितले, या कठीण न्यूरोलॉजिकल आणीबाणीचे यशस्वी व्यवस्थापन हे आमच्या हॉस्पिटलच्या नैतिक, दर्जेदार आणि सर्वांगीण आरोग्यसेवेकडे असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. यामुळे शालिनीताई मेघे हॉस्पिटलने मध्य भारतातील विश्वासार्ह तृतीय श्रेणी रुग्णालय म्हणून पुन्हा अधोरेखित होते, जेसरकारी योजनामुळे जसे की एमजेपीजेएवाय आणि पीएमजेएवाय मुळे परवडणारी आणि सुलभ सुपर-स्पेशालिटी सेवा देते.

गंभीर अवस्थेत हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यापासून ते यशस्वीपणे घरी परतण्यापर्यंत, ही केस शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमधील आधुनिक क्रिटिकल केअर, टीमवर्क आणि सेवाभाव याचे जिवंत उदाहरण आहे. फक्त तीन वर्षांत हे हॉस्पिटल ४५० बेड्च्या हॉस्पिटलपासून १,०२० बेडचे सुपर-स्पेशालिटी केंद्र बनले आहे.





# परीकमल सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे कमल पाटील यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य, शिबिर आणि संविधान पुस्तक वाटपाचे वितरण

**नागपूर, १९ सप्टेंबर :** बॅनर्जी ले आऊट पार्क येथे बुधवारी १७ सप्टेंबर रोजी परीकमल सोशल वेलफेअर फाऊंडेशन च्यावतीने कमल पाटील यांच्या ७७ व्या जयंती निमित्ताने आरोग्य, दंत तपासणी शिबिर व संविधान पुस्तक वाटपाचे वितरण करण्यात आले. जवळपास या शिबिराचा ३०० लोकांनी लाभ घेतला या कार्यकमास महाराष्ट्र अनुसूचित जाती आयोग चे उपाध्यक्ष ड. धर्मपाल मेश्राम, माजी सभापती रमेश सिंगारे, माजी नगरसेवक विशाखाताई बांते, वंदनाताई भगत, भारतीताई बुंदे, मनोज गावंडे, शरद बांते, व समाजसेविका सुजाताताई मेश्राम, चैतालीताई वानखेडे, रंजिताताई चापके, मीनाक्षीताई देशमुख, अश्विनी वाहने तसेच अजय हिवरकर, भूपेंद्र बोरकर, मंगेश घाकरे, हर्षवर्धन कांबळे, अजय हाडके, गुड्डू निखारे, कुणाल पाटील, नरेश चव्हाण, सुनील वाहने, सुनील गुप्ता, मधु तितरमारे, जितू, आलूवालीया, प्रशांत पाटील, शंकर गाढवे, आशिष देशमुख, रवी अण्णाजी, सुशील वाहने, मेडिकल दंत डॉक्टर टीम, राज्य कामगार डॉक्टर टीम उपस्थित होते. परीकमल सोशल वेलफेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रविण पाटील यांच्या तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# सॅमसंगकडून भारतात गॅलेक्सी एस२५ एफई आणि गॅलेक्सी बड्स३ एफई लाँच



**मुंबई, १९ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलेक्सी एस२५ एफईच्या लाँचची घोषणा केली. या स्मार्टफोनमध्ये वैयक्तिकृत एआय अनुभव, गॅलेक्सी एस२५ एफई मध्ये जेमिनी लाइव्ह, नाऊ बार आणि सर्कल टू सर्च विथ गुगल आहे. हे सर्वोत्तम टूल्स संवाद वाढवण्यासाठी, उत्पादकतेला चालना देण्यासाठी आणि एआय-पॉवर्ड फोटोग्राफी व एडिटिंग टूल्स आहेत. तसेच शक्तिशाली कार्यक्षमता, दीर्घकाळपर्यंत टिकणारी ४९०० एमएएच बॅटरी आणि सुधारित आर्मर ॲल्युमिनिअम फ्रेम आहे. गॅलेक्सी एस२५ एफईमध्ये सुलभ गेमिंगसाठी मोठा वेपर चेम्बर आहे. ६.७-इंच डायनॅमिक एएमओएलईडी २एक्स डिस्प्लेसह १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट सुलभ, सर्वोत्तम व्हिज्युअल्स देतो.

गॅलेक्सी एस२५ एफईमध्ये असलेले गॅलेक्सी एआय वन यूआय ८ व मल्टीमोडल एआय एजंट्ससह ऑप्टिमाइज करण्यात आलेले आहे, ज्यामुळे अधिकाधिक वापरकर्ते नवीन युगातील नैसर्गिक व प्रभावी परस्परसंवादाचा आनंद घेऊ शकतात, जेथे वॉईस, टच व व्हिज्युअल इनपुट एकत्र येत दैनंदिन टास्क्स सोपे आणि अधिक सर्वोत्तम करतात. सुव्यवस्थितपणे दैनंदिन परस्परसंवाद करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत, तसेच प्रत्येक वापरकर्त्याच्या वैयक्तिक गरजांशी जुळून जातात. याव्यतिरिक्त, या टूल्सना वैयक्तिकृत, एआय-पॉवर्ड वैशिष्ट्यांसाठी नवीन संरक्षणांचे पाठबळ आहे. गॅलेक्सी बड्स३ एफईची किंमत १२९९९ रूपये आहे. लाँच ऑफर्सचा भाग म्हणून ग्राहक कोणत्याही निवडक गॅलेक्सी स्मार्टफोन्ससोबत गॅलेक्सी बड्स३ एफईच्या खरेदीवर ४००० रूपयांच्या फायद्याचा आनंद घेऊ शकतात. तसेच, लाँच ऑफर्सचा भाग म्हणून ग्राहक ३००० रूपये बँक कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनसचा देखील आनंद घेऊ शकतात. याव्यतिरिक्त, त्यांना जवळपास १२ महिन्यांपर्यंत नो कॉस्ट ईएमआय ऑफर देखील मिळू शकते.

# आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ९९.६०% या क्लेम सेटलमेंट रेशोसह आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ आघाडीवर

**मुंबई, १९ सप्टेंबर :** एप्रिल २०२५ ते जून २०२५ या कालावधीसाठी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने क्लेम सेटलमेंट रेशो ९९.६०% एवढा घोषित केला आहे. हा रेशो या व्यवसायातील सर्वाधिक आहे. विशेष म्हणजे, फार चौकशी न करता केलेल्या क्लेम सेटलमेंटसाठी लागणारा सरासरी वेळ हा फक्त १.१ दिवस एवढा होता.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य ऑपरेशन्स ऑफिसर अमिश बँकर म्हणाले, जिथे आश्वासने वास्तवाशी जुळतात, तिथे दावे केले जातात. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफमध्ये, प्रत्येक दावा अत्यंत संवेदनशीलतेने हाताळला जातो आणि त्यावरील प्रक्रिया जलद केली जाते. आमची हीच तत्परता आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीतील आमच्या दावे निकाली काढण्याच्या प्रमाणात (९९.६०%) मध्ये दिसून येते. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत एकूण ४०६.८९ कोटींचे मृत्यू दावे निकाली काढले. एआय आणि एमएल आधारित तंत्रज्ञानासह डेटा ॲनालिटिक्सचा वापर आम्हाला या दाव्यांवर जलद आणि कार्यक्षमतेने प्रक्रिया करण्यास सक्षम करत आहे.

'क्लेम फॉर शुअर' या उपक्रमांतर्गत, सर्व कागदपत्रे मिळाल्यानंतर एका दिवसात सर्व पात्र दावे निकाली काढण्याचे आश्वासन कंपनी देते. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत, कंपनीने या उपक्रमांतर्गत एकूण छ७४.७२ कोटींचे दावे निकाली काढले आहेत. कंपनीचे डिजिटल सक्षमकर्ते दावेदारांना दावे दाखल करण्यास आणि त्यांचा पाठपुरावा करण्यास मदत करत आहेत.


# हा आतापर्यंत मी केलेल्या सर्वांत कठीण सीक्वेन्सपैकी एक होता : मोहक मटकर

**मुंबई, १८ सप्टेंबर :** झी टीव्हीवरील सरु प्रेक्षकांना भावनांचा आणि थराराचा संगम असलेला दमदार सीक्वेन्स दाखवणार आहे. एका धक्कादायक वळणात अनिका (अनुष्का मर्चंडे) सरु (मोहक मटकर) ला वॉटर टँकमध्ये बंद करून त्यात पाणी सोडते, ज्यामुळे सरु त्यात अडकून पडते आणि सुटण्यासाठी धडपड करते. हा प्रसंग जिवंत करण्यासाठी मोहकला शारीरिकदृष्ट्या मोठा ताण सहन करावा लागला पण तिने हे आव्हान उत्साहाने आणि पूर्ण समर्पणाने स्वीकारले.

मोहकला वॉटर टँकमधील बंदिस्त जागेसाठी स्वतःला मानसिकरीत्या तयार करावे लागले तसेच वाढत्या पाण्याशी शारीरिकरीत्या जुळवून घ्यावे लागले. भीती आणि हतबलतेचे भाव व्यक्त करत मर्यादित जागेत हालचाल करण्याचा संघर्ष प्रत्येक गोष्ट तिने प्रॉडक्शन टीमसोबत सराव करून अधिक वास्तववादी बनवली. या सीक्वेन्ससाठी अनेक टेक घ्यावे लागले आणि पूर्ण दिवस शूटिंग चालले, ज्यामध्ये मोहकने प्रचंड मेहनत घेतली. सर्व सुरक्षा उपाय असूनही शूटदरम्यान तिला किरकोळ दुखापत झाली पण हा सीक्वेन्स पूर्ण करण्याचा तिचा निर्धार मात्र अजिबात ढळला नाही.

मोहक मटकर म्हणाली, सरुमध्ये आतापर्यंत मी केलेल्या सीक्वेन्सपैकी हा नक्कीच सर्वांत कठीण होता. जेव्हा मी टँकमध्ये उतरले आणि माझ्याभोवती पाणी वाढताना जाणवले तेव्हा तो अनुभव मी याआधी केलेल्या कुठल्याही गोष्टीपेक्षा पूर्णपणे वेगळा होता. तो खूपच थकवणारा आणि शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक होता, पण मला स्क्रीनवर ती हतबलता खरी वाटावी असं वाटत होतं. काही क्षणी ते खूप कठीणही वाटलं, पण मी स्वतःला आठवण करून दिली की सरु एक लढवय्या आहे, आणि मला माझ्या अभिनयात तिची तीच जिद्द मला दाखवायची आहे. या सगळ्यात मला सर्वात जास्त बळ दिले ते टीमच्या सततच्या प्रोत्साहनाने. त्यांनी मला सुरक्षित वाटेल याची काळजी घेतली आणि स्वतःला अजून पुढे ढकलण्याची ताकद दिली. जेव्हा प्रेक्षक हा सीक्वेन्स पाहतील तेव्हा त्यांना मी केलेला संघर्ष आणि तीव्रता नक्कीच जाणवेल अशी माझी आशा आहे.

# शब्दकोडे क्रमांक २२२२




**आडवे शब्द:-**
१) शाळेचे प्रमुख
५) सूर्याचे एक नाव
७) रागावलेला
११) सापाने त्यागलेली त्वचा
१२) सुळे
१४) प्रशाला
१५) नंतर
१६) नेता, चित्रपटाचा हिरो
१७) नूतन
१८) चुणीदार पट्टी
१९) जानकीपती
२०) खरकट्याचा ढीग
२३) सूर्य
२५) रजनी
२७) जन्ममृत्यू
३०) सेवक
३२) पंजाब मधील दोन नद्यांची नावे
३४) बारीक झणझण
३६) मृत्यू
३७) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
४१) मयूर
४२) निमग्न
४३) यज्ञ
४४) कबूतर
४५) रतिचा पती
४७) उद्याच्या नंतरचा दिवस
४८) अथवा, किंवा
४९) शर्त, परंतु, अट
५०) एक रंगीत कंदमूळ
५१) कोथिंबीरीचे बी
५२) पाणी
५४) झाडाभोवतीचा कट्टा
५५) निर्धन झालेला, दरिद्री
५६) कच्चाच्या विरुद्ध
५८) खांदा, खांद्याचा सांधा
६०) बुद्धीने कमी असलेला
६१) मीठ
६२) उसनवार
६६) निष्णात(गुन्हेगार)
६८) अफवा
६९) एक द्विदल धान्य
७०) झकास
७१) लेखणी
७२) प्रस्थान करणे
७३) वेल
७५) पुरुष
७६) चांदी
७७) गाणे
७८) गुणांची चाहा करणारा

**उभे शब्द:-**
१) ज्याला बोलता येत नाही असा
२) सुप्रसिद्ध
३) घागरा
४) रेशमी धोतर
५) शपथ
६) रविवार
७) कलकत्त्याचे नवीन नाव
८) चरण
९) तालुक्यातील सरकारी महसुलीचे काम बघणारा अधिकारी
१०) मोठे गाव
१३) दृष्टीभेट
१८) स्वयंपाक घरातील एक छिद्राचे साहित्य
१९) वंदनाचा एक शब्द
२१) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२२) हजार शेराचे वजन
२४) कापड विणून तयार करणारा
२६) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
२८) मोठे घर, राजवाडा
२९) विरोध, प्रतिबंध
३१) सवतीबद्दलचा आकस
३३) वीरगती
३५) बटाटा वा साबुदाण्याचा तळलेला रूचकर पदार्थ
३८) उपकरण
३९) एखादा घोटाळा दाबून टाकणे दाबणे
४०) एक प्रकारचा लांब अंगरखा
४४) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
४६) किंमत
५०) छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारा ब्राह्मण
५१) हादरा, धडक
५३) पहारेकरी
५४) बसण्याची फळी
५६) अनुमती, मान्यता
५७) गावाची हद्द
५९) हवा, वारा
६२) पिता
६३) नूतन, जुनाच्या विरुद्ध
६४) शिक्षक
६५) दहावी रास
६६) मृत्यू नसलेला
६७) निकट, जवळ
७०) चिंतन
७४) दह्याचे पातळसर पेय

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# एण्ड टीव्हीवरील अलौकिक शक्तीसंदर्भातील विनोदी मालिका घरवाली पेडवाली' मध्ये हर्ष वशिष्ट रमेशच्या भूमिकेत!

**मुंबई, १९ सप्टेंबर :** एण्ड टीव्हीवरील आगामी नवीन मालिका घरवाली पेडवाली' प्रेक्षकांना भयावह ट्विस्ट, विनोद, भावना व अलौकिक शक्तीसंदर्भातील धमालीसह हसवून-हसवून लोटपोट करण्यास सज्ज आहे. या उत्साहामध्ये भर करत आहेत सुप्रसिद्ध व प्रतिभावान अभिनेता हर्ष वशिष्ट. टेलिव्हिजनवरील काही संस्मरणीय मालिकांमध्ये उत्तम भूमिका साकारण्यासह त्यांचे सर्वोत्तम करिअर राहिले आहे. ते मालिकेमध्ये रमेशची भूमिका साकारणार आहेत, ज्याला प्रेमाने द चिल्ड चाचा' म्हणतात. या भूमिकेसह ते निश्चिंत, विनोदी व धमाल मोहकतेची भर करतात, जे प्रेक्षकांना हसवून हसवून लोटपोट करतील, तसेच चर्चा करण्यास भाग पाडतील. त्यांची अद्वितीय ऊर्जा त्यांना या असामान्य प्रेम त्रिकूट असलेल्या मालिकेचा भाग असणे स्वाभाविक बनवते.

या भूमिकेबाबत आपला आनंद व्यक्त करत हर्ष वशिष्ट ऊर्फ रमेश म्हणाले, माझी कॉमेडी करण्याची इच्छा होती, कारण तुम्हाला माहित आहे की सध्या भारतीय टेलिव्हिजनवर क्वचितच विनोदी मालिका पाहायला मिळतात. गेल्या काही वर्षांपासून मी या शैलीमध्ये काम करणे खूप मिस करत होतो आणि या प्रोजेक्टसाठी विचारण्यात आले तेव्हा मला लगेचच ही भूमिका योग्य असल्याचे वाटले. मालिकेची संकल्पना नवीन आहे, टीम अद्भुत आहे आणि कथानक उत्तम आहे. मला या उत्तम प्रकल्पाचा भाग असण्याचा खूप आनंद झाला आहे आणि रमेशच्या भूमिकेसाठी माझ्यावर विश्वास दाखवण्याकरिता एण्ड टीव्ही, पेनिन्सुला पिक्चर्स, प्रोडक्शन व माझ्या कास्टिंग दिग्दर्शकांचे मी मनापासून आभार मानतो.''


## आज का अंदाज

शनिवार २० सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| १ ४ ५ ८ | |
| २१० ७८९ १४० ५६७ | |
| ३८० ६८० २६७ ३५० | |
| ४७० ५९० ३५७ १८९ | |
| ११ ४१ ५० ८० | |
| १७ ४७ ५२ ८२ | |
| १३ ४३ ५६ ८६ | |

**२० सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ६२ | ९१ | ०१ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ |
| ३४ | ६४ | ९५ | ०५ |
| १४८ | १६९ | १८० | ३७० |
| ३४६ | ३४९ | ३७९ | ५७८ |
| ४९० | २५९ | २७० | १३६ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ २ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** तुमच्या कामाच्या शैलीत सर्जनशील बदल करण्याचा प्रयत्न करा, ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. लपलेल्या शत्रूंच्या जाळ्यात अडकण्याचे टाळा. तुम्ही कामातील अडथळे दूर करू शकाल.

**वृषभ :** नोकरी बदलताना सावधगिरी बाळगा. तुमचे पैसे हुशारीने वापरा. प्रेमसंबंधांमध्ये परस्पर समजुतीचा अभाव असेल. एकमेकांवर विश्वास वाढवण्याची गरज असेल. आर्थिक बाबींमध्ये सुधारणा होईल.

**मिथुन :** व्यवसाय सुरू करण्याच्या योजना यशस्वी होतील. उत्पन्नाचे स्त्रोत वाढू शकतात. जमिनीशी संबंधित कामात अनावश्यक अडथळे येऊ शकतात. तुम्ही कामात व्यस्त राहाल.

**कर्क :** अपेक्षित सार्वजनिक पाठिंबा तुमचे राजकीय वर्चस्व वाढवेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या बॉसशी वाद घालू नका. क्रीडा स्पर्धांमध्ये तुम्ही यशस्वी व्हाल. कुटुंबात एका नवीन सदस्याचे आगमन होईल.

**सिंह :** आज तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल. एखाद्या महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल. तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. व्यवसाय योजना गुप्तपणे राबवा.

**कन्या :** पूर्वी रखडलेली कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. तुमचे मन इतर गोष्टींमध्ये अधिक व्यस्त असेल. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये मतभेद होऊ शकतात. कोणतेही मोठे निर्णय घेऊ नका.

**तुळ :** तुमच्या मुलांकडून तुम्हाला आनंदाची बातमी मिळेल. एखाद्या देवतेच्या दर्शनाची संधी मिळेल. एक जुना मित्र आणि त्याचे संपूर्ण कुटुंब तुमच्या घरी येईल. शारीरिक अस्वस्थता आणि मानसिक ताण येऊ शकतो.

**वृश्चिक :** नोकरी बदलणे फायदेशीर ठरू शकते. नफा मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी मोठा खर्च करावा लागू शकतो. अनावश्यक खर्च टाळा.

**धनु :** तुमचं अडकलेलं काम पूर्ण होऊ शकतं. राजकीय विरोधक तुमच्या कामांवर लक्ष ठेवतील. तुमच्या सामाजिक प्रतिष्ठेकडे विशेष लक्ष द्या. लोभ टाळा. नोकरीत पदोन्नती मिळू शकते.

**मकर :** प्रेमविवाहाची योजना आखणा ?यांना मित्राकडून विशेष सहकार्य मिळेल. प्रेमसंबंधात, तुमच्या भावना सकारात्मक ठेवा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीने एकमेकांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत.

**कुंभ :** आज कामाच्या ठिकाणी बढती मिळाल्याने तुमचा उत्साह वाढेल. सत्तेत असलेल्यांना नवीन जबाबदाजया मिळतील. तुमच्या भावनांना दिशा द्या. कोणत्याही प्रभावाखाली येऊ नका.

**मीन :** व्यवसायात तुमच्या सासरच्या लोकांकडून तुम्हाला विशेष सहकार्य मिळेल. तुम्ही सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी व्हाल. सामाजिक कार्याकडे तुमचा कल वाढेल. तणाव टाळण्याचा प्रयत्न करा.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा अॅड. फुंडकर यांच्या हस्ते शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १९ :

अकोला मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा जिल्हयात कापशी येथे शुभारंभ कापशी रोड येथे पालकमंत्री अॅड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते झाला. आपल्या गावाला समृद्ध करण्याची संधी आहे. या अभियानातील उद्दिष्टांची पूर्तता करून गाव उन्नतीपत्र नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावे, असे आवाहन पालकमंत्री अॅड. फुंडकर यांनी येथे केले. ग्रामविकास विभागातर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत स्वच्छता ही सेवा तसेच राष्ट्रीय पोषण माह या उपक्रमांचा जिल्हास्तरीय शुभारंभ पालकमंत्री अॅड. फुंडकर यांच्या हस्ते कापशी रोड येथे विशेष ग्रामसभेत झाला.

त्यावेळी अॅड. फुंडकर यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा सामान्य प्रशासन दिगंबर लोखंडे, महिला व बालविकास अधिकारी राजश्री कोलखेडे, सरपंच वेणुताई उमाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी बळीराम गाढवे, उपसरपंच अंबादास उमाळे यांच्यासह गावकरी उपस्थित होते .जिल्हाधिकारी वर्षा मीना, सीईओ अनिता मेश्राम, उपसरपंच अंबादास उमाळे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक उप मुख्य कार्यकारी दिगंबर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन विकास पल्हाडे, तर आभारप्रदर्शन केंद्रप्रमुख बंडावार यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा पालकमंत्र्यांचा हस्ते शुभारंभ झाला.

# घारफळ मंडळातील पावसाने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला

■ महासागर प्रतिनिधी
बाभुळगाव, दि. १९ :

तालुक्यातील घारफळ मंडळामधील लोकसंख्येनेच नव्हे, तर प्रगतशील शेतकऱ्यांचा भरणा असलेले मोठे गाव घारफळ, सरुळ, फाळेगाव परिसरात गेल्या सव्वा महिन्यापासून (पावसाळी व्रत) अविरत सुरू असलेल्या अतिवृष्टी, संततधार, मुसळधार रिपरीप व धो-धो पावसाने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. परिसरातील परसोडी, शिंदी, पाचखेड, एरंडगाव, सारफळी, खर्डा, गवंडी, बारड, कोल्ही, महमदपूर, बागवाडी आदी गावांना या पावसाचा चांगलाच फटका बसला.



शेतकरीच नव्हे तर जनमानसांना या पावसाने सळोकी पळो करून सोडले आहे. नदी नाले वरचेवर दुथडी भरून वाहत असून काहींच्या शेताला तलावाचे स्वरूप आले आहे, तर काही शेत पूर्णतः जलमय झाले आहे. शिवाय कधी नव्हे अशा मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाने परिसर भयभीत झाला आहे. जीवित हानी वगळता शेतमालांचे व घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या मंडळामधील बहुतांश शेतजमीन पान बसन व चीबाड असल्याने या सव्वा महिन्याच्या सतत च्या पावसाने शेतजमीन शेवाळून गेली असून आता तर पाझरू लागली आहे. पिकांवर नैसर्गिक अवकृपा व ढगाळ वातावरणामुळे पांढरी माशी, उंट अळी, हिरवे घोडे, मावा, तुडतुडे, रस शोषण कीड, तांबेरा , पिवळा-मोजाक हुमणी अळी, बोंड अळी , आदी अपरिचित रोगाने सोयाबीन, कपाशी व इतर खरीप पिकांवर आक्रमण केले आहे.

रोगनाशक, तन -नाशक , निंधन- खुरपण व डवरणी आदी शेतीची कामे अविरत पावसामुळे ठप्प झाली आहे. पूर्णतः कोलमडली आहे. तसेच मानवी रोगराईने सुद्धा परिसर भयभीत झाला आहे. आत्ताच शेतकऱ्यांच्या पिकांची अवस्था वाईट झाली आहे.

केंद्र सरकारने कपाशीवरील आयात शुल्क कमी केले असून कापसाचे दर कोसळणार हे निश्चित झाले आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे उत्पन्नात घट होणार असून बी-बियाण्याचे, खत औषधांचे, वाढीव किंमती, तसेच वाढती मजुरी यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

शेतकऱ्यांचा खरिप हंगाम हातचा गेल्याने संसाराचा गाडा कसा हाकावा हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.

# कदमापूर येथील यात्रा महोत्सवाला भाविकांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. १९ :

तालुक्यातील कदमापूर येथे क तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेले इतिहासकालीन आई तुळजाभवानी मातेचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरामध्ये दरवर्षी इंदिरा एकादशीला यात्रा भरत असते. या यात्रोत्सवाला अनेक वर्षाची परंपरा आहे.यादिवशी यात्रेमध्ये राज्यभरातून बाहेरगावावरुन अनेक भाविक श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात. १७ सप्टेंबर रोजी कदमापूर येथे आई तुळजाभवानी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी कदमापूर येथील आई तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे जावुन तुळजाभवानी मातेची पुजा-अर्चा करुन दर्शन घेतले.यावेळी ज्येष्ठ नेते पंजाबराव देशमुख, मनोज वानखडे, पवन पवार, विकास भोसले आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आई तुळजाभवानी मंदिराच्या वतीने मंदिराचे पुजारी विनोद जोध तसेच श्री चंदनशेष महाराज संस्थान कदमापूर तर्फे देविदास महाराज बघे यांनी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांचा सत्कार केला. यावेळी शेख आसीफ, सोपान दारमोडे, ज्ञानेश्वर दारमोडे, अतुल भगत, सौरभ भगत, एकनाथ शिशिर, अशोक शिशिर, सौरभ दारमोडे, सचिन भगत,गजानन गव्हाळे, माणिक गव्हाळे उपस्थित होते. सकाळी गावातून देवीची भव्य मिरवणूक यात्रोत्सवानिमित्त सकाळी गावातुन आनंदी आणि उत्साही वातावरणामध्ये देवीची भव्य मिरवणुक काढुन ठिक-ठिकाणी घरोघरी आई तुळजाभवानी मातेची पुजा-अर्चा करण्यात आली. यात्रोत्सवानिमित्त कदमापूर येथे अनेक व्यावसायिकांनी खेळणी व इतर साहित्यांची दुकाने थाटली होती. जवळपास १० ते १५ हजार भाविकांनी आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले.

## विद्या मंदिर कन्या शाळेत स्नेहमिलन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १९ :

भारतीय सेवा सदन संचालित विद्या मंदिर कन्या शाळेत माजी विद्यार्थिनींचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमात शाळेच्या माजी विद्यार्थिनी स्नेहल अवस्थी, छाया छावछरिया, गरीमा भट्ट, कृष्णा उपाध्याय, लता पिल्ले, रंजना कछवाहा आणि पारुल सायानी उपस्थित होत्या. कार्यक्रमात मुख्याध्यापिका माधुरी ठाकूर आणि शिक्षकांनी सर्व माजी विद्यार्थिनींना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. अनुभव सांगताना माजी विद्यार्थिनींनी शाळेतील गुरुजनांचा प्रेमळ, शिस्तबद्ध सल्ला आणि कठोरतेतून मिळालेल्या संस्कारांमुळेच आज त्या आयुष्यात यशाच्या शिखरावर पोहोचल्या असल्याचे नमूद केले. या सर्व विद्यार्थिनी १९८२-८३ मध्ये दहावीत शिक्षण घेत होत्या. त्यांनी त्या काळातील कडक पण मूल्यप्रधान वातावरणालाच आपल्या यशाची खरी पायाभरणी असल्याचे सांगितले.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेची शासनाकडे मागणी



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १९ :

गेल्या काही आठवड्यांपासून अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची अक्षरशः झोप उडाली आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील विविध भागांत उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. जिल्ह्यात कपाशी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, संत्रा, भाजीपाला यासह अनेक पिकांचे सुमारे ७० ते ७५ टक्के नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची मागणी निवेदनाद्वारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. तसे निवेदन विभागीय आयुक्तांना दिले आहे.

कपाशी हे पीक सध्या पातेफुलांच्या अवस्थेत असून पावसाच्या माऱ्यामुळे पाने पिवळी पडत आहेत व पातेगळ मोठ्या प्रमाणात होत आहे. जमिनीत पाण्याचे साचलेपण वाढल्यामुळे अन्नद्रव्य शोषणात अडथळा येतोय. त्यामुळे बुरशीजन्य रोगही मोठ्या प्रमाणावर फैलावत असून कपाशी उत्पादनात सुमारे ७० ते ८० टक्केपर्यंत घट येण्याची शक्यता आहे. सोयाबीन पिकाची अवस्था देखील चिंताजनक आहे. शेंगा भरत नसून, झाडे पिवळी पडली आहेत. यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. दुसरीकडे, तूर पीक वाढीच्या अवस्थेत असताना पाण्याच्या अतिरेकामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. मूग, उडीद, संत्रा व भाजीपाला यांचीही अवस्था बिकट झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशी शेतकऱ्यांची जोरदार मागणी आहे.

शासनाने तत्काळ याची दखल घेऊन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. निवेदन देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमित अढाऊ यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूरग्रस्तांना मदत द्या

## चिखली शिवसेना आक्रमक



■ महासागर प्रतिनिधी
चिखली, दि. १९ :

चिखली शहरावर झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे ख्वाजा नगर व सैलानी नगर भागातील नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरांतील साहित्य, वस्तू, निवासस्थान व उपजीविकेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही अद्याप शासनाकडून मदत मिळालेली नाही. सदर नुकसानग्रस्तांना तत्काळ मदत प्रदान करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेच्यावतीने (शिंदे गट) करण्यात आली आहे.या मागणीची दखल घेण्यात आली नाही तर शिवसेना स्टाइलने आक्रोश मोर्चा काढण्यात येईल असा इशारा दिला आहे. हा इशारा एका निवेदनाद्वारे १८ सप्टेंबर रोजी देण्यात आला आहे. दरम्यान, यावेळी चिखली शिवसेना शहर प्रमुख विलास घोलप यांच्या नेतृत्वात शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि पूरग्रस्त महिला-पुरुष नागरिकांनी चिखली तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या ठिकाणी तहसील प्रशासनाला निवेदन देवून मदतीची मागणी करण्यात आली. "पुरामुळे नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्रशासनाने पंचनामे करूनही नुकसान भरपाईचा एकही पैसा नागरिकांच्या हातात पोहोचलेला नाही. हे अन्यायकारक आहे. जर शासनाने तातडीने मदत जाहीर करून प्रत्यक्ष पूरग्रस्तांच्या हातात पोहोचवली नाही, तसेच पाण्याचा निचरा व संरक्षण भिंतीची कामे तातडीने हाती घेतली नाहीत, तर आम्ही शिवसेना स्टाइलने रस्त्यावर उतरू. गरज पडल्यास प्रशासनाविरोधात आक्रोश मोर्चा काढण्यात येईल आणि त्याची जबाबदारी प्रशासनाची असेल. असा इशारा चिखली शहर प्रमुख विलास घोलप प्रशासनाला दिला आहे.

निवेदन देताना शिवसेनेचे उप जिल्हा प्रमुख शिवाजीराव देशमुख, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया मस्के, कैलास भालेकर, अनमोल ढोरे, अल्पसंख्यांक उप जिल्हा प्रमुख सादिक काजी, शेख साहिल काझी, बाबुभाई, शिवाजी शिराळे, रामभाऊ देशमुख, मनोज वाघमारे, श्रीकांत टेहरे, अमर काळे, महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख कल्पना बोधेकर, देशमुख, विजया पाटील, शेख बबलू, विकी निकाळजे, विक्रांत नकवाल, राका मेहेत्रे, विठ्ठल जगदाळे, अनिल जाधव, बंडू नेमाने उपस्थित होते.

# आरोग्यवर्धिनी योग शिक्षकांची पुनर्नियुक्ती करा

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. १९ :

आरोग्यवर्धिनी योग शिक्षकांचे मागील आठ वर्षांपासून सुरू असणारे योग सत्र शासनाने कोणतेही कारण न देता अचानक बंद केले आहे; तसेच त्यांचे मागील वर्षीचे मानधनही देण्यात आले नाही. योग शिक्षकांना पुन्हा सेवेत रुजू करून मागील वर्षभराचे रखडलेले मानधन देण्यात यावे यासह आदि मागण्यांकरिता गुरूवार, दि. १८ सप्टेंबर रोजी आरोग्यवर्धिनी योग शिक्षकांनी जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन केले. दरम्यान विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.




योग शिक्षकांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सुरू केलेली ही योजना राज्य सरकारने कोणतीही सूचना न देता अचानकपणे बंद केली आहे. त्यामुळे अत्यंत कमी मानधनावर कार्य करणारे योगशिक्षक यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यात बहुतेक योगशिक्षक महिला असून त्यात गरीब, विधवा, परित्यक्तांचा समावेश आहे. मागील मानधनही देण्यात आले नाही. ही परिस्थिती संपूर्ण राज्यात असून सर्वत्र मोठा असंतोष निर्माण झाला आहे. एकीकडे केंद्र सरकार योगाला प्रोत्साहन देत आहे.

जिल्ह्यात १०० योगशिक्षक जिल्ह्यात १०० च्या वर आरोग्यवर्धिनी योगशिक्षक आहेत. न्याय मागणीसाठी योगशिक्षक मोर्चा काढत आहेत. स्पर्धेच्या युगात योगा महत्त्वाचा घटक झाला आहे. यातून गावांमध्ये योगाचा प्रचार करण्याचे काम ही मंडळी पार पाडत आहे. आरोग्य सरकारच्या दुर्लक्षामुळे बिघडण्याचा धोका वाढला आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी ८ जुलै रोजी जिल्ह्यातील आरोग्यवर्धिनी योग शिक्षकांनी जिल्हा कचेरीवर धडक देवून विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान

■ महासागर प्रतिनिधी,
दर्यापूर, दि. १९ :

दर्यापूर मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे दर्यापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाले. शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी युवासेना विधानसभा समन्वयक (ऊबाठा ) पंकज राणे यांनी तहसीलदार डॉ.रवींद्रकुमार कनडजे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. अतिवृष्टीमुळे सामदा, सासन, नांद्रूण, पाथरवीरा, रामागड, करतखेडा, रामतीर्थ, लासूर, टोंगलाबाद, मैसपूर, धामोडी, शिवर, हिंगणी, पिंपळोद, जैनपूर, सुकळी, भमोद आणि लोतवाडा या गावांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पाणी साचल्याने उभी पिके नष्ट झाली आहेत. तर काही शेतकऱ्यांची नाल्यालगतची शेतजमीन अक्षरशः वाहून गेली आहे. या गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यांना शासनाकडून तातडीने नुकसान भरपाई जाहीर करण्यात यावी.

# हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण जाहीर करण्याची बंजारा समाजाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
बाभूळगाव, दि. १९ :

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसुचीत जमातीचे आरक्षण जाहीर करुन अंमलबजावणी करावी. बंजारा समाज हा अति मागासवर्गीय समाज असून या समाजाला अनुसुचीत जमातीत समाविष्ट करुन तशी शिफारस केंद्राकडे करावी. अशी मागणी असलेले निवेदन बंजारा समाजाची संघटना राष्ट्रीय बंजारा टायगर्सच्या वतीने तालुकाध्यक्ष दिनेश मोहन पवार यांच्या नेतृत्वात १८ सप्टेंबर रोजी तहसीलदार तथा पोलीस निरीक्षक बाभूळगाव यांना देण्यात आले.




महाराष्ट्रातील मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण देण्यासाठी त्यांना हैदराबाद गॅझेटनुसार ज्यांच्या कुणबीच्या नोंदी असतील त्यांना ओबीसीचे आरक्षण देण्यासंदर्भात नुकतेच शासनाचे परिपत्रक काढले आहे. निवेदन पाठवून आरक्षणाची मागणी केली आहे. यावेळी तालुकाध्यक्ष दिनेश मोहन पवार, दिनेश शालिक पवार, आकाश राठोड, सुनील राठोड, शुभम चव्हाण, जयेश जाधव, प्रवीण पवार, सुदाम जाधव, गोकुळ राठोड, प्रेमदास पवार, प्रदीप पवार, अर्जुन चव्हाण, रवी चव्हाण, अनिल राठोड, अजय आडे आदींसह असंख्य बांधव उपस्थित होते.


**PUBLIC NOTICE**

**Process. No. 6277 Dt. 04-09-25**
**IN THE COURT OF JOINT CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, NAGPUR Room No. 416-A**
**M. J. C. Case No. 554/2025 Fixed For : 04/10/2025**

Applicant : 1) 1) Jyoti Gopalrao Navkhare, 2) Swati Subhash Zode, 3) Renuka Gopalrao Navkhare, 4) Puja Gopalrao Navkhare
--Versus-- Non-Applicants: Nil
Name of Deceased : 1) Gopalrao S/o Narayanrao Navkhare Died On: 25/03/2021 R/o Plot No. 112, Radhananda Nagar, Manewada Besa Road, Nagpur

Whereas **Gopalrao S/o Narayanrao Navkhare Died On: 25/03/2021 R/o Plot No. 112, Radhananda Nagar, Manewada Besa Road, Nagpur** and Whereas **Jyoti Gopalrao Navkhare & oth.** has presented an application to this Court for grant of **Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act 1827.** This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants **Jyoti Gopalrao Navkhare & oth.** as Legal Heir of the deceased to appear in the **Court of Joint Civil Judge Junior Division, Nagpur on 04th Day of October, 2025 at 10.30 A.M.** there to enter their objections and it is hereby declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate of Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the court, that **11th day of Sept., 2025.**

Seal — By order of the Court
Asstt. Supdt. (T. W.)
Civil Judge Sr. Dn. Nagpur.

Vision4media 9767867322



महसूल व वनविभाग
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड- ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार ... [illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

महसूल व वनविभाग
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार ... [illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

महसूल व वनविभाग
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार ... [illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**Change Of Name**

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **J3367529.** MY OLD NAME WAS **VAIBHAUSINGH CHANDEL.** NOW MY NEW NAME IS **VAIBHAV KARANSINGH CHANDEL.**
**ADD :** ALLAPALLI ROAD, SHIVAJI WARD BALLARPUR 442701

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **H1242155.** MY OLD NAME WAS **AAMENA SAYEDA.** NOW MY NEW NAME IS **AAMENA SYEDA.**
**ADD :** FLAT NO 302 MADINA APARTMENT ANANT NAGAR NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **TULSIDAS BHAURAO RAHANGDALE.** NOW MY NEW NAME IS **TULASIDAS BHAURAO RAHANGDALE.**
**ADD :** AT - RAMDARA SHIKSHAK COLONY, POST-TALEGAON, TAH-ASHTI, WARDHA - 442202

MY PASSPORT NO. **B5795009** IS MY INCORRECT NAME WAS **SHAMIM ABDUL GAFFAR NAGANI.** NOW CORRECT NAME IS **SHAMIM ABDUL GAFFAR NAGANI KACHI.**
**ADD:** FLAT NO.101,SHANTI NAGAR, RATAN TOWER BUILDING NO.1,SHANTI NAGAR, NAGPUR MS 440002

MY PASSPORT NO.**B5309468** IS MY INCORRECT NAME WAS **HAJI NURMOHAMMAD ABDUL GAFFAR.** NOW CORRECT NAME IS **ABDUL GAFFAR HAJI NOOR MOHAMAD NAGANI.**
**ADD:** FLAT NO.101,SHANTI NAGAR, RATAN TOWER BUILDING NO.1,SHANTI NAGAR, NAGPUR MS 440002


I **SHAMIM ABDUL GAFFAR NAGANI KACHI** DECLARED THAT MY HUSBAND PASSPORT NO.**B5309468** IS MY INCORRECT NAME WAS **SHAMEEM NAGANI.** NOW CORRECT NAME IS **SHAMIM ABDUL GAFFAR NAGANI KACHI.**
**ADD:** FLAT NO.101,SHANTI NAGAR, RATAN TOWER BUILDING NO.1,SHANTI NAGAR, NAGPUR MS 440002

MY INCORRECT NAME WAS **KHAN JEBA ABDUL SATHAR** NOW NEW CORRECT NAME **IS ZEBA AFRIN SYED ARIF.**
**ADD:** PLOT NO.39/A, K.G.N SOCIETY, NEAR PALLOTI SCHOOL, PALLOTI NAGAR, KATOL ROAD, NAGPUR 440013 MS



RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण



ठिपके जुळवा




## ज्यूसेप्पेची गोष्ट

इटालियन लोककथा

खूप वर्षांपूर्वी इटलीतल्या डोंगराळ गावात ज्यूसेप्पे नावाचा एक गरीब माणूस राहत होता. तो रोज शेतात काम करायचा. लाकूड तोडायचा. पण कितीही मेहनत केली तरी त्याच्याकडे पुरेसे अन्न नसायचे. त्याचे कपडे फाटके होते. त्याचे घर म्हणजे झोपडी होती.

एके दिवशी संध्याकाळी तो थकून भागून चालत घरी येत होता. अचानक त्याला रस्त्यात एक साधूमहाराज भेटले. त्यांनी विचारले, तू एवढा दमलेला का दिसतोस? ज्यूसेप्पेने आपली गरीबीची परिस्थिती सांगितली. त्याचा प्रामाणिकपणा आणि चांगले मन पाहून साधूमहाराजांनी त्याला एक छोटीशी पिशवी दिली.

'ही जादूची पिशवी आहे. तुला जे काही हवे असेल ते यातून मिळेल. पण लक्षात ठेव, फक्त गरजेपुरतेच मागायचे. लोभ केलास तर पिशवीची जादू निघून जाईल.'साधूमहाराज म्हणाले.



ज्यूसेप्पे घरी आला आणि पिशवीकडे पाहून म्हणाला, माझ्या कुटुंबाला भरपूर जेवण हवे. आणि क्षणात पिशवीतून गरमागरम जेवण बाहेर आले! मग त्याने कपडे मागितले. घर मागितले. त्याला सगळे मिळाले. त्याचे आयुष्य खूप सुंदर झाले. गावकऱ्यांनाही त्याने मदत केली.


पण काही महिन्यांनी त्याच्या मनात लोभ निर्माण झाला. 'मला सोन्याचे ढीग हवेत. मला मोठा महाल हवा. 'तो पिशवीला म्हणाला. पण पिशवीतून काहीही बाहेर आले नाही. पुढच्याचक्षणी आधी दिलेली सगळी संपत्ती देखील नाहीशी झाली.

ज्यूसेप्पे परत गरीब झाला. पण ज्यूसेप्पेला आपली चूक कळली होती. त्याला समजले होते, की खरी श्रीमंती म्हणजे पैसा नव्हे तर समाधान. त्याने पुन्हा कष्टाने काम करण्यास सुरुवात केली. त्याला कळून चुकले होते की,लोभामुळे सर्व काही नष्ट होते. पण चांगले मन आणि समाधान असेल तर जीवन नेहमी सुंदर होते.

## कसा आहे आपला मेंदू?

जाणून घ्या

मुलामुलींनो, आपला मेंदू शरीरावर नियंत्रण ठेवतो. मेंदूमार्फत शरीराच्या विविध अवयवांना संदेश पोहोचवला जातो. आपल्या मेंदूचं वजन दीड किलोपर्यंत असतं. मानवी मेंदू खूप सक्षम असतो. आपल्या मेंदूमध्ये बरेच सेन्सर्स आणि प्रोसेसर्स असतात. माणसाच्या मेंदूवर आजवर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. आपला मेंदू एका सेकंदात जवळपास १०० कोटी क्रिया करू शकतो. काय, वाचून आश्चर्य वाटलं ना? पण हे खरं आहे. माणूस आपल्या मेंदूच्या क्षमतेपैकी फक्त दहा टक्के क्षमतेचाच वापर करतो, असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात हा गैरसमज आहे. माणूस संपूर्ण मेंदूचा वापर करतो. जागेपणीच नाही तर झोपेतही मेंदूचं काम सुरू राहतं. माणूस झोपेतही मेंदूची दहा टक्क्यांपेक्षा जास्त क्षमता वापरतो. मेंदूचा आकार आणि बुध्यांक किंवा हुशारी यांचा काहीच संबंध नसतो. आता स्पर्म व्हेलच्या मेंदूचा आकार मानवी मेंदूपेक्षा पाच पटींनी मोठा असतो. पण माणूस स्पर्म व्हेलपेक्षा जास्त हुशार असतो. त्यामुळे मेंदूचा आकार आणि हुशारी यांचा काहीच संबंध नाही हे तुमच्या लक्षात आलं असेल...




## इजिप्तची देवीमाता – नाईल

नाईल ही जगातील सर्वात लांब नदी मानली जाते. ती सुमारे६,६५० किलोमीटरलांब आहे. नाईल नदीचे दोन प्रमुख प्रवाह आहेत. व्हाईट नाईल आणि ब्ल्यू नाईल. व्हाईट नाईलचा उगम पूर्व आफ्रिकेतल्या व्हिक्टोरिया सरोवरातून होतो. तर ब्ल्यू नाईलचा उगम इथिओपियातील टाना सरोवरातून होतो. हे दोन्ही प्रवाह सुदानची राजधानी खार्तूम येथे मिळतात आणि पुढे एकत्र इजिप्त देशातून वाहत भूमध्य समुद्रात मिळतात.

इजिप्तचे प्राचीन नाव मिसर आहे. नाईल नदीमुळेच प्राचीन मिसर संस्कृती विकसित झाली. नदीच्या काठावर सुपीक माती असल्याने शेती हा प्रमुख व्यवसाय बनला.नाईल नदी तिच्या रुंद

जीवनदायिनी

पात्रामुळे वाहतुकीसाठी आणि मासेमारीसाठीही महत्त्वाची ठरली. प्राचीन इजिप्शियन लोक नाईलच्या प्रवाहाला आकाशाचा देवओसिरिसयांचा आशीर्वाद मानतात. जेव्हा नाईलचे पाणी वाढते, तेव्हा देव ओसिरिस लोकांना समृद्धी देतो असे मानले जाते.



आणखी एका कथेनुसार एकदा दुष्काळ पडला आणि नाईलचे पाणी आटले. लोकांनीओसिरिसची प्रार्थना केली. ओसिरिसची पत्नी देवी इशिसला लोकांची दया आली. तिने नदीला पुन्हा भरभरून पाणी दिले. इजिप्तमधील लोक म्हणतात, की त्या दिवसापासून नाईलचे पाणी कधीही आटत नाही.

नाईल नदीवर अनेक मोठी धरणे आणि वीजकेंद्रे आहेत.अस्वान शहराजवळ बांधलेले अस्वान हाय डॅम हे सर्वात मोठे धरण आहे. या धरणामुळेलेक नासेरनावाचे कृत्रिम सरोवर तयार झाले आहे.हे जगातील सर्वात मोठ्या कृत्रिम सरोवरांपैकी एक आहे.ब्ल्यू नाईलवरील रोजरेस धरण, सुदान येथीलमेर्वे धरण हीआणखी काही महत्वाची धरणे आहेत. इथिओपिया येथे २०११ पासून बांधकाम सुरू असलेला ग्रँड इथिओपियन रेनेसाँस डॅम हा ब्ल्यू नाईलवरील आफ्रिकेतील सर्वात मोठा हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्प आहे.

## बना व्हीएफएक्स तंत्रज्ञ

कोण होणार?

मुलांनो, तुम्ही व्हीएफएक्सबद्दल ऐकलं असेल. चित्रपट, मालिका, व्हिडिओ गेम्समध्ये विविध इफेक्ट्सचा वापर होतो. हे विज्युअल इफेक्ट्स असतात. यालाच व्हीएफएक्स तंत्रज्ञान असं म्हटलं जातं. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचा वापर करून दृश्यं तयार केली जातात. चित्रपटातली ही दृश्यं बघून आपण टाळ्या पिटतो. सध्या व्हीएफएक्सला बरीच मागणी आहे. हे क्षेत्र विस्तारत जाणार आहे. त्यामुळे तुम्ही व्हीएफएक्स तंत्रज्ञ म्हणून काम करू शकता. या क्षेत्राविषयी. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचे तीन, सहा आणि बारा महिन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही संस्थांमध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रमही चालवला जातो. व्हिडिओ प्रोडक्शन, ग्राफिक डिझाइन, मोशन ग्राफिक्स, कॅमेरा ट्रॅकिंग, फिल्म रिस्टोरेशन अशी तंत्रं शिकवली जातील. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते. बारावी किंवा पदवीनंतर तुम्ही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. कॉम्प्युटरचं ज्ञान असेल तर या क्षेत्रात जास्त चांगली प्रगती करता येईल.

व्हीएफएक्स तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रपट, मालिका, ॲनिमेशन, व्हिडिओ गेम्स, ॲप्स, व्हिडिओ, जाहिराती तसंच मनोरंजनक्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकाल. माध्यमक्षेत्रात ग्राफिक डिझायनर तसंच व्हीएफएक्स तंत्रज्ञांना बरीच मागणी आहे. महानगरांसोबतच छोट्या शहरांमध्येही बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काही तरी वेगळं करायचं असेल तर व्हीएफएक्सच्या क्षेत्रात काम करायला हरकत नाही.



## तलावांचं शहर... भोपाळ

सफर शहरांची

दोस्तांनो, आपण मध्य प्रदेशची राजधानी भोपाळबद्दल जाणून घेऊ. तलावांचं शहर अशी भोपाळची ओळख आहे. या शहरात तलावांची संख्या बरीच जास्त आहे. भोपाळमध्ये १५ पेक्षा जास्त छोटे–मोठे तलाव आहेत. भोपाळमध्ये वनविहार राष्ट्रीय उद्यानही आहे. दोस्त मोहम्मद खान यांनी भोपाळ शहर वसवलं. मुस्लीम राण्यांच्या काळात या शहराची खूप भरभराट झाली. इथली ताज–उल ही मशीद भारतातलीच नाही तर आशिया खंडातली सर्वात मोठी मशीद आहे. ही मशीद म्हणजे मुघल स्थापत्यकलेचा उत्तम नमुनाच आहे. भोपाळमध्ये गेल्यानंतर ताज महाल, बिर्ला मंदिर, मिंटो हॉल, मोती मशीद ही ठिकाणं बघायला हवीत. भोपाळमधला सुलेमानी चहा खूप प्रसिद्ध आहे. हा चहा गोड आणि खारट असतो. वेगळ्या चवीचा हा चहा एकदा तरी चाखायला हवा. इथला राजू टी स्टॉल खूप प्रसिद्ध आहे. सुलेमानी चहाप्रमाणेच भोपाळी पान खूप प्रसिद्ध आहे. यासोबतच लस्सीवाला फालुदा खाण्यासाठीही लोक इथे येतात.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) भारताने एकदिवसीय क्रिकेटचा विश्वचषक किती वेळा जिंकला आहे?
२) शांतीचा संदेश देणारा रंग कोणता?
३) दार्जिलिंगमध्ये कोणतं पिक होतं?
४) चॉकलेट्ससाठी प्रसिद्ध असलेला आफ्रिकेतला देश कोणता?
५) मायक्रोसॉफ्टचे संस्थापक कोण?
६) सेऊल ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
७) गिझा पिरॅमिड्स कुठे आहेत?
८) जगातलं सर्वात घनदाट जंगल कोणतं?
९) स्वराज पक्षाची स्थापना कोणी केली?
१०) ब्रिटिशांनी आपली राजधानी कोलकात्याहून दिल्लीला कधी हलवली?

उत्तर: १) दोन वेळा २) पांढरा ३) चहा ४) घाना ५) बिल गेट्स ६) दक्षिण कोरिया ७) इजिप्त ८) ॲमेझॉन ९) सी. आर. दास १०) १९११

## ओळख वाद्यांची – तबला

भारतीय शास्त्रीय संगीतात तबला हे सर्वात महत्त्वाचे तालवाद्य मानले जाते. तबला आणि डग्गा अशी ही जोडी असते. या जोडीतील तबला उजव्या हाताने वाजवला जातो, तर बाया किंवा डग्गाडाव्या हातानेवाजवला जातो.चांगल्या प्रतीचा खैराचा किंवा शिसवी लाकडाचा तुकडा आतून कोरून पोकळ बनवला जातो.या पोकळ भांड्याच्या तोंडावर जनावरांचे चामडे घट्ट बसवण्यात येते. या कातडी आवरणास पुडी असे म्हणतात. यावर आणखी एक गोल किनार केवळ कडांवर बसवण्यात येते. यास चाट किंवा गोट म्हणतात. तबला आणि डग्गा यांच्या पृष्ठभागावर मधोमध काळी शाईसारखी गोलाकार पेस्ट लावलेली असते, तिला श्याही म्हणतात. तबल्याची पट्टी म्हणजेच आवाजाचा पोत शाईच्या थरावरून निश्चित होतो. ही पट्टी निश्चित करण्यास मुख्यत्वे बाजाच्या पेटीचा वापर करतात.ही श्याही ध्वनीला विशिष्ट स्वर आणि गडगडाट देते. वादन शैलीतील फरकांमुळे तबल्यात स्वतःची वेगळी वैशिष्ट्ये असलेली अनेक घराणी निर्माण झाली आहेत. दिल्ली घराणे,लखनौ घराणे, पंजाब घराणे, बनारस, इंदूर, फरूखबाद, अजवाडा ही तबलावादनातील प्रसिद्ध घराणी आहेत. तबल्याच्या बोल नावाच्या विशिष्ट ठेक्यांमधून विविध ताल रचले जातात. दादरा, कहरवा, झपताल, त्रिताल हे लोकप्रिय ताल आहेत. तबल्याचा वापर भक्तिगीत, भजन, नाट्यसंगीत, गझल, फिल्मी गाणी आणि आजच्या फ्युजन संगीतातही मोठ्या प्रमाणावर होतो. उस्ताद अहमद जान थिरकवा, अल्ला रक्खा, झाकीर हुसेन अशा अनेक महान कलाकारांनी तबल्याला जागतिक ओळख मिळवून दिली. तालाचे सौंदर्य आणि गती यामुळे तबला कोणत्याही संगीताला जीवनदान देतो.



## तंत्रकरामतींचं भन्नाट जग

न्यू टेक

सीईएस हा जगातला सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक्स शो आहे. लास वेगासमध्ये या इलेक्ट्रॉनिक्स शोचं आयोजन केलं जातं. इथे भन्नाट गॅझेट्स, नवं तंत्रज्ञान सादर केलं जातं. अशाच काही हटके तंत्रज्ञानावर नजर टाकू या.

- बाथरूम फिटिंग्ज बनवणाऱ्या कोहलर या कंपनीने नुमी २.० हे इंटेलिजंट टॉयलेट सादर केलं आहे. या टॉयलेटमुळे पाण्याची बचत होते. शिवाय ते स्वत:च स्वत:ची स्वच्छता करतं. त्यामुळे हे टॉयलेट स्वच्छ करण्याची गरज भासत नाही.
- पोलन रोबोटिक्स या कंपनीने रिची नावाचा रोबो तयार केला आहे. या रोबोमध्ये माणसासारखे गुण आहेत. रिचीचा वापर वेगवेगळ्या कामांसाठी केला जाणार आहे. गरजेनुसार या रोबोच्या शरीराचे भाग वेगळे करता येतात.
- नियोफॅक्ट या कंपनीने स्मार्ट ग्लोव्हज सादर केले आहेत. हे ग्लोव्हज ॲपला कनेक्ट करता येतात. हे ग्लोव्हज घालून गेमही खेळता येतो.
- बॅग किंवा सामानाच्या सुरक्षेसाठी एक अनोखं उपकरण तयार करण्यात आलं आहे. 'मिमिक गो' असं या उपकरणाचं नाव आहे. यातले सेन्सर्स हालचाल ओळखू शकतात. कपाट, बॅग, दार यापैकी कशालाही हे उपकरण लावता येईल. सामान हरवलं किंवा चोरीला गेलं तर युजरला सूचना मिळू शकेल.
- पाळीव प्राण्यांच्या तब्बेतीबाबत जाणून घेण्यासाठी लँगुआलेस नावाचं उपकरण उपयुक्त ठरू शकतं.



### दोस्त हे मस्त

#### असे हे पाणघोडे



छोट्यांनो, पाणघोडा ही माशांची एक प्रजाती आहे. तोंडाचा आकार घोड्याच्या तोंडासारखा असल्यामुळे त्याला पाणघोडा असं म्हटलं जातं. पाणघोड्याची भूक प्रचंड असते. म्हणून ते सतत चरत असतात. पाणघोड्यांना पोट आणि दात नसतात. म्हणूनच उपासमार होऊ नये म्हणून त्यांना सारखं खावं लागतं. पाणघोडे आपल्या शेपटीचा वापर शस्त्रासारखा करतात. शत्रूपासून बचाव करण्यासाठी पाणघोडे रंग बदलतात. आसपासच्या वातावरणानुसार त्यांचा रंग बदलतो. त्यांचे दोन डोळे एकाच वेळी दोन ठिकाणी बघू शकतात. म्हणजे त्यांचा एक डोळा समोर बघत असेल तर दुसरा डोळा मागे बघू शकतो. म्हणजे पाणघोडे एकाच वेळी सगळीकडे लक्ष ठेऊ शकतात!

### खादाडी

#### गरमागरम नूडल सूप



मुलांनो, थंडीच्या दिवसात गरमागरम सूप प्यावंसं वाटतं. तुम्हाला नूडल्सही आवडतात. मग मस्तपैकी नूडल्स सूप बनवता येईल. यासाठी दोन गाजरं, एक टोमॅटो, बारीक चिरलेला कोबी, थोडी कांद्याची पात, एक चमचा तेल, अर्धी सिमला मिरची, मीठ, नूडल्स आणि एक चमचा कॉर्नफ्लोर असं साहित्य घ्या. सर्व भाज्यांचे छोटे तुकडे करा. आता एका कढईत तेल गरम करून घ्या. त्यात भाज्या घालून दोन मिनिटं परता. यात चार कप पाणी आणि नूडल्स तसंच मीठ घाला. आता दहा मिनिटं शिजू द्या. आता वाटीत थोडं पाणी घ्या. त्यात कॉर्नफ्लोर आणि मिरपूड घाला. नीट मिसळून घ्या. हे मिश्रण सूपमध्ये घाला. मिनिटभर शिजवा. अधूनमधून हलवत रहा. गॅस बंद करा. तुमचं सूप तयार आहे.

### स्टडी टिप्स

#### करा उजळणी



मुलांनो, गणिताची भीती तुम्ही अगदी सहज घालवू शकता. यासाठी सराव आणि उजळणी या दोन गोष्टी लक्षात ठेवा. गणिताची प्राथमिक सूत्रं असतात. ही सूत्रं लक्षात ठेवली की तुम्हाला गणित जमलंच म्हणून समजा. गणिताची सूत्रं समजून घेण्यासाठी जुनी पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचा. पुस्तकं वाचून काही समजलं नाही तर शिक्षकांची मदत घ्या. पाया बळकट असेल तर गणिताचा पेपर कधीच कठीण जाणार नाही.

### योगा

#### वक्रासन करून वाढवा उत्साह



दोस्तांनो, सारखा कंटाळा येत असेल, अभ्यास करण्यात, खेळण्यात किंवा कोणत्याही कामात उत्साह वाटत नसेल तर योगासनं करता येतील. काही योगासनांमुळे तुमच्यात उत्साहाचा संचार होऊ लागतो. अभ्यासात, खेळण्यात उत्साह येण्यासाठी तुम्ही वक्रासन करू शकता. हे अगदी सोपं आसन आहे. हे आसन केल्यानंतर तुमचा सगळा आळस दूर निघून जाईल.

# मंत्र्यांनी विदर्भात केवळ पर्यटनासाठी येवू नये

## जबाबदारीने काम करा, राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना प्रफुल्ल पटेल यांचे खडेबोल

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी विदर्भात केवळ पर्यटनासाठी येऊ नये, असे खडेबोल राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी येथे आयोजित राष्ट्रवादीच्या चिंतन शिबिरात सुनावले.

दोन तासांसाठी येवून, फक्त तोंड दाखवून मुंबईला दादांकडे किंवा तटकरेंकडे हजेरी लावून सांगायचे की मी या जिल्ह्यात जावून आलो. त्याला काहीही अर्थ नाही. दोन तासांच्या पर्यटनासाठी आमच्याकडे येवू नका, असे ते म्हणाले.

विदर्भातील सहकाऱ्यांना मदत कशी होईल, त्याला ताकद कशी मिळेल याचा विचार करून यायच्यासाठी यायचे असेल तरच या. बुलढाणा, वाशिम, गोंदियाला पालकमंत्री दिलेले आहेत. आपण संपर्क मंत्रीही दिलेत. या सगळ्यांना जबाबदारी द्यायला पाहिजे. पालकमंत्र्यांनी केवळ १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे महाराष्ट्र दिनी झेंडा वंदन करण्यासाठी येवू नये. झेंडावंदन जिल्हाधिकाऱ्यांनी केले तरी चालेल.



पण, राष्ट्रवादीच्या पालकमंत्र्याने खऱ्या अर्थाने पालकमंत्र्याच्या भूमिकेतून यायला पाहिजे, असे पटेल म्हणाले.

राष्ट्रवादीच्या प्रत्येक पालकमंत्र्यांना जबाबदारी देण्याची गरज आहे. त्यांना संबंधित जिल्ह्यात जात असताना मधल्या जिल्ह्यातही दोन चार तास थांबून तेथील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना मदत केली पाहिजे, असे ते म्हणाले.

महाविकास आघाडीत काँग्रेस मोठा भाऊ असल्याने कमी जागा मिळत होत्या. आता महायुतीत भाजपा मोठा पक्ष आहे. येथेही आपल्या वाट्याला कमी जागा आल्या. पण, विधानसभेत सहा जागा थेट लढवल्या आणि जिंकल्या, हे मोठे यश आहे, अलीकडच्या काळात झपाट्याने शहरीकरण वाढले आहे. निम्म्यापेक्षा जास्त मतदारसंघ शहरी भागात आहेत. या भागाचे प्रश्न वेगळे आहेत. त्याचाही विचार केला पाहिजे, असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

इतर कामात व्यस्त राहणार असाल तर

# मंत्रिपद सोडावे लागणार!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांना अजित पवारांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आपले नियमित कामकाज सोडून इतर काम केली तर त्यांना मंत्रिपद सोडावे लागेल, असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी शुक्रवारी आपल्या नेत्यांना दिला.



पालकमंत्र्यांना आठवड्यातील ३ दिवस आपल्या मतदारसंघात काढावेच लागतील, असेही ते म्हणालेत.

नागपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे चिंतन शिबिर झाले. या शिबिरात उपस्थितांना मार्गदर्शन करताना अजित पवारांनी वरील इशारा दिला. ते म्हणाले, आज आपण चिंतन शिबिराच्या निमित्ताने एकत्र आलोत. या सभागृहात जवळपास ५०० पदाधिकारी व नेते व सहकारी उपस्थित आहेत. हे माझे कुटुंबच आहे. तुमच्या प्रत्येकाच्या पाठिशी लाखो लोक आहेत. त्यामुळे तुमच्या उपस्थितीमुळे मला नव्या उमेदीने व नव्या आशेने पुढे जाण्याची ताकद मिळते. हे चिंतन शिबिर केवळ पुढच्या निवडकांसाठी नाही. पुढच्या पिढीसाठी आहे.

आज केवळ भाषणे करून वेळ घालवायचा नाही. आज प्रामाणिक चर्चा, धाडसी कल्पना व ठोस निर्णय घ्यायचे आहेत. आज सायंकाळपर्यंत आपण सर्वजण मिळवून जो आराखडा ठरवून त्यालाच आपण नागपूर डिक्लेरेशन म्हणून मांडणार आहोत.

अजित पवार म्हणाले, प्रत्येक नेत्याने व पदाधिकाऱ्याने काही ठराविक प्रकारचे संवादाचे टचपॉईंट लोकांबरोबर ठेवले पाहिजेत. बुथ-स्तरीय संवाद, प्रभाग सभा, जनसंवाद शिबिरे, राष्ट्रवादी परिवार मिलन, युवक टाउन हॉल, महिला बचतगट बैठक, आणि उद्योग, रोजगार सुविधा शिबिरे आपण वर्षभर शिस्तीने केले, तर आपला पक्ष नेहमी लोकांच्या जवळ राहील. राष्ट्रवादीचे नेते केवळ निवडणुकीच्या वेळीच दिसतात असे कोणत्याही नागरिकाला वाटता कामा नये, असे अजित पवार म्हणाले.

अजित पवारांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीवरही भाष्य केले. ते म्हणाले, आपण भाजपच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये सर्वात ज्यूनिअर आहोत. अनेकजण मला हे पाऊल का टाकले? असा प्रश्न करतात. वैयक्तिक व कौटुंबिक नात्यांत वेदना का स्वीकारल्या? असे विचारतात.

मी मनापासून सांगतो की, ही सत्ता किंवा पदासाठी उचललेली पाऊले नव्हती. महाराष्ट्राला स्थिरता, प्रगती व ठोस निर्णयाची गरज आहे. या माझ्या अंतःकरणाच्या हाकेने मी हा मार्ग निवडला. मी एखादी फाईल पुढे सरकवली व एखाद्या गावाला पाणी मिळाले की मला समाधान मिळते.

ते पुढे म्हणाले, आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहोत. आपला स्वतःचा इतिहास आहे. आपली स्वतःची ओळख आहे. स्वतःची विचारधारा आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गावर मार्गक्रमण करतो. भारताच्या संविधानावर आपल्या राष्ट्रवादाचे पायाभूत मूल्य उभे आहे. भारताची ताकद ही विविधतेतील एकता आहे याची आठवण आपल्याला नेहमीच संविधान करून देते.

**भुजबळ - जरांगे वादावरही भाष्य**

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. प्रत्येकजण आपल्या व्यासपीठावर आपली भूमिका मांडतात. पण माझे स्पष्ट मत आहे की, कुणीही समाज - समाजात तेढ निर्माण करू नये. आपल्याला कोणत्याही घटकाला नाराज करायचे नाही. सरकार कुणाच्याही तोंडातील घास काढून कुणालाही देणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शंभरी पूर्ण करणाऱ्या संघाने नथुराम व विखारी विचार सोडावे..


## प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा संघाला सल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण होत असून हा नियतीचा एक संकेत आहे. १०० वर्ष पूर्ण करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आता तरी नथुराम व विखारी विचार सोडून समता, बंधुता व सामाजिक न्यायाचे संविधान व गांधी विचार स्विकारावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भारताचे संविधान ही ऐतिहासिक घटना असून संविधान भारताची प्रेरणा आहे. संविधान हे मनुस्मृतीवर आधारीत असावे अशी रा. स्व. संघाची अपेक्षा होती, गोलवळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तसे पत्र पाठवले होते. पण आम्ही विशिष्ट लोक हा संघाचा विचार आहे तर संविधानाचा विचार हा आम्ही भारताचे लोक असा आहे.

गोलवळकर यांचे बंच ऑफ थॉट हे रा. स्व. संघ व भाजपचे बायबल आहे. संविधान नाकारणारा विचार भाजपाचा आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्ष रा. स्व. संघाने त्यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वज तिरंगा सुद्धा फडकवला नव्हता. आता शंभर वर्ष होताना संघाने विखारी व विषारी विचार सोडून संविधानाचा विचार स्विकारला पाहिजे असे सपकाळ म्हणाले.





काँग्रेस पक्षाची नेहमीच संविधान रक्षणाची भूमिका राहिली आहे. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या पुढाकाराने २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान संविधान सत्याग्रह यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नागपूरच्या दिक्षा भूमीपासून सुरु होऊन सेवाग्रामपर्यंत जाणार आहे.

२८ तारखेला महान क्रांतिकारी भगतसिंह यांच्या बलिदानदिनी मशाल मोर्चा काढला जाणार आहे तसेच नागपूरच्या संविधान चौकात एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे. २९ तारखेपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. यावेळी रा. स्व. संघाला संविधान भेट देणार असल्याचेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

एका प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी झाल्याचे पुरावे दिले आहेत. मुख्यमंत्री फडणवीसांकडे गृहमंत्रालयही आहे, त्यांच्या पोलिसांनी राजुरा विधान सभेतील मतचोरी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे तरी सुद्धा देवेंद्र फडणवीस हे निवडणूक आयोगाची दलाली करत आहेत, त्यांनी ही दलाली बंद करावी. देवेंद्र फडणवीस हे चोर मुख्यमंत्री आहेत, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याबद्दल भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या विधानावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पूर्वी सुसंस्कृत, सभ्य, विचारवंत व कवी पदरी असायचे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही नालायक व विकृत लोक पदरी ठेवले आहेत. जयंत पाटील यांच्याबद्दल केलेले विधान हे बेलगाम पणाचा कळस आहे असे सपकाळ म्हणाले.

टिळक भवन दादर येथे काँग्रेस तालुकाध्यक्ष पदासाठी निरीक्षकांनी शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य खासदार चंद्रकांत हांडोरे, नसीम खान, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, बी. एम. संदीप, यु. बी. व्यंकटेश, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड गणेश पाटील उपस्थित होते.

## अवैध दारूविक्रेत्याची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १९ :

सिंदेवाही तालुक्यातील मोहाळी गावात शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी सकाळी अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करणारा राजू आनंदराव सिडाम (३५) याची काही अज्ञातांनी धारदार शस्त्राने गळा कापून हत्या केली.

राजू सिडाम याने अवैध दारू विक्रीचा व्यवसाय सुरू केला होता. गुरुवार, १८ सप्टेंबरच्या रात्री त्याच्या घरी काही अज्ञात मित्रांची पार्टी होती, त्यासाठी मटण आणले होते. याच जेवणावरून झालेल्या वादानंतर ही घटना घडली असावी.

राजू सिडाम हा त्याची पत्नी पुनम (वय ३०), मुलगा मेहरदीप (वय ८) आणि मुलगी वैष्णवी (वय ६) यांच्यासह मजुरीच्या कामासाठी वरोरा येथे राहत होता. दारूचे व्यसन असल्याने पत्नीला वरोरा येथेच सोडून मूळ गावी सिंदेवाही तालुक्यातील मोहाळी येथे परत आला होता.

## सोन्याच्या लालसेपोटी वृद्धाची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

मुंबईत सोन्याच्या लालसेपोटी एका ७६ वर्षीय वृद्धाचा खून केल्याची घटना समोर आली आहे. एका सलून मालकाने या वृद्धाचा खून करून मृतदेह थेट ड्रेनेजमध्ये फेकून दिला होता.

विठ्ठल तांबे (७६) हे १६ सप्टेंबर रोजी बेपत्ता झाले होते. कुटुंबीयांनी तातडीने काशिमीरा पोलिस ठाणे गाठले व विठ्ठल तांबे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज मिळवून त्याची तपासणी केली. येथील सलून मालकानेच विठ्ठल तांबे यांची गळा आवळून हत्या करून आरोपीने तांबे यांच्या गळ्यात असलेले सोन्याचे दागिने चोरले. त्यानंतर मृतदेह ड्रेनेजमध्ये फेकून दिला.

# ओबीसी आरक्षणाला धोका?

## वडेट्टीवारांचा सरकारवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावावी, आम्ही पुरावे देऊ की शासन निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसतो आहे, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.



> राजकीय नेत्यांवर टीका करणे योग्य आहे, पण त्यांच्या आई-वडिलांवर अश्लाघ्य शब्द वापरणे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत खालच्या पातळीचे उदाहरण आहे. पडळकर कुणाच्या इशाऱ्यावर बोलतात आणि त्यांना पाठीशी कोण घालतंय, याचे उत्तर भाजपने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

ओबीसी उपसमितीचे सदस्य असलेले मंत्री छगन भुजबळ आणि पंकजा मुंडे यांच्यावर थेट टीका करताना त्यांनी म्हटले की, बाहेर मांडली जाणारी भूमिका बैठकीत का मांडली जात नाही? सरकारचा हा निर्णय कोण रद्द करणार, आणि कधी करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्यांना पाडा, असे आवाहन भुजबळ करत असतील तर मग सरकारच पाडले पाहिजे, ओबीसी आरक्षणावर गदा आणणारा शासन निर्णयच सरकारने काढला आहे. त्या मंचावर सरकारचे प्रतिनिधी म्हणून मंत्री गेले होते. एकीकडे छगन भुजबळ मुख्यमंत्र्यांचे कौतुक करणार दुसरीकडे टीका करायची हा दुटप्पीपणा आहे.

ओबीसी आरक्षणाला जर धक्का लागत नाही तर सरकारने सर्व नेत्यांना बोलवावे चर्चा करावी मग आम्ही पुरावे देऊ ओबीसींचे काय नुकसान होत आहे असे वडेट्टीवार म्हणाले.

महायुती सरकारने काढलेल्या शासन निर्णयामुळे मराठवाडा पेटला आहे ओबीसी विरुद्ध मराठा पुन्हा वाद वाढला आहे. शाळांमधून विद्यार्थ्यांना काढले जात आहे इतका दोन समाजात द्वेष पसरला आहे. या सरकारला महाराष्ट्राचा विकास करायचा नाही पण जातीपातीचे राजकारण करून महाराष्ट्र खड्ड्यात घालत आहे. असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी सरकारवर केला.

# जागतिक पातळीवर पत्रकारितेमध्ये कमालीची अस्वस्थता





## व्हॉईस ऑफ मीडियाच्या विदर्भ स्तरिय अधिवेशनाचा थाटात समारोप

■ महासागर प्रतिनिधी सावनेर / नागपूर, दि. १९ :

पत्रकारितेच्या जागतिक पटलावर आज गंभीर अस्वस्थता निर्माण झाली आहे. खोटी बातमी, दिशाभूल करणारे अजेंडे, माध्यमांवरील राजकीय दबाव आणि लोकशाहीच्या मूळ पाया असलेल्या मुक्त पत्रकारितेवर गदा येत असल्याचे चित्र आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पत्रकारितेतील मूल्यांना पुनश्च जागृत करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केले.

सावनेर येथे झालेल्या विदर्भ विभागीय एक दिवसीय अधिवेशनात ते बोलत होते. अधिवेशनाचे उद्घाटन आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के तर मुख्य अतिथी म्हणून रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित होते. व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीकृष्ण चांडक यांची यावेळी उपस्थिती होती. मार्गदर्शक ज्योतिषी जगविख्यात गुरू जयंत पारधी, विदर्भ अध्यक्ष किशोर कारंजेकर व भोपाल मीडिया संघटनेचे गवाप्रसाद सोनी यांचीही अधिवेशनात उपस्थिती होती. या अधिवेशनात महत्त्वाचा निर्णय घेत प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी संघटनेच्या राज्य कार्याध्यक्षपदी कुमार कडलक व नरेंद्र देशमुख यांची तर वर्धा जिल्हा अध्यक्षपदी एकनाथ चौधरी यांची निवड जाहीर केली. या नियुक्त्यांमुळे संघटनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



> व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्रीकृष्ण चांडक यांनी समाजकारणात पत्रकारितेचे योगदान यावर बोलताना सांगितले की, पत्रकारिता ही फक्त बातम्या देण्याची साधने नाही, तर ती समाजाच्या विवेकबुद्धीला जागं करणारी एक चेतना आहे. समाजकारणाला दिशा देताना पत्रकाराने निर्भयपणे सत्य मांडलं, तरच लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट होते.
>
> समाजकारण हे केवळ राजकारणांचे क्षेत्र नाही, खऱ्या अर्थाने बदल घडवण्याची ताकद पत्रकारितेकडे आहे. कारण पत्रकार म्हणजेच समाजाचा आरसा जो अन्याय, भ्रष्टाचार आणि विषमता उघड करत लोकांमध्ये आशा आणि लढण्याची प्रेरणा निर्माण करतो.

विदर्भातील अकरा जिल्ह्यांत व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे पदाधिकारी पत्रकार प्रभावीपणे कार्यरत असून पत्रकारांचे संघटन, त्यांचे प्रश्न मांडणे आणि सामाजिक उत्तरदायित्व वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या अधिवेशनात अधोरेखित करण्यात आले. पत्रकारांच्या सुरक्षिततेसह डिजिटल युगातील आव्हाने तसेच ग्रामीण भागातील पत्रकारांची व्यथा यांवर अधिवेशनात सखोल चर्चा झाली. सर्व उपस्थित मान्यवरांची यावेळी भाषणे झाली.

संदीप काळे म्हणाले, जगभरातील पत्रकारिता आज मोठ्या अस्वस्थतेच्या टप्प्यावर आहे. पत्रकारितेच्या सत्यनिष्ठा आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपल्याला धाडसाने उभे राहावे लागेल. पत्रकारितेचे सामर्थ्य अन्यायाला आव्हान देण्यात आणि सत्याला आवाज देण्यात आहे. व्हॉईस ऑफ मीडिया संघटना ही पत्रकारांसाठी ढाल बनून उभी आहे आणि विदर्भातील पत्रकारांची एकजूट ही आमची खरी ताकद आहे. आपण माध्यमांची विश्वासार्हता परत मिळवली पाहिजे, कारण विश्वास गमावलेल्या पत्रकारितेला समाज मान देणार नाही.

या अधिवेशनास विदर्भातील पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी दिलीप घोरमारे, राहुल सावजी, सुधाकर बागडे, गिरीश आदे, सचिन लिडर, विनय वाघमारे, पुरुषोत्तम नागपूरकर, मनोहर घोळसे, मंगेश उराडे, दिनेश चौरसिया, महसूद शेख यांनी परिश्रम घेतले.

# अखेर त्या चिमुकल्याचा मृतदेहच सापडला

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १९ :

सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गडबोरी गावातील प्रशिल मानकर या सात वर्षांच्या मुलाला गुरुवारी रात्री बिबट्याने घरासमोरून उचलून नेले होते. जवळपास अकरा तासानंतर चिमुकल्याचा मृतदेह गावालगतच्या झुडपी जंगलात मिळाला. चिमुकल्याचा मृतदेह सापडला.



दरम्यान, बिबट्याचा बंदोबस्त करणार नाही तोवर मृतदेह उचलणार नाही, अशी भूमिका कुटुंबीय व ग्रामस्थांनी घेतल्याने गावात ग्रामस्थ विरुद्ध वन विभाग अशी तणावाची स्थिती निर्माण होती. मात्र संतप्त ग्रामस्थांच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतर ग्रामस्थ शांत झाले.

सिंदेवाही तालुक्यातील गडबोरी गावातील रहिवासी बबन मानकर यांचा प्रशील (८) हा दुसऱ्या वर्गात शिकणारा मुलगा गुरुवारी सायंकाळी काका नंदू मानकर व सहा वर्षांच्या बहिणीसोबत गणपतीचे जेवण आटोपून घरी परत येत होता. यावेळी घराच्या अंगणात अचानक बिबट्याने प्रशीलवर हल्ला करीत फरफटत जंगलाकडे घेऊन गेला. या हल्ल्यात प्रशीलचा मृत्यू झाला. या घटनेनंतर, पोलीस आणि वनविभागाच्या पथकानी रात्रभर शोधमोहीम राबवली, मात्र प्रशीलचा शोध लागला नाही.

आज शुक्रवार १९ सप्टेंबरच्या पहाटे ६ ते ६.३० वाजताच्या दरम्यान, घरापासून काही अंतर दूर असलेल्या हुडकी परिसरातील झुडपी जंगलात प्रशीलचा मृतदेह मिळाला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी थेट वनविभागालाच जबाबदार धरले आणि मृतदेह उचलणार नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता.

उठ बंजारा जागा हो...एसटी आरक्षणाचा धागा हो...

# बंजारा समाजाने दणाणून सोडला चौक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

हैदराबाद गॅझेटीयरवरून सरकारच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात नवा शासन आदेश काढला होता. यामध्ये राज्यात हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याची मराठा समाजाची मागणी मंजूर करण्यात आली होती. मात्र, यानंतर महाराष्ट्रातील ओबीसी समाज आक्रमक झाला.

हैदराबाद गॅझेटीयरच्या आधारावर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळत असेल तर त्याच गॅझेटियरमध्ये आदिवासी उल्लेख असलेल्या बंजारा समाजावर अन्याय का?, असा प्रश्न बंजारा समाजाकडून उपस्थित करण्यात आला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये बंजारा समाजाकडून सरकारला आदिवासीतून आरक्षणासाठीचे निवेदन सरकारला पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात नागपूरमध्ये शुक्रवारी बंजारा समाजाकडून यासाठी आंदोलन करण्यात आले. यामुळे सरकारच्या अडचणी वाढणार आहे.

मराठा समाजाला मागच्या दाराने कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या शासकीय धोरणामुळे ओबीसी समाजावर मोठा अन्याय होत आहे. ओबीसींची लोकसंख्या ५४ टक्क्यांपेक्षा जास्त असतानाही त्यांना केवळ तुटपुंजे आरक्षण दिले जाते. शासनाच्या या धोरणामुळे ओबीसी विद्यार्थ्यांचे शिक्षण, तरुणांच्या नोकरीच्या संधी आणि समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वावर थेट परिणाम होणार आहे. या अन्यायाविरोधात संपूर्ण समाजमन पेटून उठले असून, या धोरणाच्या फेरविचार करण्यास भाग पाडण्यासाठी एक विराट महामोर्चा आयोजित केला आहे.

हैदराबाद गॅझेटच्या आधारावर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात सामावून घेण्याचा निर्णय झाल्यानंतर आता बंजारा समाजसुद्धा पेटून उठला आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाज हा आदिवासी समाज असल्याची नोंद असल्यामुळे नागपूरमध्ये बंजारा समाजातील सर्व संघटनांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून हैदराबाद गॅझेटच्या धर्तीवर महाराष्ट्रातील गोर बंजाराला एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गात सामावून घेण्याची मागणी केली. जिल्ह्यातील बंजारा समाजाने आज शुक्रवारी संविधान चौकात उठ बंजारा जागा हो, एसटी आरक्षणाचा धागा हो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.



महासागर

नागपूर

# वृत्तसागर

■ शनिवार, दि. २० सप्टेंबर २०२५ ■





# राज्यात ६२ लाख एकर शेतीचे नुकसान

## ३ जिल्ह्यांमध्ये ओल्या दुष्काळाचा फटका : शेतकऱ्यांना मदतीसाठी सरकार कटिबद्ध : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**

ओला दुष्काळाच्या बाबतीत संपूर्ण परिस्थितीचा अंदाज घेतला जाईल. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि आमच्या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य त्यावर विचार करतील. हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. आमचा बेसच शेतकरी आहे. ग्रामीण भागामध्ये जे शेतकरी अडचणीत आहेत त्यांना मदत करणे आणि पाठिंबा देणं आमचे कर्तव्य आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे.



दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यामध्ये आतापर्यंत एकूण ३० जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. साधारण १९५ तालुके बाधित झाले आहेत. तर ६५४ मंडळातील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात प्राथमिक अंदाजानुसार ६२ लाख १७ हजार ५४० एकर शेती पिकाचे नुकसान झाले आहे.

भरणे पुढे म्हणाले की, अतिवृष्टीच्या परिस्थितीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या तिन्ही नेत्यांचे लक्ष आहे. त्यांनी आम्हाला सूचना दिला आहे त्यानुसार पालकमंत्री जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जात पाहणी करत आहेत. ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून संपूर्ण नुकसान भरपाईच्या माध्यमामध्ये त्याला मदत केली जाईल.

**नुकसानीचे पंचनामे सुरू**

दत्तात्रय भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे ओला दुष्काळ जाहीर करण्यावर योग्य तो निर्णय घेतील. सरकारकडून जिथे जिथे नुकसान झाले तिथे तिथे पंचनामे करण्याचे काम खूप मोठ्या प्रमाणामध्ये महसूल विभाग आणि कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणामध्ये करत आहे.

**भान राखायला हवे**

भरणे म्हणाले की, महायुती सरकार हे मराठा आणि ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, जे योग्य आहे त्या प्रमाणे काम करेल. जयंत पाटील यांच्यावर आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली यावर बोलताना भरणे म्हणाले की, कुणीही कुणावर खालच्या पातळीवर टीका करणे योग्य नाही. तर दादा-ताई एकत्र या बॅनरवर मी ते अजून पाहिलेच नाही असे म्हणत त्यांनी या विषयावर बोलणं टाळले.

# ग्रामीण हद्दीत २४ बंदूका, ३९ खून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**

नवे नागपूर वसवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे शहराला लागून ग्रामीण हद्दीत जमीनीचे दर गगनाला भिडत आहेत. यातून ग्रामीण भागात नवे भू माफिया जन्माला येऊन गन कल्चर वाढीला लागत असल्याची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे.



ग्रामीण पोलीस हद्दीत वर्षभरात पोलिसांनी ज्या बंदूका पकडल्या त्याचा आकडा शहरात पकडलेल्या बंदुकांची बरोबरी करणारा आहे. पोलीसांनी जिल्ह्याच्या २१ ग्रामीण हद्दीतून १६ माउजर, ७ देशीकट्टयांसह एक भरमार अशा २४ बंदुका पकडल्या. या प्रकरणात ५० जणांच्या मुसक्या आवळल्याचा दावा पोलीस करतात.

जिल्ह्याशेजारचे मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा ही राज्ये शहरात येणारी बेकायदेशीर शस्त्रे, गांजाची प्रवेशद्वारे आहेत. पकडलेल्या शस्त्रापेक्षा अधिक संख्येने भू माफियांकडे शस्त्रे असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गुन्हेगारी कृत्यामुळे फक्त शहरातल्याच रस्त्यांवर रक्ताचे ठसे उमटतात,असेही नाही. शहरा भवताल ग्रामीण भागात शेतीही रक्ताच्या चिखलाने माखत आहे. ग्रामीण भागात चालू वर्षात गुंडांनी ३९ जणांचा खून केला. शहरालगतच्या भूखंड स्पर्धेतून ४५ हून अधिक जणांवर प्राणघातक हल्ले झाले. यातले बहुतांश प्राणघातक हल्ले जमिनीच्या वादातून झाल्याची नोंद पोलीस डायरीत आहे.

गणेश विसर्जनाच्या दिवशी शहराला लागून कुहीत देवराव घरजाळे यांचा कुसुंबी जवळ खून झाला. देवरावचा उमरेड मार्गावर भुखंडावर कब्जा होता. त्या बदल्यात त्याने अडिच कोटींची मागणी केली होती. या जागेच्या वादातूनच देवरावचा खून झाला, या निष्कर्षापर्यंत पोलिस पोचले आहेत. या प्रकरणात अंकित येळणे, मुक्तेश्वर मेश्राम, गजानन कडू, गणेश हुड हे चौघे सध्या पोलिसांच्या तावडीत आहेत. शहराला लागून मोक्याच्या भूखंडाचा ताबा हेच या खुनामागे कारण असल्याचे आढळले आहे.

**एकाच गुंडाकडे ७ गावठी बंदुका ३६ काडतूस**

ग्रामीण पोलिसांनी काही महिन्यांपूर्वी खापरखेडातून राजपूत नावाच्या गुंडाला ताब्यात घेतले होते. त्याच्या हस्तकांनी मध्य प्रदेशातील खरगौन आणि बैतूल येथून गावठी बंदुका आणल्याचा सुगावा पोलीसांना लागला होता. पोलिसांनी एकाला अटक करीत ७ गावठी बंदुका पकडल्या. या गुंडाकडे पोलिसांना ३६ जीवंत काडतुसे हाती लागली. ग्रामीण भागातील ही सर्वांत मोठी कारवाई होती.

शहरापेक्षा अधिक ५५ जीवंत काडतूस आणि २ रिकाम्या मॅगझीन ग्रामीण पोलिसांनी पकडल्या आहेत. ग्रामीण भागात गन कल्चर वाढीला लागण्यासाठी हे आकडे पुरेसे आहेत. या खेरीज पारंपरिक हत्यार बाळगणाऱ्या २५ जणांना अटक झाली, असे पोलीस रेकॉर्ड सांगतो.

> मध्य प्रदेशातील बैतूल, खरगौन, सिवनीतून शस्त्रे ही निश्चितच चिंतेचा विषय आहे. त्याचे नेटवर्क भेदणे ही प्राथमिकता आहे. ७ गावठी पिस्तूल प्रकरणात १० आरोपी सध्या ताब्यात आहेत. राजपूत आणि वर्मा टोळीचे कंबरडे मोडले आहे. भुखंड माफियांचा मुळशी पॅटर्न लागू होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.
>
> **अनिल म्हस्के**
> **अपर पोलिस अधीक्षक**
> **ग्रामीण**

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा २१ ला जनसंपर्क कार्यक्रम

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या, रविवार, २१ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला मंत्री गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मंत्री नितीन गडकरी नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मंत्री नितीन गडकरी यांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटून चर्चा करतील.

# नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**

उपराजधानीत नवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून, येत्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

नागपूर शहराच्या विविध भागात दुर्गोत्सव धूमधडाक्यात साजरा केला जात असून, शेकडो सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाच्या वतिने दुर्गा देवीची स्थापना केली जाते. सोमवार २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना असून, याच दिवशी दुर्गा मातेच्या मूर्तीची विधीवत स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुर्त्याही सजवण्यात आल्या असून, सोमवारी सर्वत वाजतगाजत या मुर्त्यांची मिरवणूक काढून त्यांची मंडपात स्थापना केली जाईल.

दुर्गोत्सवाकरिता मंडळांनी भव्य असे मंडप टाकणे सुरू केले असून, कुठे मैदानावर तर कुठे रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत हे मंडप उभारल्याचे दिसून येते. अनेक मंडळांकडून आकर्षक देखावे तयार केले जात असून, हे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. दुर्गा मातेच्या दर्शनासाठी भाविकांची उसळणारी मोठी गर्दी लक्षात घेता, रांग व्यवस्था करण्यात येत आहे. नवरात्री उत्सवात मंडपाजवळ दुकाने थाटली जातात. त्यासाठी दुकानदारांनी जागाही हेरून ठेवली असून, दुकाने लागणे सुरू झाले आहे.

बहुतेक मंडळाच्यावतिने गरबाचे आयोजन केले जाते. त्यासाठी मोकळ्या जागेभोवती कुंपण घालण्याचे काम सुरू असून, सुरक्षेच्या दृष्टीने अनेक मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे सुरू केल्याचे दिसून येत आहे.

# चोरीच्या ५० दुचाकी जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**

अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या दोन भावांना हुडकेश्वर पोलिसांनी अटक करून त्यांच्या ताब्यातून चोरीच्या ५० दुचाकी जप्त केल्या. ऋतिक (१९) आणि ऋषभ शाम असोपा (२७) दोन्ही रा. टेलिफोन एक्सचेंज चौक अशी त्यांची नावे आहेत.

दोघेही भाऊ अंमली पदार्थाच्या आहारी गेले होते. व्यसन पूर्ण करण्यासाठी ते दुचाकी चोरायचे. हुडकेश्वर ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर व एपीआय ओमप्रकाश भलावी पेट्रोलिंग करीत असताना दोन व्यक्ती दुचाकी विकण्यासाठी येत असल्याची माहिती खबऱ्याने दिली. तिघेजण दोन दुचाकीसह तेथे दिसून आले.

पोलिसांना पाहून दोन्ही भावांनी पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करीत दोघांनाही पकडले. चोरी केलेल्या दुचाकी विकून किंवा गहाण ठेवून ते शौक पूर्ण करीत असत. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी ३६ मोपेड आणि १४ मोटरसायकली अशा २५ लाखांच्या ५० दुचाकी जप्त केल्या.

## शस्त्रासह एकाला अटक

■ **नागपूर :** गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने गस्तीदरम्यान एका तरुणाला शस्त्र घेऊन फिरताना अटक केली. मोहम्मद रमीज रजा शेख (२२) रा. आदर्शनगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

युनिट ४ चे पथक नंदनवन ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान आदर्शनगरात स्टार वाईन शॉपमागे रमीज हा संशयास्पदरित्या फिरत असल्याचे आढळले. पोलिसांनी चौकशी करण्याकरिता त्याला आवाज दिला असता त्याने पळ काढला. रमीजला पकडून पंचासमोर झडती घेतली असता एक चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून रमीजला अटक केली. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# विषारी नागाने मांडले स्वयंपाकघरात ठाण

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १९ :**

हिंगणा तालुक्याच्या किन्ही गावातील एका कुटुंबाच्या स्वयंपाकघरात विषारी नागाने ठाण मांडले. घाबरलेल्या कुटुंबासह ग्रामस्थांनी तात्काळ सर्पमित्रांना कळवले. माहिती मिळताच सर्पमित्र हर्षल शेंडे सहकारी लक्ष्मण राऊत आणि जय येलेकर यांच्यासह घटनास्थळी दाखल झाले. घरातील स्वयंपाकघर तपासताना सर्वजण थक्क झाले. नाग भांड्यांच्या रॅकवर लपलेला होता. त्यामुळे या ठिकाणाहून त्याला रेस्क्यू करणे तसे कठीणच होते.



हर्षल शेंडे म्हणाले, नाग इतक्या विचित्र जागी लपला होता की कुणालाही संशय येणार नाही. आम्ही शांतपणे त्याला खाली आणण्याचा प्रयत्न केला. तो खिडकीत अडकला होता, मात्र काही मिनिटांच्या सावध प्रयत्नानंतर आम्ही त्याला सुरक्षितरीत्या बाहेर काढले. बचाव कार्य पूर्ण झाल्यावर नागाला सुरक्षित ठिकाणी सोडण्यात आले. ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला आणि सर्पमित्र पथकाचे मनःपूर्वक कौतुक केले.

यावेळी सर्पमित्र हर्षल शेंडे यांनी ग्रामस्थांना आवाहन केले. साप दिसल्यास घाबरू नका, मारू नका, तात्काळ तज्ञांना बोलवा. तुमचा एक फोन एखाद्याचे प्राण वाचवू शकतो. साप दिसल्यास हर्षल शेंडे यांच्याशी ८२७५३२५२७३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

शहरात देखील साप निघण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता सर्पमित्रांना बोलवावे. कित्येकदा सर्पमित्र जीवावर उदार होऊन त्या सापाला अलगद रेस्क्यू करून नागरिकांना त्या सापापासून वाचवतात. त्यामुळे नागरिकांनी कायम सर्पमित्रांची मदत घ्यावी, असे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

## कर्जात बुडालेल्या हॉटेल व्यवसायिकाची

# गळफास घेत आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :**

मनीषनगर परिसरातील एका हॉटेल व्यवसायिकाने गळफास लावून आत्महत्या केली. कर्जाच्या तणावातून त्यांनी आत्महत्या केल्याची चर्चा आहे. या प्रकरणी बेलतरोडी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. श्यामबिहारी शिवहरे (५४) रा. त्रिमूर्तीनगर असे मृताचे नाव आहे.

शिवहरे यांचे मनीषनगर मुख्य मार्गावर एपिक्योअर फुड नावाने हॉटेल होते. त्यांना हेमंत आणि कीर्ती नावाचे दोन मुले आहेत. मुले ही त्यांना हॉटेलच्या कामात मदत करतात.

रोज रात्री ११.३० वाजताच्या सुमारास शिवहरे हॉटेल बंद करून घरी जात होते, मात्र बुधवारी रात्री ते हॉटेलमध्येच थांबले. वरच्या माळ्यावरील हॉलमध्ये आरात करीत होते. मध्यरात्रीला त्यांनी गळफास लावला. गुरूवारी दुपारी मुलगा हेमंत हॉटेलमध्ये आला असता शिवहरे गळफास लावलेल्या अवस्थेत आढळले. त्याने घटनेची माहिती पोलिसांना दिली. बेलतरोडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना केला. पोलिसांना कोणतेही सुसाईड नोट मिळाले नाही.

माहिती मिळाली आहे की, रात्री उशिरापर्यंत शिवहरे जागत होते. ३.४५ वाजताच्या सुमारास त्यांनी कुटुंबातील सदस्यांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रूपवर मॅसेजही टाकला होता, मात्र नंतर मॅसेज डिलिट केला. ३.५२ च्या सुमारास त्यांनी परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांची रेकॉर्डिंगही बंद केली.

सांगण्यात येते की, शिवहरे यांनी बिझनेस ट्रेडकडून २ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जाच्या तणावातून त्यांनी आत्महत्या केल्याचा अंदाज कुटुंबीयांनी वर्तविला आहे. पोलिस घटनेचा तपास करीत आहेत.

# मेडीट्रिनात १६.८३ कोटींचा घोटाळा

## डॉ. पालतेवारसह १७ जणांवर गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :**

रामदासपेठ परिसरातील मेडीट्रिना रुग्णालय पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. रुग्णालयात १६.३८ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा (ईओडब्ल्यू)ने रुग्णालयाचे भागीदार गणेश चक्करवार यांच्या तक्रारीवरून डॉ. पालतेवार आणि त्यांची पत्नी डॉ. सोनाली पालतेवारसह १७ जण आणि फर्मविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

इतर आरोपींमध्ये रुग्णालयाचे लेखापाल अर्पण किशोर पांडे, किशोर विनायक पांडे, अभिषेक किशोर पांडे, अ‍ॅबस्ट्रॅक्ट आयटी ग्रूपचे भागीदार आकाश मधुकर केदार, रिता मुकेश बडवाईक, वैशाली रामदास बडवाईक, तृप्ती प्रकाश घोडे, एम.एस.सेवा हेल्थकेअरचे संचालक सर्वेश ढोमणे, प्रियंका सर्वेश ढोमणे, १६ अलाईड हेल्थ केअर सर्व्हिसेसची संचालिका कल्याणी बडवाईक आणि नईम दिवानीचा समावेश आहे.

### बनावट आर्थिक व्यवहार

चक्करवारच्या तक्रारीनुसार, डिजिटल मार्केटिंगच्या नावावर जारी केलेल्या बिलांवर संशय आल्याने त्यांनी खाते तपासले असता समजले की, पालतेवार दाम्पत्याने २०२० ते २०२४ पर्यंत त्यांच्या ओबवियेट हेल्थ केअर कंपनीत ११.४१ कोटी रुपये वळते केले आहेत. याबाबत कोणतीही माहिती चक्करवार यांना दिली गेली नाही. त्यानंतर डिजिटल मार्केटिंगच्या नावावर इतर आरोपींच्या खात्यात ५.४२ कोटी रुपये वळते झाले. याबाबतची अधिकृत कोणतीही माहिती उपलब्ध करण्यात आली नाही. चक्करवार यांच्या तक्रारीवरून ईओडब्ल्यूने सीताबर्डी ठाण्यात विविध कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. उल्लेखनिय आहे की, पालतेवारविरुद्ध आतापर्यंत ५ गुन्हे दाखल झाले आहेत. २०१९ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ३ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. ३ प्रकरणात पोलिसांनी आरोपपत्रही दाखल केले आहे.

यापूर्वीही हे रुग्णालय शासकीय योजनेच्या नावावर केलेल्या फसवणुकीवरून चर्चेत आले होते. या प्रकरणातही डॉ. समीर नारायण पालतेवार यांचे नाव होते. चक्करवार हे कर व्यवसायी आहेत. २००६ मध्ये त्यांनी डॉ. पलतेवार आणि इतर भागीदारांसह व्हीआरजी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना केली. या कंपनीने २०१२ मध्ये रामदासपेठच्या लेंड्रा पार्कमध्ये मेडीट्रिना रुग्णालय बांधले.

२००६ ते २०१७ पर्यंत चक्करवार रुग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक होते. मात्र रुग्णालयाचे संपूर्ण काम आणि व्यवहार डॉ. पालतेवारच पाहात होते. २०१६ मध्ये इतर भागीदारांनी त्यांचे शेअर पालतेवार आणि चक्करवार यांना विकून कंपनी सोडली. तेव्हा दोघेही समान भागीदार होते. रुग्णालयाच्या शेजारी असलेल्या जमिनीवर नवी इमारत बनवून विस्तार करण्यासाठी पालतेवार यांनी १७ टक्के शेअर मागितले. तेव्हापासून पालतेवार मनमर्जी करीत होते.

# कुलगुरूंच्या वाहनाखाली झोपली आंदोलक विद्यार्थिनी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांमध्ये झालेल्या विद्यार्थी आंदोलनात एक धक्कादायक घटना घडली. आंदोलन करणारी विद्यार्थिनी कुलगुरूंच्या वाहनासमोर आली आणि अडवले.

रातुम नागपूर विद्यापीठाशी संलग्नित विविध औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामधील अंतिम वर्षाचे विद्यार्थी प्रवेशाची विशेष संधी (कॅरी ऑन) देण्यासाठी अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहेत. गुरुवारी कुलगुरू कार्यालयासमोर दुपारपासून रात्रीपर्यंत आंदोलन सुरू असतानाही विद्यार्थ्यांची कुणीही दखल न घेतल्याने चक्क एका विद्यार्थिनीने कुलगुरूंच्या वाहनासमोर आडवे येत न्यायाची मागणी केली. विशेष म्हणजे, गुरुवारीच झालेल्या विद्वत परिषदेच्या बैठकीत या विद्यार्थ्यांची मागणी अमान्य करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून अनेक विद्यार्थी संघटनांनी कॅरीऑन योजना लागू करण्यासाठी कुलगुरूंना प्र-कुलगुरूंना निवेदने दिली होती. मात्र, विद्यापीठाने ८ जुलै २०२५ रोजी झालेल्या विद्वत परिषदेच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ न देण्याचा निर्णय घेतला होता. यादरम्यान गोंडवाना आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने तेथील विद्यार्थ्यांना कॅरीऑन देण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे विद्यार्थी संघटनांनी मागणी लावून धरत दररोज अधिकाऱ्यांना निवेदन देऊन आंदोलनाचा पवित्रा कायम ठेवला होता. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी विद्यापीठाने २ ऑगस्टला विद्वत परिषदेच्या बैठकीचे आयोजन केले.



बैठकीत विद्यार्थ्यांना सरसकट कॅरीऑन न देता, सर्व अभ्यासक्रमातील एक संधी देण्याचा निर्णय घेतला. मात्र, यामध्ये एम.फार्म., बी.फार्म., बी.एड., एम.एड. आणि बी.पी.एड., एम.पी.एड. या अभ्यासक्रमांना वगळण्यात आले. त्यामुळे आता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत.

औषधनिमार्णाशास्त्राच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑन देण्याच्या मागणीसाठी गुरुवारी विद्वत परिषदेची बैठक घेण्यात आली. यावेळी या अभ्यासक्रमाला कॅरी ऑन देण्यास सदस्यांनी नकार दिला. त्यातून कुलगुरूंच्या कारसमोर झोपण्याचा प्रकार घडल्याचे समजते.

# दत्तवाडीत स्वच्छता अभियान व तुळशी वितरण



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक शिवमंदिर ट्रस्ट मित्र परिवार यांच्या वतीने दत्तवाडी परिसरातील विविध मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश परिसर स्वच्छ व हरित ठेवणे तसेच सामाजिक बांधिलकी जपणे हा होता. स्वच्छता मोहिमेत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. शिव मंदिर, अभिजीत नगर येथील हनुमान मंदिर, बजरंग नगर हनुमान मंदिर, समर्थ गजानन सोसायटी येथील गजानन मंदिर व मंगलधाम सोसायटी हनुमान मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धनासाठी तुळशी रोपांचे वितरणही करण्यात आले.या अभियानात सार्वजनिक शिव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा वाडी मंडळ उपाध्यक्ष कमल कनोजे, आरंभ बिल्डकॉनचे डायरेक्टर जितेंद्र रहांगडाले, विक्रम तिजारे,चंद्रशेखर देशभ्रतार, बापूसाहेब लिमकर, भाजपा वाडी मंडळ कोषाध्यक्ष जितेंद्र रहांगडाले, नाना चोपडे, सतीश नांदणकर, देवाभाऊ खाटीक, देवराव निकम, रामभाऊ बिसेन, गजेंद्र देवघरे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. सर्वांनी मिळून स्वच्छतेचे व पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. परिसरातील कामगार कुटुंबातील मुलगी आरती गीत लहरी हिचा वाढदिवसही याच दिवशी असल्याने तिच्या हस्ते केक कापून पंतप्रधान व तिचा वाढदिवस एकत्र साजरा करण्यात आला. उपस्थितांनी आरतीला आणि नरेंद्र मोदी यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे समाजातील एकात्मता, स्वच्छतेचे महत्त्व व पर्यावरण संरक्षण याबाबत जनजागृती झाली. ट्रस्टच्या सदस्यांनी सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानले व पुढेही असे उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कोंढाळी येथे वक्तृत्व स्पर्धेत प्रभावी भाषण शैली झळकली



■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. १९ :

अँड स्व. कृष्णराव काळबांडे स्मृती वेगवेगळ्या विषयावर लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथे विविध स्पर्धा विभागाद्वारे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात आले. यावर्षी स्पर्धेचा विषय "भारतीय युवा व देशाचे भविष्य" हा होता. या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य माननीय सुधीर बुटे, प्रमुख पाहुणे जेष्ठ पर्यवेक्षक मनोज ढाले, हरीश राठी, परीक्षा विभाग प्रमुख प्रिया धारपुरे, सुनील सोलव आदी उपस्थित होते.

हायस्कूल विभागातून प्रथम -कृष्णाली गणेश खाडे, द्वितीय -चंचल प्रमोद गाडेर कु.रिया सुभाष पोकळे सर्व (८ अ )यांनी संयुक्त द्वितीय क्रमांक पटकाविला. कनिष्ठ महाविद्यालय गटात प्रथम वंशिका विनोद चन्ने वर्ग 11 विज्ञान अ हिने प्रथम क्रमांक पटकाविला व कु. समीक्षा मूलचंद व्यवहारे वर्ग 12 विज्ञान अ हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत परीक्षकाची भूमिका अर्चना ढाले, प्रांजली मस्की अनंता बुराण, टाइम कीपर, मोहित बावणे यांनी पार पाडली या स्पर्धेचे आयोजन विविध स्पर्धा विभाग प्रमुख रुपेश वादाफळे, स्पर्धा संयोजक सुनिता नेहारे, आम्रपाली बागडे ग्रीष्मा नागपुरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थीनी पूर्वा वंजारी व आभार कृतिका राऊत हिने मानले. स्पर्धेतील रोख पुरस्कार अँड काळबांडे परिवाराकडून पुत्र मनीष काळबांडे, अँड ललितमोहन काळबांडे यांचे पुढाकारातून सत्र 2012-13 पासून प्राचार्य अविनाश आपटे सर यांचे कारकीर्द पासून यशस्वी उपक्रम नियमित सुरु आहे. विविध स्पर्धा विभागाकडून वादविवाद स्पर्धा, संगीत, गट चर्चा, आदी स्पर्धा कार्यक्रम राबविले जात असल्याचे स्पर्धा प्रमुख प्रा रुपेश वादाफळे यांनी माहिती दिली.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १९ :

ग्रामपंचायत सुकळी (गुप.) येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. सोबत 'स्वच्छताशपथ' घेण्यात आली. उपस्थितांना अभियानाची माहिती देण्यात आली. त्यानंतर लगेच 'स्वच्छता दिंडी' काढण्यात आली. याप्रसंगी पं. स. हिंगणा येथून सुशांत गादेवा, स.ग.वि.अ. व मानकर, समन्वयक ५२३, पं. स. हिंगणा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी ग्रामपंचायत सरपंचा रश्मी शंभरकर, उपसरपंच दिनेश ढेंगरे आणि सर्व सन्मा. ग्रामपंचायत सदस्यगण तसेच ग्रामपंचायत अधिकारी किशोर डाखोडे उपस्थित होते.

# हिंगण्यात मनसेचा भव्य पक्ष प्रवेश, मनसे उघडणार अनेक ठिकाणी खाते

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १९ :

हिंगणा विधानसभा क्षेत्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा भव्य पक्ष प्रवेश सोहळा दणदणीत उत्साहात पार पडला. मनसेच्या विचारधारेने प्रेरित होऊन शेकडो तरुण व मान्यवरांनी मनसेचा झेंडा हाती घेतला. या पक्ष प्रवेशामुळे मनसेची ताकद हिंगण्यात प्रचंड वाढली असून, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांमध्ये मनसे आपले खाते उघडणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या सोहळ्यावेळी प्रमुख मान्यवरांमध्ये आदित्य दुरुगकर (पाटील) - जिल्हा अध्यक्ष, नागपूर, कदीर भाई महाजन - राज्य उपाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना, गणेश बरवटकर -तालुका अध्यक्ष, हिंगणा ग्रामीण, रोशन वडूले-तालुका संघटक, हिंगणा, अजय उराडे जिल्हा संघटक, वाहतूक सेना, सचिन सहारे - जिल्हा उपाध्यक्ष, राहुल वेळे - चिटणीस, कामगार सेना, श्रीकांत बुधे-तालुका उपाध्यक्ष, अमरीश चीचूलकर-शहर अध्यक्ष, नीलडोह, दिपक शभरकर-शहर अध्यक्ष, रायपूर, लक्ष्मीकांत मेश्राम- शहर अध्यक्ष, वानाडोंगरी, विश्वास घनचकर -शहर अध्यक्ष, हिंगणा, रमेश शर्मा -चिटणीस, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना, महेंद्र रंगाडहाळे - सहचिटणीस, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना, तसेच राहुल राठोड व मुकेश देवगडे यांचा विशेष उपस्थिती होती.

सुमित हुलके, निरंजन बरवड, अनिकेत उरकुडे, राजू वैरागडे, दीपक येलूरे, समीर मडावी, भावेश येलूरे, किरण डोंगरे, रुपम उमाळे, ऋतिक किमिरे, आयुष भोयर, यश गाऊतरे, तुषार डोबले, रितिक राठोड,



आशिष मोरे, हितेश फुलझेले, हर्षल धुरवे, शुभम लोहारकार, पंकज शेंडे, श्रीकांत मोहर्ले यांनी मनसेत प्रवेश करून पक्षाला नवी ऊर्जा दिली.

# प्रश्नमंजुषा स्पर्धेत संजना भांडारकर प्रथम

## जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :




येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभाग व नेचर ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक ओझोन दिन २०२५" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचें आयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन कोंगरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. महाविद्यालय स्तरीय ऑनलाइन क्विझ कॉम्पिटिशन मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. बी.एससी. द्वितीय वर्ष संगणकशास्त्र विभागाची विद्यार्थिनी संजना भांडारकर हिने प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला तसेच अंजली बोरा हिला द्वितीय तसेच तनुश्री मेंढे, बी.कॉम. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी हिला स्पर्धेत अनुक्रमे तृतीय क्रमांक मिळाला.

जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने ओझोन वायू संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे हा ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचें आयोजित करण्याचा उद्देश होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, आय.क्यू.ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. नरेंद्र घारड, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन कोंगरे, नेचर ग्रीन क्लब समन्वयक डॉ. अविनाश इंगोले, प्रा. श्रीकांत कैथल यांनी स्पर्धेतील विजेत्या व सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १९ :

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,रामटेक येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात वक्तृत्व स्पर्धेत "समृद्ध भारतासाठी तरुणांची भूमिका "या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले." राष्ट्र प्रगतीसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची आवश्यकता "या विषयावर निबंध लेखन केले.सोबतच प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न झाली. यात वर्ग ५ ते १२ वी च्या विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. मुख्याध्यापक रवींद्र चन्ने यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात पर्यवेक्षक शैलेश परमार, जेष्ठ शिक्षक संजीव दयापूरकर,अशोक खंडाईत,ग्रंथपाल सुनील हटवार, दलाल मॅडम व शिक्षक शिक्षिकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत दोन कुख्यात आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :



आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाचे सुरक्षा दल प्रवाशांची आणि त्यांच्या सामानाची सुरक्षा सुनिश्चित करते "ऑपरेशन पॅसेंजर सेफ्टी" मोहिमेअंतर्गत दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये, जे सुरक्षिततेसाठी चालवले जात आहेत. आरोपींना चोरीच्या आणि लुटलेल्या मालमत्तेसह अटक करण्यात आली आणि संबंधित सरकारी रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. (जीआरपी) सुपूर्द करण्यात आले. विभागीय सुरक्षा आयुक्त दीप चंद्र आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय पातळीवर विशेष कार्य दलाची स्थापना पथक सतत गस्त घालत आहे आणि देखरेख करत आहे. या क्रमाने, १२ सप्टेंबर २०२५ रोजी, ट्रेन क्रमांक १८२३७ गोंदिया ते नागपूर छत्तीसगड एक्सप्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा सॅमसंग मोबाईल (किंमत २३,९९९) गोंदिया स्टेशनवरून निघाल्यानंतर १० मिनिटांनी चोरीला गेले, जीआरपी गोंदियाला कळवले १८.०९.२०२५ रोजी विशेष कृती दलाच्या सतत प्रयत्नांमुळे गुन्हा क्रमांक ७७/२०२५ नोंदवण्यात आला. 68724 क्रमांकाच्या गोंदिया-दुर्ग लोकलमध्ये सालेकसाजवळ मनोजला संशयावरून पकडण्यात आले.

शर्मा (वय ४५ वर्षे, रा. दुर्ग, छत्तीसगड) याने गुन्ह्याची कबुली दिली आणि त्याच्याकडून चोरी केली. चोरीला गेलेला मोबाईल जप्त करण्यात आला आणि पुढील कारवाईसाठी जीआरपी गोंदियाकडे सुपूर्द करण्यात आला. त्याचप्रमाणे, १४.०९.२०२५ रोजी, ५८८२५ क्रमांकाच्या पॅसेंजर ट्रेनमध्ये प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला सिवनी येथून १०००० रुपये भरण्यास सांगण्यात आले. तक्रारीनंतर तिकीट तपासण्याच्या बहाण्याने स्टेशनवर एका अज्ञात व्यक्तीने ९,५०० रुपयांची रोकड हिसकावून घेतली. विभागीय सुरक्षा आयुक्तांच्या सूचनेनुसार जीआरपी छिंदवाडा येथे गुन्हा क्रमांक ३२/२०२५ नोंदवण्यात आला. सीसीटीव्ही फुटेज आणि माहिती देणाऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, स्थापन केलेल्या विशेष पथकाने १७.०९.२०२५ रोजी हरिजनला अटक केली. रोहित कुमार सनोदियाला मोहल्ला, सिवनी (मध्य प्रदेश) येथून अटक करण्यात आली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. आणि त्याच्याकडून रोख रक्कम जप्त करून जीआरपी छिंदवाडाला देण्यात आली. रेल्वे सुरक्षा दल नागपूर विभागाचे प्रवाशांना त्यांचे सामान सुरक्षित ठेवण्याचे आवाहन आणि प्रवासा दरम्यान, कोणत्याही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचालीची माहिती ताबडतोब जवळच्या रेल्वे मदतीची तक्रार करण्यासाठी आरपीएफ/जीआरपी स्टेशन, कार्यरत रेल्वे कर्मचारी किंवा टोल-फ्री क्रमांक १३९ वर कॉल करा. रेल्वे संरक्षण दल आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभाग प्रवाशांना सुरक्षा आणि मदत देण्यासाठी नेहमीच तयार आहे आणि गुन्हेगारी घटकांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरूच ठेवेल.

## निधन वार्ता

### अॅड. मनोहरराव गावंडे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :



नागपूर येथील संभाजीनगर, पठाण ले-आऊट निवासी अॅडव्होकेट मनोहरराव गोपाळराव गावंडे यांचे निधन झाले. ते ७९ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर सहकारनगर घाटावर शनिवार २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# उपजिल्हा रुग्णालयात नि:शुल्क रोगनिदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १९ :

आज दिनांक १९ सप्टेंबर २०२५ ला "स्वस्थ नारी सशक्त परिवार "अभियाना अतंर्गत विशेषतज्ञाचे शिबिर कामठी तालुका अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे वैद्यकीय अधिक्षक व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यांत आले होते. त्यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



या शिबिराचे उदघाटन उमेश रडके अध्यक्ष कामठी तालुका समन्वय समिती, तहसिलदार गणेश जगदाळे, बाळासाहेब यावले गट विकास अधिकारी कामठी पंचायत समिती यांच्या हस्ते करण्यांत आले. तसेच डॉ. सौरभ अग्रवाल तालुका रुग्ण कल्याण समिती, निशांत तरन्नुम शेख मुबारक वैद्यकीय अधिक्षीका उपजिल्हा रुग्णालय कामठी आणि डॉ. सुरेश मोटे, तालुका आरोग्य अधिकारी कामठी, डॉ. मनीषा कांबळे वैद्यकीय अधिकारी ( नोडल ऑफीसर), भारती देशमुख, सहाय्यक अधिसेविका तसेच उपजिल्हा रूग्णालयाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी, (१) एच.सी.जी.हॉस्पिटल नागपुर (२) जिल्हा रुग्णालय मानकापुर चौक नागपुर, आणि (३) कार्यरत ( डी.आर.पी.) निवासी वैद्यकीय अधिकारी प्रशिक्षणार्थी या तज्ञ वैद्यकीय चमू (टीम ) उपस्थीत होत्या. या आरोग्य शिबिरा अंतर्गत एकुण ८६० लाभार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला. यापैकी पुरूष लाभार्थी ३५० आणि स्त्री ५१० लाभार्थ्यांची निशुल्क रोग निदान व उपचार शिबिर संपन्न झाले. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, त्वचा रोग, नाक, कान, घसा रोग, मानसिक रोग, गरोदर माता, लहान मुलांचे विविध रोग यांची वैद्यकीय तपासणी करुन औषधोपचार करण्यांत आले. आभा आयुष्मान कार्ड, वंदना कार्ड या सारख्या सेवेचा लाभ घेतला.

# विदर्भ शाहीर कलाकार परिषदेची नव्याने कार्यकारिणी जाहीर



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १९ :

काटोल येथे नुकतीच विदर्भ शाहीर कलाकार परिषदची मीटिंग आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तालुक्यातील कलावंत मंडळी उपस्थित होते. यामध्ये नव्याने विदर्भ प्रज्ञा बुद्ध विहार बुधवार पेठ काटोल येथे नुकतीच शाहीर कलाकार परिषदेची काटोल तालुका तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली काटोल जिल्हा नागपूर येथे घेण्यात आली. या कार्यक्रमाला विदर्भ शाहीर कलाकार परिषदेचे जेष्ठ नेते दयालजी कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत खालील कार्यकारणी गठीत करण्यात आली. अध्यक्ष प्रफुल भुजाडे उपाध्यक्ष शारदा टेकाडे, सचिव विजय ठाकरे, सहसचिव आशा मेंढे, कोषाध्यक्ष प्रकाश बांधे, संघटक युवराज उमाळे, मार्गदर्शक यादवराव भुजाडे. कार्यकारणी सदस्य प्रमोद गायकवाड, भारत किनकर, मनोहर गावंडे, दामोदर जराटे, नंदकिशोर डांगोरे, प्रभाकर काळमेघ, तुळशीराम बोरजे, नामदेव किनकर, सदाशिव कातलांग, बाबुराव पाचोडे, रामकिसन बेहुनिया, ज्ञानेश्वर मुरोडीया, रोशन खरपूरीया.

महिला विंग कार्यकारणी सदस्य-कविताताई बांधे, अनिता सुरजुसे, कविताताई बावणे, रेखा कावडे, मीनाताई पाटील, कालींदा राऊत, सुलोचना मानेराव, नीलिमा रोहनकर, कांता वरघट, शांतानारनवरे, छायाताई भगत, पौर्णिमा मून व इतर अशा प्रकारची जम्बो तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली यावेळी तालुक्यातील बहुसंख्या कलाकार उपस्थित होते.

## स्वस्थ नारी सशक्त परिवार कार्यक्रम आयोजित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

नरेंद्र मोदी यांच्या महिला सशक्तिकरण व सामाजिक कल्याणाच्या संकल्पनेनुसार, नागपूर मंडल रेल्वे रुग्णालयात 17 सप्टेंबर 2025 रोजी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत बहुविशेषज्ञ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मंडल रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शिबिराचे उद्घाटन मंडल रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या हस्ते, सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ अध्यक्षा दीपा गर्ग तसेच इतर मान्यवर सदस्यांच्या उपस्थितीत झाले. या उपक्रमाचा उद्देश महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि प्रतिबंधात्मक उपायांचा प्रसार करणे हा होता. स्वस्थ नारी, सशक्त परिवार या संकल्पनेला या उपक्रमातून बळकटी मिळाली. शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, कॅन्सर तपासणी ईएनटी, दंत, मनोरोग, नेत्र, त्वचारोग यांचे विशेष सल्लामसलत तसेच पोषण, मातृ आरोग्य, मासिक पाळी स्वच्छता, प्रजनन आरोग्य आणि मानसिक आरोग्यावरील मार्गदर्शन करण्यात आले.

# इको फ्रेंडली गणेशोत्सव विजेत्यांना पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १९ :

डिगडोह देवी नगर परिषदे अंतर्गत इको-फ्रेंडली गणेश उत्सव स्पर्धेला चांगला प्रतिसाद लाभला. यामध्ये विजयी स्पर्धकांना सन्मानपत्र व पुरस्कार देण्यात आली.

पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून स्पर्धेत विजेत्यांना प्रशासक व मुख्याधिकारी रामेश्वर पंडागळे यांच्या हस्ते सन्मानपत्र व प्रथम पुरस्कार (२००० रुपये रोख) सूरजलाल पटले, द्वितीय पुरस्कार (१००० रुपये) सौरभ सुदर्शनजी प्रधान (राजगृह नगर) तृतीय पुरस्कार (५०० रु)ज्योति कुंजाम (पोलीस नगर) देण्यात आले. इको-फ्रेंडली गणेशोत्सवाचे महत्त्व पटवून देत सगळे मिळून पर्यावरण मुक्त करू या असा संदेश दिला.

यावेळी स्पर्धा नियोजन आयोजक व पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता फिरोज बिसेन, शहर समन्वयक सूरज भट,कार्यालयीन अधिक्षक सागर पहाडे, हितेंद्र उके उपस्थित होते.

# सहा विद्यार्थ्यांना विल्यम शेक्सपियर शिष्यवृत्ती प्रदान



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे सहा विद्यार्थ्यांना विल्यम शेक्सपियर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी आयक्यूएसी संयोजक डॉ. नरेंद्र घारड,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. लीना फाटे तसेच इतर प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अर्चना देशमुख यांनी केले. यावेळी डॉ. निरले पेटकर, शीतल बोंडे, आकांक्षा बांगड, धनराज राठोड यांच्यासह मानविकी संकुलातील प्राध्यापक उपस्थित होते. दामिनी सावरकर, अदिती तोताडे, मल्लिका सगरिया, दीक्षा सरोदे या शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्याला रोख रक्कम शिष्यवृत्ती देण्यात आली.

# धापेवाडा येथे ३३ कोटी रुपयांच्या कामात लाखोंचा घोळ

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १९ :



कळमेश्वर पासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या धापेवाडा येथे नितीनजी गडकरी यांच्या गावामध्ये गडकरी यांनी धापेवाळ्याच्या विकासाकरिता 33 करोड रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला. परंतु या गावाचे या कामाचे कॉन्ट्रॅक्टर कृष्णा कॉन्ट्रॅक्टर आमदाबाद यांना देण्यात आले यासंदर्भात गावकरीचे लक्षात आले की या गडर लाईन मध्ये कोणत्याही प्रकारचे गिट्टी सिमेंट रीती आढळलेले नाहीत यामुळे अंडरग्राउंड गडर लाईनचे काम निष्कृष्ट दर्जाचे आणि ईंजिनियर यांच्या आशीवादनि काम चालू आहे .

17.9.2025 रोजी एन.एम.आर.डी.ए. या कंपनीचे काम चालू असून 33 कोटी रुपयांची काम करीत आहे. या कामामुळे ग्रामपंचायत येथे मीटिंग ठेवण्यात आलेले होती.

धापेवाडा हे गाव नितीन गडकरी यांच्या जन्मभूमी गावामध्ये अंदाजे 6 महिने पासुन काम चालू असून अंडरग्राउंड गडर लाईनचे काम निष्कृष्ट दर्जाचे आणि ईंजिनियर यांचे कुठल्याही कामावर लक्ष न देता नाही ईंजिनियर अश्विन तामगाडगे व आशिष राव यांच्या आशीवादनि अशा प्रकारे काम करीत आहे. दि 8.9.2025 ला नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष जयस्वाल, आशिष देशमुख यांना पत्र देण्यात आले होते. परंतु. ईंजिनीयर अश्विन तामगाडगे धापेवाडा ग्रामपंचायत येथे आले असून हे वॉर्ड नंबर 5 मध्ये कामाची चौकशी करण्याकरीता आले असून निदर्शनात आले नागरिकांनी तामगाडगे यांना सरदार बेडावर येथे नेण्यात आले असून जीसीबीने गडर लाईनचे नाली पाईप खोदण्यात आल्याने नंतर पाईपाच्या गिट्टी, रेती, सिमेंट, दिसुन आलेले नाही यामुळे नागरिकांनी ईंजीनीयरला प्रश्न विचारले आता काय करायचे ईंजीनीयरने त्या चुका झाल्याचे मान्य केले.

धापेवाडा येथील पूर्ण गावांमध्ये अशाच प्रकारे काम झालेले असून धापेवाडा ग्रामपंचायत सचिव ईश्वर धुर्वे. सरपंच मंगला शेटे पाहणी करण्याकरिता गावकरी नागरिक अधिकारी सोबत आले. तिथे कोणत्याही प्रकारचे सिमेंट व रेती आढळली नाही अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना कुठलाही न्याय न देता पळ काढण्यात आले ग्रामपंचायत सरपंच याची प्रेस कॉन्फरन्स घेण्यात आले. ठेकेदार कृष्णा कॉन्टॅक्टर अमदाबाद गुजरात या लोकांना काम देण्यात आलेले आहे.

तसेच गावकरी नागरिकांची मागणी आहे की यांचावर कारवाई करण्यात यावी. तिथे उपस्थित असलेले सचिव ईश्वर धुर्वे, ग्रामपंचायत सरपंच मंगला शेटे, उपसरपंच मंगेश माले, ग्रा. प. सदस्य संगीता दुरुगुवार, ग्रा.प. सदस्य . ग्रा प.दिव्या वानखेडे, डॉ. मनोहर काळे, गोविंदा शेटे, चिंतामण रोहनकार, संजय बिंड, संदीप भरबत, उमाजी गाठीबांधे, संदीप धकाते, गगनसिंग बावरा. दिवाकर कडू. शितल सवाईतुल, खजान सिंग बावरा, रोशन वानखेडे, राजा धार्मिक, मनीष कुहिकर, सुधाकर पाटील,व सर्वे गावकरी नागरिक उपस्थित होते.

# गाडगे बाबांना भारतरत्न प्रदान करण्याकरिता चिखलदरा येथील तहसीलदारांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १९ :

चंद्रशेखर अरगुलेवार यांच्या नेतृत्वाखाली तेजस बहुउद्देशीय संघटना १३ मार्च २०२५ पासून गाडगे बाबांना भारतरत्न देण्याच्या मुद्द्यावर मोहीम राबवत आहे. यामध्ये देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या नावे सरकार आणि प्रशासनामार्फत निवेदन देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील चिखलदरा येथे आदिवासी तरुणांना पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण देण्यात अरगुर्लेवार यांनी पुढाकार घेतला आहे. यासोबतच, गाडगे बाबांना भारतरत्न मिळावे यासाठी मोहीमही सुरू ठेवण्यात आली आहे. मेळघाट योद्धा विद्रोही विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष सचिन भाऊ गोरले यांच्या उपस्थितीत, तेजस संघटनेचे संस्थापक/अध्यक्ष चंद्रशेखर अगुर्लेवार यांनी युवाशक्तीसह चिखलदरा तहसीलदार माननीय यांना पंतप्रधानांच्या नावे निवेदन सुपूर्द केले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत देवळी व देवग्राम येथे कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
सावरगाव, दि. १९ :



छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवस 17 सप्टेंबर 2025 ते महात्मा गांधी जयंती 02 ऑक्टोंबर 2025 च्या दरम्यान सेवा पंधरवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये नरखेड तालुक्यातील देवळी व देवघरात येथे बुधवार दिनांक 17 सप्टेंबर 2025 रोजी महाराष्ट्र शासन महसूल विभागामार्फत कार्यक्रम घेण्यात आला.यामध्ये देवळी येथील पांदन रस्त्याचे सीमांकन निश्चित करून मोजणी करण्यात आली व वृक्षारोपण करण्यात आले तसेच देवग्राम ग्रामपंचायत मध्ये तहसीलदार उमेश खोडके यांनी भेट देऊन नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यांचे निराकरण केले.

यावेळी नरखेडचे तहसीलदार उमेश खोडके, देवळीचे सरपंच रामहरी कोरडे, उपसरपंच रोशनी रेवतकर, मंडळ अधिकारी विनय यावलकर, ग्राम महसूल अधिकारी खुशाली वरखडे, मोतीराम लाखे, अनिल वरहोकर, प्रमोद आलोने, निलेश तिजारे, प्रभाकर नाडेकर, नारायण कोरडे, ज्ञानेश्वर मानेकर, विनोद चक्रपाणी यांच्यासह गावातील नागरिकांची उपस्थिती होती.

देवग्राम ग्रामपंचायत कार्यालयामध्ये तहसीलदार उमेश खोडके यांनी भेट दिली असता नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण करण्यात आले. यावेळी उपसरपंच देवेंद्र लोहे, ग्रामपंचायत सदस्य सदानंद गिरडे, मंडळ अधिकारी देवेंद्र नाखले, ग्राम महसूल अधिकारी अनिल पाचपिले, रामदास दवंडे, ग्रामपंचायत अधिकारी विजया तिजारे, ग्रामपंचायत कर्मचारी धनंजय तांबोळी, प्रज्वल वासाडे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

# दुर्ग-सुलतानपूर स्पेशल ट्रेन आणि सबलासपूर-येल्हांका (बेंगळुरू) फेस्टिव्ह स्पेशल ट्रेन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

आगाऊ बुकिंग करून, प्रवासी उत्सवाची गर्दी टाळू शकतात आणि आरामदायी प्रवासाचा आनंद घेऊ शकतात. सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी, रेल्वे प्रशासनाकडून अनेक सण विशेष गाड्या चालवल्या जातात. राज्य सरकारकडून या विशेष गाड्या चालवल्या जात आहेत, ज्यामध्ये दुर्ग-सुलतानपूर-दुर्ग आणि बिलासपूर-येल्हांका (बेंगळुरू)-बिलासपूर विशेष गाड्यांचा समावेश आहे. ट्रेन क्रमांक ०८७६३/०८७६४ दुर्ग-सुलतानपूर-दुर्ग सिव्हिल स्पेशल एक्सप्रेस दर शनिवारी दुपारी १:०० वाजता दुर्ग येथून सुटेल. सप्टेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आणि १४ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत दर रविवारी सुलतानपूर येथून. एकूण ते १२ फेऱ्यांसाठी चालवले जात आहे. त्याचप्रमाणे ट्रेन क्रमांक ०८२६१/०८२६२ सबलासपूर-येल्हांका (बेंगळुरू)-सब्लासपूर फे सिव्हिल स्पेशल, ९ सप्टेंबर ते १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दर मंगळवारी सबलासपूरहून आणि दर बुधवारी रात्री १० वाजता येलहंकाहून सप्टेंबर ते १९ नोव्हेंबर २०२५ पर्यंत एकूण २२ फेऱ्यांसाठी हे विमान चालवले जात आहे. दोन्ही विशेष गाड्यांमध्ये पुरेशा संख्येने जागा उपलब्ध आहेत.

०८७६३ दुर्ग-सुलतानपूर सिव्हिल स्पेशल २० सप्टेंबर २०२५ रोजीच्या सेवेमध्ये ३एसी क्लासमध्ये ३८७ बर्थ, स्लीपर क्लासमध्ये ४० बर्थ आणि ३एसी इकॉनॉमी क्लासचा समावेश आहे. या ट्रेनमध्ये ९५ बर्थ उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे, ०८२६१ सबलासपूर-येल्हांका (बेंगळुरू) फेअर सिव्हिल स्पेशल दिनांक २३ सप्टेंबर २०२५ पर्यंत, ३एसी क्लासमध्ये ३७८ बर्थ, स्लीपर क्लासमध्ये १० बर्थ आणि ३एसी इकॉनॉमी क्लासमध्ये १०५ बर्थ रिक्त आहेत. प्रवासी आगाऊ आरक्षण करून हे फायदे घेऊ शकतात. याशिवाय, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेकडून विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

# मलिकच्या पत्नीने सांभाळला ड्रग्जचा धंदा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

शहरातील सर्वात मोठा ड्रग्ज पेडलर आणि कोतवाली परिसरातील चर्चित गुंड धीरज मलीक रा. स्वीपर कॉलनी, गंगाबाई घाट याला मे महिन्यात गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने सापळा रचून अटक केली होती. त्याच्याकडून जवळपास अर्धा किलो मेफेड्रॉन ड्रग्ज (एसडी) ही जप्त करण्यात आला होता. या प्रकरणात धीरज तुरूंगात गेल्यानंतर त्याच्या पत्नीने त्याचा धंदा सांभाळला. ती सुद्धा मोठ्या प्रमाणात ड्रग्जची विक्री करीत असल्याची माहिती डीसीपी कदम यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

डीसीपी कदम यांनी सांगितले की, तीन दिवसांपूर्वी कळमना पोलिसांनी मिनी मातानगर परिसरात गस्ती दरम्यान अमित लज्जाराम शर्मा (४४) रा. दारोडकर चौक आणि मुकेश निरंजन तराळे (४७) रा. वसंतनगर, अजनी या दोघांना ५.२४ ग्रॅम एमडीसह पकडले होते. त्यांची कारही पोलिसांनी जप्त केली होती. दुसऱ्या दिवशी त्यांची पोलिस कोठडी घेण्यात आली. चौकशीदरम्यान त्यांची फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लिंक तपासण्यात आली. अमितने आयूष दीपक इंगोले (२०) रा. शिवाजीनगर, कोतवाली आणि मयूर प्रकाश ठवकर (२१) रा. शंकरनगर, वाठोडा यांनी ड्रग्ज दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोघांवरही पाळत ठेवली. मंगळवारी रात्री आयूषला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला, मात्र तो मिळाला नाही.

बुधवारी रात्री पोलिसांना माहिती मिळाली की, आयूष त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी घरी येत आहे. पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी पुन्हा परिसरात सापळा रचला. आयूष घरी आला, मात्र पोलिस आल्याचा सुगावा लागताच त्याने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. घराच्या झडतीमध्ये त्याच्याकडे ३३ लाख रुपये किंमतीचा २१९ ग्रॅम ड्रग्स मिळाला. आयूषने दिलेल्या माहितीवरून मयूरला अटक करण्यात आली. मात्र मयूर काही सांगण्यास तयार नव्हता. न्यायालयातून त्याची २२ सप्टेंबरपर्यंत कोठडी घेतल्यानंतर त्याने मोठा खुलासा केला. त्याने सांगितले की, धीरज मलिकची पत्नी शहरात अंमली पदार्थांचा पुरवठा करीत आहे. पोलिस आता धीरजच्या पत्नीचा शोध घेत आहेत.

# एमपीएससी संयुक्त मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. १९ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) ने घेतलेल्या संयुक्त मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल १६ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर झाला. उमरेड येथील वृषभ लीलाधर बोरीकर यांनी या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले. २३ वर्षीय वृषभ यांची राज्य कर निरीक्षक (एसटीआय) पदासाठी निवड झाली आहे. त्यांनी संपूर्ण राज्यात १२९ वा क्रमांक मिळवला आहे. एक विशेष कामगिरी म्हणजे वृषभ बोरीकर यांनी विशेष मागासवर्गीय (एसबीसी) श्रेणीत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या यशामुळे उमरेड परिसरात आनंद पसरला आहे.

एमपीएससी संयुक्त परीक्षेची अडचण यावरून मोजता येते की एकूण २८०,६५२ उमेदवारांनी प्राथमिक परीक्षेसाठी अर्ज केला होता. त्यापैकी फक्त ८,१३९ उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले. २९ जून २०२५ रोजी झालेल्या मुख्य परीक्षेत राज्य कर निरीक्षक पदासाठी २०९ उमेदवारांची निवड झाली, ज्यात वृषभ बोरीकर यांचाही समावेश होता. हे उल्लेखनीय आहे की वृषभची ही दुसरी मोठी निवड आहे. यापूर्वी २०२३ मध्ये त्यांची नगर परिषद कर मूल्यांकन आणि प्रशासकीय अधिकारी पदासाठी निवड झाली होती. तरुण वयात दोनदा मिळवलेले हे यश त्यांचे कठोर परिश्रम, समर्पण आणि दृढनिश्चय सिद्ध करते. वृषभच्या यशाने उमरेड शहरात आनंदाची लाट उसळली आहे. कुटुंब, मित्र, शिक्षक आणि सामाजिक नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. वृषभची कामगिरी तरुण पिढीला प्रेरणा देईल असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

वृषभ एका सामान्य कुटुंबातून येतो. त्याची आई प्रतिमा बोरीकर गृहिणी आहे, तर त्याचे वडील लीलाधर बोरीकर देखील पिक एजंट म्हणून काम करतात. आर्थिक परिस्थिती कठीण होती, तरीही त्याच्या पालकांनी त्याच्या मुलाच्या शिक्षणाशी कधीही तडजोड केली नाही. स्वतःच्या संघर्षांना न जुमानता, कुटुंबाने वृषभला उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी पूर्ण पाठिंबा दिला. वृषभने त्याच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाने त्याच्या पालकांची स्वप्ने पूर्ण केली.
प्रारंभिक परीक्षाः ६ फेब्रुवारी २०२५, मुख्य परीक्षाः २९ जून २०२५, निकाल जाहीरः १६ सप्टेंबर २०२५ वृषभ बोरीकर म्हणाले की त्याचे यश त्याच्या पालकांचे आशीर्वाद, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सतत सरावामुळे आहे. त्यांनी तरुणांना सांगितले की कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे.

# लोणखैरी येथे विज पडून बैल ठार

■ महासागर प्रतिनिधी
कोराडी, दि. १९ :

विजेच्या कडकडाटसह मुसळधार पावसाने रामदास डेहनकर रा. लोणखैरी या कास्तकाराचां वाहिजुपीचा बैल अंगावर वीज पडल्याने ठार झाल्याची दुखत घटना घडली. ही माहिती गावातील सरपंच लीलाधर भोयर यांनी प्रतिनिधीला दिली. प्राप्त माहितीनुसार, काल दुपारी 3.30बाजता मोठ्याप्रमाणात विजेच्या कडकडाटसह पावसाला सुरुवात झाली रामदास डेहनकर यांचा बैल खाली पडीत जागेतील कुरणात चरत होता आणि अचानक त्याच्या अंगावर विज पडल्याने वाहिजुपिचा बैल जागीच ठार झाला. या घटनेची माहिती पशुवैद्यकीय दवाखाना कोराडी यांना माहिती दिली पटवारी भावना सोंनकुसरे सह सर्व अधिकारी कर्मचारी शेतावर मौका चौकशीसाठी पोहोचले



बैलाचे पोस्ट मार्टम करण्यात आले पटवारी यांनी तहसीलदारांना मुहावजा देण्याबाबत प्रस्ताव पाठवल्याचे कळते याप्रसंगी गावातील सरपंच लीलाधर भोयर, उपसरपंच बोधिसत्व झोडापे, आणि गावातील नागरिक पंच म्हणून उपस्थित होते.

# नाना पाटेकर यांच्या हस्ते मनीष रामटेके यांचा सत्कार





■ महासागर प्रतिनिधी
सावरगाव, दि. १९ :

जागर नामाचा दशक पूर्ण सोहळा (नाम फाउंडेशन) पुणे येथे केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री माननीय नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उद्योग मंत्री उदय सावंत, तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, फिल्म स्टार नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांचे उपस्थितीत मनीष रामटेके सोनोली (सावरगाव) तह काटोल जिल्हा नागपूर यांचा सत्कार नाना पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आला, कार्यक्रमाप्रसंगी नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांना मनीष रामटेके यांनी पेंटिंग फोटो भेट दिली.

# जे.एन. कॉलेजमध्ये पोस्टर स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे फेस्टिवल अँड फेअर्स या विषयावर पोस्टर (भित्तिचित्र) स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कला अभिव्यक्ती तसेच सामाजिक सण-उत्सव व भारतीय सांस्कृतिक परंपरेबद्दल जागरूकता वाढवणे हा होता. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या रचनात्मक क्षमतेला चालना देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त असल्याचे सांगितले. भारतीय सण समाजात एकता व बांधिलकी दृढ करतात, असेही त्यांनी नमूद केले. या वेळी आय.क्यू.ए.सी. संयोजक डॉ. नरेंद्र घारड यांनी सण-उत्सव भारताला सामाजिक व आर्थिक दृष्ट्या उन्नत करतात व समाजात प्रेम व आनंद पसरवतात असे प्रतिपादन केले.

# नरखेड तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट विजयी

■ महासागर प्रतिनिधी, नरखेड, दि. १९ :

ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेड व एकलव्य हायस्कूल सावरगाव यांच्या मध्ये बॅडमिंटन या खेळाची स्पर्धा झाली, त्यात ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेड तालुका प्रथम आली. त्याबद्दल ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्टचे मुख्याध्यापिका भारती झामरे व अविनाश गजभिये यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन बॅडमिंटन मधील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्टचे बॅडमिंटन खेळणारी मुले यश कुकडे, कार्तिक कळंभे,कार्तिक जगनावत होते. शाळेतील शिक्षक वीरेंद्र



भाजीखाये सर व शिवणी वानोडे यांनी मेहनत घेतली.

# बाह्यस्त्रोत वीज कर्मचाऱ्यांच्या हाताला मिळाले सुरक्षेचे बळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :



आपल्या घरांमध्ये वीज अखंडित राहावी यासाठी अनेक वीज कर्मचारी आपल्या जीवाची पर्वा न करता, धोकादायक परिस्थितीतही काम करत असतात. त्यांच्या याच अतुलनीय योगदानाला सलाम करत, महावितरणने नागपूरमधील बाह्यस्त्रोत वीज कर्मचाऱ्यांना 'सुरक्षा कवच' प्रदान केले आहे. भगवान विश्वकर्मा यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते या कर्मचाऱ्यांच्या कामातील धोका कमी करण्यासाठी अत्यावश्यक सुरक्षा साधनांचे वाटप करण्यात आले.

सुरक्षा साधनांचे महत्त्वः जीवनाचा अविभाज्य भाग सुरक्षा साधनांचा वापर अनेकदा ऐच्छिक वाटतो, पण तो आपल्या आणि आपल्या कुटुंबीयांच्या सुरक्षित भविष्यासाठी अनिवार्य आहे. मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी यावर विशेष भर दिला. "एखादा अपघात झाल्यावर आपल्याला सुरक्षा साधनांचे महत्त्व कळते, पण त्याची भीषणता ज्याची हानी होते त्यालाच जाणवते," या त्यांच्या शब्दांतून सुरक्षा साधनांचे महत्त्व स्पष्ट झाले. महावितरणने हे गांभीर्याने घेतले असून, केवळ सुरक्षा साधनेच नव्हे, तर कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या योजनांचा लाभ देऊन कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षिततेचीही काळजी घेतली आहे.

हा उपक्रम केवळ काही वस्तूंचे वाटप नसून, प्रत्येक कर्मचाऱ्याच्या जीवनाप्रती महावितरणची बांधिलकी दर्शवतो. या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांच्या कामातील धोके कमी करण्यासाठी विविध अत्यावश्यक साधने देण्यात आली. यामध्ये टेस्टर, स्क्रू ड्रायव्हर, रबरी हातमोजे, गमबूट, सेफ्टी बेल्ट, झुला, फोल्डेबल डिस्चार्ज रॉड, बॉक्स स्पॅनर, टॉर्च, आणि मेगर अशा साधनांचा समावेश आहे. ही साधने केवळ कामाचे साधन नसून, कर्मचाऱ्यांच्या जीवनाची सुरक्षा सुनिश्चित करणारे 'वरदान' आहेत.

हा कार्यक्रम नागपूर परिमंडळ कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

## हलबा समाज महासंघाचा सुवर्ण महोत्सव

नागपूरः हलबा समाज महासंघाला सप्टेंबर, २०२५ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत असल्यामुळे दि. 20 सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी 11 वाजता सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे स्थळः- हलबा समाज महासंघाचे कार्यालय दीनदयाल नगर, नागपूर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे दि. २१ सप्टे.२०२५ रोजी सकाळी 10:00 वा. वार्षिक आमसभेचे आयोजन केलेले आहे.तरी सर्व आजीवन सदस्यांना व जाहिरात दात्यांना नम्र विनंती आहे की, त्यांनी वरील कार्यक्रमाला हजर राहावे असे महासंघाचे अध्यक्ष डॉ. प्रा.देवराम नंदनवार व महासंघाचे महासचिव डॉ रमेश पराते यांनी कळविले आहे.

## जयंती निमित्त विशेष लेख

# ममत्वाचा झरा, सेवाभावाची परंपरा सौ. रूपाताई रणजीतबाबू देशमुख



रूपाताई रणजितबाबू देशमुख यांचा जन्म 20 सप्टेंबर 1953 रोजी कल्याण येथे झाला. आईचे नाव मीनाताई व वडिलांचे नाव बाजीराव म्हलारजी पवार. उच्चशिक्षित रूपाताई यांचा विवाह 11 फेब्रुवारी 1973 रोजी महाराष्ट्रातील प्रगल्भ राजकारणी आणि विविध मंत्रीपद भूषविणारे रणजितबाबू देशमुख यांच्याशी झाला आणि त्या रूपाताई रणजितबाबू देशमुख म्हणून सर्वपरिचित झाल्या. त्यांच्या पोटी सावनेर मतदारसंघाचे यशस्वी आमदार डॉ. आशिषराव देशमुख व डॉ. अमोल देशमुख अशी दोन सुपुत्ररत्ने लाभली.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक समर्थ स्त्री असते असे म्हटले जाते. रणजितबाबू देशमुख यांच्या कारकिर्दीकडे पाहिले, तर त्यांच्या यशामागे दोन स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे - एक म्हणजे त्यांची आई माधुरीबाई अरविंदबाबू देशमुख आणि दुसऱ्या म्हणजे जीवनसाथी रूपाताई देशमुख कुठल्याही परिवारात स्त्रीचा सिंहाचा वाटा असतो; परंतु त्या कधी श्रेय मागत नाहीत. रूपाताई यांनी रणजितबाबूंच्या सोबत राहून त्यांना संकटांपासून दूर केले, अपयश पचवले आणि त्यांच्या प्रत्येक सामाजिक व राजकीय उपक्रमात खंबीर पाठिंबा दिला.

माधुरीबाई यांनी जोपासलेला सामाजिक वारसा रणजितबाबू आणि रूपाताई यांनी पुढे नेला. विशेष म्हणजे, माधुरीबाईच्या एक पाऊल पुढे जाऊन रूपाताई स्वतः गावोगावी फिरल्या, राजकीय व सामाजिक उपक्रम स्वतः राबवले. मुंबईत वाढलेली पवार घरची लेक थेट वडविहिरा सारख्या खेडेगावात रुजली. शेती, माती, गाववाडा, शेणगोठा ह्र या सवांशी त्यांचा घट्ट नातं जोडले गेले आणि ते आजही कायम आहे.

आईसाहेब रूपाताई दर महिन्याला पंधरवडाभर वडविहिरात राहतात. दिवाळी, दसरा, पोळा असे सर्व सण-सोहळे त्या गावातच संपूर्ण कुटुंबासोबत साजरे करतात. गावातील लोक त्यांना आईसाहेब म्हणूनच संबोधतात आणि आपुलकीने भेटायला येतात. त्या प्रत्येकाला प्रेमाने विचारपूस करतात, त्यांच्या समस्या समजून घेतात आणि निःस्वार्थ भावनेने मदत करतात.

ग्रामीण भागातील मुलींना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी शिवणकला वर्ग, कॉम्प्युटर क्लासेस आणि फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यांच्या प्रयत्नामुळे अनेक कुटुंबांना आत्मनिर्भरतेचा मार्ग मिळाला. रूपाताईंच्या जीवनकार्याचा विचार केला तर एक गोष्ट स्पष्ट होते - जो कोणी त्यांच्याकडे मदतीसाठी येतो, तो आनंदाने, हसतमुखाने परत जातो. खऱ्या अर्थाने त्या ममत्वाचा निर्मळ झरा आहेत. त्यांच्या या कार्यमय आणि त्यागमय जीवनाला सलाम करीत
रूपाताई रणजितबाबू देशमुख यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# काटोल येथे नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

## रंगरंगोटी, रोषणाईची कामे पूर्ण; सरसरस्वती माता तसेच माँ चंडिका माता मंदिराचे व विदेही सती अनुसया माता मंदिराचे द्वार सजले



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १९ :
महाराष्ट्र राज्याची उपराजधानी ही देशात संत्रानगरी म्हणून ओळखली जाते. याच नागपूर जिल्ह्यातील काटोल नगरीला पौराणिक व ऐतिहासिक महत्व आहे. शहरात हेमाडपंथी बांधकामातील मंदिरात असलेली माता चंडिका व माता सरस्वती ही दोन मंदिरे प्राचीन आहेत. नवरात्रोत्सवादरम्यान माता सरस्वती देवस्थान मंडळातर्फे धर्मोत्सवाचे आयोजन केले जाते, तर माता सरस्वती मंदिराचे काही वर्षांपूर्वी लोकवर्गणीतून आधुनिकीकरण करण्यात आले आहे. माता सरस्वती मंदिराला यंदा आकर्षक स्वरूप देण्यात आले आहे.

या मंदिर व परिसराची विद्युत सजावट माता सरस्वती चॅरिटेबल ट्रस्ट व नवरात्र उत्सव मंडळ सरस्वतीनगर यांनी केली आहे.मंडळातर्फे नगरपरिषद शाळा क्र.11 च्या मैदानात नागपूर येथील अश्रफ भाटी अरशद भाटी तसेच मध्यप्रदेश खंडवा येथील संदीप चोबें तसेच गुजरात चे प्रविण गौसावी याच्या माध्यमातून मीना बाजाराचे आयोजन करण्यात येणार असून यामध्ये विविध प्रकारचे मौजमजेचे साहित्य,नव नवनीत प्रकारचे ( झूले) पाडणे तसेच विविध लोकापयोगी साहित्य व खाद्यपदार्थांचे स्टॉल, असे विशेष आकर्षण राहणार आहे. चंडिका माता मंदिरात आकर्षक रोषणाई केली जात आहे ती व्यवस्था या दोन वर्षात कित्तेक वर्षाच्या कोर्ट कचहरी कारवाई निपटून आता मागील वर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये नवनिर्वाचित निवडणूकीतून निवडून आलेल्या कमेटी कडून मंदिर परिसरात विद्वत रोशनाई सजावट करून घटस्थापना सोबतच नवरात्रि ची सुरूवात केली जात आहे . यासह नवदुर्गा प्रदर्शनी मंडळ तारबाजार द्वारे मुंबईची रामायण युद्ध मध्ये लंका नरेश रावन आपल्या हवाई जहाज रथयात्रा मध्ये बसून प्रभु श्री राम सोबत आकाशातून युद्ध करत होता तेव्हा राम भक्त हनुमान यानी प्रभु श्री राम यांना आपल्या खांद्यावर बसून आकाशात नेले व तेव्हा रावणाला धनुष्य बाणाने वध केला देखावा असलेल्या दृश्य येथील स्वयंचलित देखावा प्रस्तुत करणार आहे. सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ धंतोली विशाल मंदिर निर्माण करून राम भक्त हनुमान ची विशालकाय मुर्ती साकारण्यात जाणार असून नजिकच्या मैदानावर रास गरब्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे अखंड ज्योत नवदुर्गा उत्सव मंडळ कुणबीपुरा गालपुरा चौकात विविध देवींच्या मूतीर्ची प्रतिष्ठापना करण्यात आली. यंदा मुंबई येथील देवी मुभा देवी मातेचे नवीन रूप धारण केले मातेची मूर्ती आकर्षणाचे केंद्र ठरणार असून, त्यासाठी मंडळातर्फे गुहेच्या स्वरूपात भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या गुफेत मातेची स्थापना करण्यात येणार आहे. शारदीय नवरात्र उत्सव मंडळ धंतोली येथे प्रथम वंदनीय भगवान श्री गणेश चे नाव एक दन्त कसे पडले यावर आधारित भगवान श्री गणेश व परशुराम युद्ध व माता पार्वती ने काली अवतार चे उग्र रूप धारण केल्या नंतर भगवान वामन अवतार प्रगट होऊन काली मातेला शांत करून युध्दा मध्ये गणपती चे एक दंत तुटलेल्या मुळे त्यांना प्रथम वंदनीय एक दन्त नाव देण्यात आले यावर स्वयंचलित देखावा सादर करणार आहे.

पेठ बुधवार सुभाष चौक स्थित नवदुर्गा उत्सव सांस्कृतिक मंडळाने नव देवी देखावा तसेच बंगाल येथील कलकत्ता येथील मंदिराची प्रतिकृती उभारली असून सादर केला आहे. न.प.चौक, तहसील कार्यालय चौक, आंबेडकर चौकात आदर्श माता राणी मंडळातर्फे लेण्यांचे मंदिर उभारले असून यात काली मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

### पारडसिंगा येथेही घटस्थापना

काटोल-जलालखेडा-वरुड मार्गावर 7 कि. मी. अंतरावरील पारडसिंगा येथील विदेही सती अनुसया माता मंदिर संस्थानमध्ये नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे अध्यक्ष चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते विधीवत पूजा अर्चना व घटस्थापनेने नवरात्राला सुरुवात होईल. यानिमित्ताने करण्यात आलेल्या आकर्षक रोषणाईने मंदिर व परिसर उजळून निघणार आहे. अश्विनी नवरात्रोत्सवात लाखो भाविक मोठ्या संख्येने मातांचे दर्शनासाठी रिघ लावतात.

# बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे नागपूरमध्ये आर्थिक समावेशन शिबीर



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
भारत सरकार वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने सुरु केलेल्या देशव्यापी मोहिमेचा भाग बँक ऑफ महाराष्ट्र, नागपूर झोन ने दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी कोराडी, नागपूर येथे वित्तीय समावेशन संपृक्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबीराला संयुक्त सचिव आशीष मोरे (वित्तीय सेवा विभाग ( डीएफएस) सीईओ आणि एमडी निधू सक्सेना (बँक ऑफ महाराष्ट्र), प्रादेशिक संचालक सचिन शेंडे (भा. रिजर्व बँक), मुख्य महाव्यवस्थापक प्रमोद द्विवेदी (बँक ऑफ इंडिया,) आणि महाव्यवस्थापक मनोज कारे ( रिटेल, क्रेडीट आणि एसएलबीसी) हे उपस्थित होते. शिबिरामध्ये विभिन्न गोष्टींवर मार्गदर्शन केले त्याशिवाय, सार्वजनिक आणि निजी क्षेत्रामधील बँकेंचे इतर अधिकारी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान नागरिकांना विभिन्न सेवा उपलब्ध करण्यात आल्या ज्यामध्ये प्रधानमंत्री जन धन योजना च्या अंतर्गत खाते उघडणे, प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, अटल पेंशन योजनेच्या अंतर्गत नामांकीत करणे. याशिवाय प्रलंबित बचत खात्यांचे पुनः , नामांकन अपडेट करणे, डिजिटल फसवणूक प्रतिबंध आणि दावा न केलेल्या ठेवीबददल जागरुकता सत्र देखील आयोजित करण्यात आले.

या शिबिराला ५७५ हुन अधिक लाभार्थ्यांनी उपस्थित राहुन वरील योजनेचा लाभ घेण्यास उत्सुकता दर्शविली. यावेळी बोलताना आशिष मोरे यांनी भारत सरकारच्या सामाजिक सुरक्षा कार्यक्रमाचा लाभघेण्यासाठी आणि त्यात सहभाग होण्यासाठी आवाहन केले. बँक ऑफ महाराष्ट्र, नागपूरचे झोनल मॅनेजन राहूल वाघमारे यांनी आभार मानले आणि नागपूर जिल्हातील सामाजिक क्षेत्रातील शेवटच्या घटकापर्यंत सर्व सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँक वचनबध्द असल्याचे आश्वासन दिले.

# संताजी स्मृति मंदिर गरोबा मैदान येथे शैक्षणिक शिबीर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
श्री संत जगनाडे महाराज शिक्षण संस्था नागपूर व श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा यांचे संयुक्त विद्यमाने 2025-26 या सत्राचे पहिले शैक्षणिक शिबिर श्री संताजी स्मृति मंदिर गरोबा मैदान नागपूर येथे संपन्न झाले.



शिबिरात खुशालराव पाहुणे, श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा रामटेक अध्यक्ष म्हणून लाभले. शिबिरात विद्यार्थी व पालक यांनी शिक्षण घेताना घ्यावयाची काळजी, असामाजिक तत्त्वापासून दूर राहणे, मुलींनी स्वतःचे संरक्षण करणे, पोलीस दलाची मदत कशाप्रकारे घ्यावी यावर सुधीर खुबाळकर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे सक्करदरा नागपूर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.जगदीश वांदिले यांनी वेळेचे व्यवस्थापन या विषयावर सखोल असे उदाहरणासह मार्गदर्शन केले. शिबिराचे प्रास्ताविक किशोर वरंभे, अध्यक्ष श्री संत जगनाडे महाराज बहुउदेशीय शिक्षण संस्था गंजी पेठ नागपूर यांनी केले. रवी उराडे, सचिव, श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा अंबाळा रामटेक यांनी संचालन केले, तर दिलीप तुपकर सचिव श्री संत जगनाडे महाराज शिक्षण संस्था नागपूर यांनी आभार मानले शिबिरास 200 पेक्षा जास्त विद्यार्थी व पालक नागरिक हजर होते. शिबिर यशस्वी करण्याकरिता श्री संत जगनाडे महाराज बहुउदेशीय शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष सुनील पंचभाई, उपाध्यक्ष शेखरजी महाजन, सहसचिव प्रमोद वरम्भे, सदस्य यांनी तसेच अभय कुमार बांगडकर, ताराचंद पाटील सुजय माकडे, राजेश लांजेवार, अंबादास तकितकर, अरूण धान्डे, गोपालदादा ईटनकर यांनी परिश्रम घेतले.

# मैंद कारागृहात, तर वाडेला पोलीस कोठडी

**कंत्राटदार वर्मा आत्महत्या प्रकरण**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
शासकीय कंत्राटदार पेनमाचा उर्फ मुन्ना वर्मा (६१) यांच्या आत्महत्या प्रकरणी गुन्हे शाखेच्या पथकाने पुसद अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचे संचालक शरद अप्पा मैंद आणि चर्चित गुंड मंजीत वाडे याला अटक केली. न्यायालयाने शरदची कारागृहात रवानगी केली तर मंजीतला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. शरदचे वडील अप्पा मैंद हे पुसद अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष आहेत. राज्यात बँकेच्या १९ शाखा आहेत. बँकेत एकूण ११ संचालक आहेत. त्यासर्वांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनाही लवकरच ताब्यात घेऊन अटक करण्यात येईल.
नागपुरात बँकेची शाखा प्रतापनगर परिसरात आहे. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या निदेशनि वर्मा हत्या प्रकरण सदर पोलिसांकडून गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले होते. पोलिसांनी शरदला त्याचे राहते घर पुसद येथून ताब्यात घेतले. त्याच वेळी त्याच्या छातीत दुखायला लागले. स्थानिक डॉक्टरांकडून तपासणी केल्यानंतर नागपुरातील मेडीकल रुग्णालयात उपचार करण्यात आला. डॉक्टरांनी अहवालावरून गुरूवारी सायंकाळी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. तर मंजित हा गुन्हेगार असून तो व्याजाने पैसे चालवितो. त्याने मुन्नाला व्याजाने रक्कम दिली होती. तर शरदच्या बँकेकडून मुन्नाने कर्ज घेतले होते. या दोघांनीही वर्मा यांचा वुसलीसाठी इतका छळ केला की, वर्मा यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. साई असोसिएट कंस्ट्रक्शन कंपनीचे संचालक वर्मा यांनी १ सप्टेंबर रोजी राजनगरच्या शंखनाद अपार्टमेंटमधील राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. सदर पोलिसांनी या प्रकरणात अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान पोलिसांच्या लक्षात आले की, वर्मा यांचा मोबाईल फोन आत्महत्येपासूनच गायब होता. त्यामुळे संशय वाढत गेला.

# बॉलिवूड अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
सोनेरी पहाट फाऊंडेशन, नागपूरच्या वतीने शुभारंभ बँक्वेट, बेसा येथे फ्लॉलेस इंडिया फॅशन शो चे भव्य आयोजन करण्यात आले. या प्रसंगी बॉलिवूड व मराठी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्या हस्ते विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून संताजी अर्बन गोंदियाचे अध्यक्ष उमेंद्र भेलावे, महिला नागरिक सहकारी पतसंस्था गोंदिया अध्यक्ष कंचन माचेवार, महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक गोंदिया अध्यक्षा डॉ.माधुरी नासरे, गिरनार अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे सीईओ डिंपल घाटे, भूमेश रिअलिटीचे संचालक भूमेश पेशने, डॉ.रश्मी तिरपुडे, दीपावली चौधरी, अल्पना राय व फाऊंडेशनच्या संचालिका रेखा भोंगाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात किड्स फॅशन शो तसेच मिस अँड मिसेस या गटांसह 45 स्पर्धकांनी सहभाग घेतला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्या हस्ते स्टार अचीव्हर अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत विजेते



ठरलेल्या ऋद्धिमा गडकरी, अनाविका घाटे, स्पृहा खापरे, तन्वी पारधी, पूनम पिंजरकर, शिवानी मेंढे, श्रद्धा डंबारे, कोमल गोरले, ऋणा पुरुषे, श्वेता नेवारे, लीना नेरकर या स्पर्धकांना किशोरी शहाणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. फॅशन शोच्या ब्रँड अम्बेसिडर जयश्री लिंगायत, शो ओपनर जयश्री पजई व प्रियंका जनबंधू, शो स्टॉपर तसेच किड्स ब्रँड ॲम्बेसिडर आर्या व्यास, शो ओपनर साईशा पांडे, दिव्यांश ढोणे, देविका शहारे, यांनाही स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोरिओग्राफर डॉ.ऋतु चौधरी, जानवी मेश्राम तसेच सोनेरी पहाट फाऊंडेशनच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

# नागपूरचे रस्ते उखडले

## खड्ड्यांत शहरवासीयांचे जीवन अडचणीत



### डॉ. प्रवीण डबली यांचे केंद्रीयमंत्री नितीन गडकरींना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
नागपूर शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था आता नागरिकांच्या सहनशक्तीपलीकडे गेली आहे. शहरातील बहुतेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून नुकतेच बनवलेले सिमेंट रस्तेही उखडून उबड-खाबड झाले आहेत. धुळीचे प्रदूषण, अपघातांचा धोका आणि आरोग्यविषयक त्रास यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रवीण डबली, नॅचुरोपॅथी व योग थेरपिस्ट, सामाजिक कार्यकर्ते व वरिष्ठ पत्रकार यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना थेट निवेदन देऊन तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

डॉ. डबली यांनी निवेदनात नमूद केले आहे की, जिथे जिथे सिमेंट रस्त्यांचा सांधा येतो किंवा पूल आणि रस्त्यांचा संगम होतो तिथे पातळी जुळत नाही. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून अपघाताला बळी पडतात. गड्डी गोदामझ्ऑटोमोटिव्ह चौक, इमामवाडा रोड, सदर, लक्ष्मीनगर चौक, हडको लेआउट, काटोल रोड व हिंगणा रोड आदी प्रमुख रस्ते तर पूर्णपणे जीर्णावस्थेत आहेत.

उबड-खाबड रस्त्यांमुळे वाहनचालक व प्रवाश्यांना कंबरदुखी, मानेचा त्रास, हातदुखी अशा तक्रारी वाढल्या आहेत. पावसाळ्यात घरांच्या पातळीपेक्षा उंच झालेल्या रस्त्यांमुळे घरात पाणी शिरते, काही घरे कायमस्वरूपी खाली बसली आहेत. तसेच रस्त्यांवरून उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे आजार व एलर्जी वाढत आहेत. कामगारांकडे तांत्रिक माहितीचा अभाव आणि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेच ही परिस्थिती उद्भवली असल्याचे डॉ. डबली यांनी नमूद केले आहे. दोषपूर्ण बांधकामांची चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कडक कारवाई व्हावी, टिकाऊ व समतल रस्त्यांसाठी उच्च दर्जाचे मानक लागू करावेत, अशी मागणी त्यांनी गडकरी यांच्याकडे केली आहे. या गंभीर प्रश्नाकडे केंद्रीय मंत्र्यांनी लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

**महासागर प्रभाग वार्ता**

# कुशीनगर परिसरातील सांडपाण्याच्या समस्येबाबत नागरिक आक्रमक

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. १९
उत्तर नागपूरमधील प्रभाग क्रमांक १ अंतर्गत कुशीनगर परिसरातील लाईन क्रमांक ५ व ६,७ या भागात गेल्या काही दिवसांपासून मुख्य गटार लाईनमुळे निर्माण झालेल्या समस्यांवरून स्थानिक नागरिकांत तीव्र नाराजी आहे. यासंदर्भात माजी प्रभागाध्यक्ष विशाल साखरे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी मंगळवारी झोनचे उपयुक्त श्री. अशोक गराडे यांना निवेदन सादर केले.निवेदनात सांगण्यात आले की, मुसळधार पावसामुळे परिसरातील गटाराचे पाणी अनेक घरात शिरले आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले. अन्नधान्य, कपडे, फर्निचर यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले



असून, लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.
सांडपाणी थेट घरांमध्ये शिरत असून, अनेकांना रात्रभर पलंगावर उभे राहून रात्र काढावी लागली, अशी व्यथा निवेदनात मांडण्यात आली.सदर समस्या मुख्य गटार लाईन व मुख्य चेंबर (१५० मीटर लांबीचा) निकृष्ट झाल्यामुळे निर्माण झाली आहे. ही लाईन नव्याने बसविण्याची मागणी यापूर्वीही करण्यात आली होती. उपयुक्त गराडे यांनी याआधी आश्वासन दिले होते की संबंधित कामाची फाईल तयार आहे आणि लवकरच दुरुस्ती करण्यात येईल, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली असून, लोकांच्या आरोग्यावर व जीवनमानावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे, महानगरपालिकेने तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.जर त्वरित उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर मनपा आयुक्तांच्या कार्यालयात सांडपाणी घेऊन निषेध करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.
निवेदन देणाऱ्यांमध्ये लताताई बोडके, कविता उईके, सुशीला पाटील, सीमा बडोले, देवराव राऊत, सिंधू काळे, रेखा माहुरे, कल्याणी पिल्ले, भारती बोरकर, दिशा वानखेडे, नरेंद्र डेव्हीड, आशिष काळे, अनिता ओरे, अक्षदा बगले, खुशबू रक्षमवार, सुनिता गुप्ता, आशा उपाध्याय आणि अन्य स्थानिक नागरिक सहभागी होते.

# शताब्दी चौक ते बेलतरोडी रोड कडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था

किरण बेलुरकर, नागपूर दि. १९
धंतोली झोन अंतर्गत येणाऱ्या शताब्दी चौक ते बेलतरोडी कडे जाणाऱ्या शताब्दी चौक रोडची दयनीय अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत आहे सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यामुळे रस्त्यावरील खड्डे इतके मोठे झाले आहे की नागरिकांना रोज अपघातांना सामोरे जावे लागत आहे या मार्गावरून ये जा करणाऱ्या लोकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे
या रस्त्यावर रहदारी मोठ्या प्रमाणात आहे पादचाऱ्यांना व जेष्ठ नागरिकांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे वाहन चालविणे कठीण झाले आहे असे येथील परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे शताब्दी चौक जवळ



लागून रस्ता खराब असल्यामुळे ट्रॅफिक जाम सुद्धा होत आहे या परिसरातील नागरिकांची मागणी आहे की रस्त्याचे कामे लवकरात लवकर पूर्ण करून खड्डे त्वरीत बुजवावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# प्रभाग क्रमांक २ जलमय

## नागरिकांचे जनजीवन विस्कळीत

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि.१९
मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे उत्तर नागपूरातील प्रभाग क्रमांक २ मधील अनेक भाग जलमय झाले असून, सध्या या भागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे नागरिकांना मोठा त्रासाला सामोरे जावे लागत आहे.
समता नगर मेन चौक, बाबा दीप सिंह नगर, बुद्ध विहार, नारी गाव, सोनोने लेआउट, तक्षशिला नगर, कडू लेआउट, गायकवाड बस्ती, चैतन्य नगर, नालंदा नगर, कामगार नगर, ईरोज कॉलनी, अमर विहार, कपिल नगर, दीपक नगर, मैत्री कॉलनी, आनंद नगर, कौशल्या नगर, काशी नगर, राजगृह नगर, मयूर नगर, कबीर नगर, खान लेआउट या भागांमध्ये पावसाचे पाणी अजूनही साचलेले असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप महानगरपालिका, आशी नगर झोन कार्यालय, व आरोग्य विभाग यांच्याकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.प्रभागातील कडू लेआउट, गायकवाड लेआउट, म्हाडा, व तक्षशिला नगर या ठिकाणी तर साचलेल्या पाण्यामुळे संक्रामक आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.या समस्येवर तातडीने उपाययोजना व्हावी यासाठी, माजी नगरसेवक मनोज दशरथ संगोळे, तसेच अजय सहारे, जयेश गेडाम, विलास नितनवरे,



प्रसन्ना सहारे, राजेश जांभुळकर, राजेश वासनिक, प्रशांत साखरे, प्रभू गजभिये, प्रवीण पाटील,युवराज सोनारे ,गिरीश साखरे यांनी तातडीने पुढाकार घेत महानगरपालिकेकडे होंडा पंप, जेटिंग गाडी तत्काळ पाठवण्याची मागणी केली आहे.नागरिकांची मागणी आहे की, प्रशासनाने तातडीने साचलेले पाणी काढून नाल्यांची सफाई, औषध फवारणी, व आरोग्य तपासणी शिबिरे सुरू करावीत.

# वृंदावन नगर येथे जागोजागी कचऱ्याचे ढीग

प्रदीप पौनिकर,
नागपूर दि. १९
प्रभाग क्र.५ वृंदावन नगर, या वस्तीमध्ये कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.मनपा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिक त्रस्त आहे आणि प्रशासन मस्त आहे.
वस्तीमध्ये अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे डेंगू ,मलेरिया, चिकनगुनिया, हिवताप यासारखे रोग घरोघरी पसरत आहे. पर्यावरण प्रदूषण, आणि सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.
वस्तीमध्ये कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत, त्यामुळे आम्हाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत



आहे. कचऱ्यामुळे आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत आणि परिसराची शोभा कमी झाली आहे. आम आदमी पक्षाच्या वतीने मनपा सतरंजीपुरा पुरा झोन चे सहाय्यक आयुक्त यांना अनेकदा तक्रार केल्यानंतर लक्ष दिल्या जात नाही आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे काम होत नाही जर मनपा प्रशासनाणे स्वच्छतेकडे लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आम देण्यात आला आहे.यावेळी आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते
प्रदिप पौनिकर, क्षितिज वंजारी, अनिल संभे, किसन निमजे, हेमराज कुंभारे, विजय नंदनवार, नानक धनवानी, मनोज फटींग, जानकीशरण साहू, दिलीप टाले, संजू पटेल, केतन ठाकूर, हरेश निमजे, सुनिल गजभिये, स्वाती तारवानी,हरिहर पराते, आरती दलाल,नीलकंठ टाकलीकर, संदिप साखरे, लीना गजभिये, त्रिवेणी सहारे, संजू पटले,विनोद निखारे, अरुन गुणारकर, बाबुराव निमजे, डॉ. जयप्रकाश पौनिकर उपस्थित होते.